वर्ष:6 अंक: 16

फेब्रुवारी 16-28, 2026 (विनामूल्य)

# न्यू इंडिया समाचार



केंद्रीय

## अर्थसंकल्प

2026 - 2027

# विकसित भारताच्या

## दिशेने एक निर्णायक पाऊल

सुधारणांच्या एक्स्प्रेसवर स्वार असलेल्या भारताला, केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मुळे आता अधिक नवीन ऊर्जा आणि नवा वेग प्राप्त झाला आहे...

ई-कॉपीसाठी क्यू आर कोड स्कॅन करा



# लोकसहभाग आणि सामूहिकतेची भावना हीच देशाची सर्वात मोठी ताकद

*आझमगड असो वा अनंतपूर किंवा देशातील इतर कोणतेही ठिकाण, लोक एकत्र येऊन कर्तव्यभावनेने मोठे संकल्प पूर्ण करत आहेत. लोकसहभाग आणि सामूहिकतेची हीच भावना देशाची सर्वात मोठी शक्ती आहे. 2026 या वर्षातील आपल्या पहिल्या 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व, एआय, भरडधान्य, भारताचे सण-संस्कृती आणि स्टार्टअप्स सह अनेक विषयांवर संवाद साधला. सादर आहेत काही प्रमुख अंश...*

- **युवकांनी मतदार व्हावे :** मी माझ्या तरुण मित्रांना विनंती करतो की, 18 वर्षे पूर्ण होताच मतदार म्हणून स्वतःची नाव नोंदणी नक्की करावी. संविधानाने प्रत्येक नागरिकाकडून ज्या कर्तव्यभावनेची अपेक्षा ठेवली आहे, ती यामुळे पूर्ण होईलच, पण सोबतच भारताची लोकशाही देखील अधिक मजबूत होईल.
- **स्टार्टअप :** भारत में स्टार्टअपः भारत आज जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था बनला आहे. हे स्टार्टअप्स प्रस्थापित चौकटीबाहेर जाऊन काम करत आहेत. आज ते अशा क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत, ज्यांची 10 वर्षांपूर्वी आपण कल्पनाही करू शकत नव्हतो.
- **भारतीय उत्पादने असावीत:** उच्च दर्जाचीः आपण सर्वांचा एकच मंत्र असावा - 'क्वालिटी, क्वालिटी आणि फक्त क्वालिटी'. कालपेक्षा आजची गुणवत्ता अधिक सरस हवी. आपण जे काही निर्माण करत आहोत, त्याचा दर्जा सुधारण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. मग ते आपले कापड असो, तंत्रज्ञान असो किंवा इलेक्ट्रॉनिक्स पॅकेजिंग, 'भारतीय उत्पादन' म्हणजे 'सर्वोच्च दर्जा' हे समीकरणच जगन्मान्य झाले पाहिजे.
- **लोकसहभाग:** आझमगडमध्ये लोकांनी तमसा नदीला पुनरुज्जीवित केले, तर अनंतपूरमध्ये लोकसहभागातून 10 जलाशयांना जीवदान मिळाले आहे. लोक संघटित होऊन कर्तव्यभावनेने मोठे संकल्प सिद्ध करत आहेत, हे पाहून मनाला आनंद होतो. लोकसहभाग आणि सामूहिकतेची हीच भावना आपल्या देशाची सर्वात मोठी शक्ती आहे.
- **तरुणाईची भक्ती:** आपल्या देशात भजन आणि कीर्तन हे शतकानुशतके आपल्या संस्कृतीचा आत्मा राहिले आहेत. आपण मंदिरात भजने ऐकली आहेत. प्रत्येक पिढी, भक्ती आपापल्या काळाप्रमाणे जगली आहे. आजची पिढी देखील यात काहीतरी नवीन आणि विलक्षण कमाल करुन दाखवत आहे. आजच्या तरुणांनी भक्ती, स्वतःच्या अनुभवात आणि जीवनशैलीत सामावून घेतली आहे.
- **कौटुंबिक वर्षः** भारताची कुटुंब व्यवस्था ही आपल्या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. जगातील अनेक देशांमध्ये या व्यवस्थेकडे मोठ्या कुतूहलाने आणि आदराने पाहिले जाते. संयुक्त अरब अमिरात (युएई) चे अध्यक्ष माननीय शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांनी मला सांगितले की युएई, 2026 हे वर्ष 'इयर ऑफ फॅमिली' म्हणून साजरे करत आहे.
- **'एक पेड़ माँ के नाम':** देशभरात 'एक पेड़ माँ के नाम' अर्थात एक झाड आईच्या नावाने ही मोहीम राबवली जात आहे. आज कोट्यवधी लोक या मोहिमेत सहभागी झाले आहेत. आतापर्यंत देशात 200 कोटींहून अधिक झाडे लावली गेली आहेत. पर्यावरण रक्षणाबाबत लोक आता किती जागरूक झाले आहेत, हेच यातून दिसून येते.
- **श्री अन्न :** श्री अन्नाबद्दल देशातील लोकांचे आकर्षण सतत वाढत आहे, हे पाहून मला आनंद होतो. तसे तर आपण 2023 हे वर्ष भरडधान्य वर्ष म्हणून घोषित केले होते, परंतु आज तीन वर्षांनंतरही याबद्दल देश आणि जगात जो उत्साह आणि बांधिलकी दिसत आहे, ती खरोखरच प्रेरणादायक आहे.
- **कृत्रिम बुद्धिमत्तेचे विश्वः** फेब्रुवारी महिन्यात 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट' ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेसाठी जगभरातून, विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ भारतात येणार आहेत. ही परिषद एआयच्या जगात भारताने केलेली प्रगती आणि मिळवलेले यश जगासमोर मांडेल.

' मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार

वर्षः 6, अंकः 16 । 16-28 फेब्रुवारी, 2026

मुख्य संपादक
**धीरेन्द्र ओझा**
प्रधान महासंचालक, पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादन
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनीश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू)**

वरिष्ठ रचनाकार
**फूलचंद तिवारी**

रचनाकार
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**



**13 भाषांमध्ये उपलब्ध 'न्यू इंडिया समाचार' वाचण्यासाठी खाली कळ दाबा**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**'न्यू इंडिया समाचार'चे जुने अंक वाचण्यासाठी कळ दाबा**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

'न्यू इंडिया समाचार'बद्दल सातत्यपूर्ण नवीन माहिती (अपडेट्स) मिळवण्यासाठी पाठपुरावा करा: @NISPIBIndia

# आतल्या पानांवर...




मुखपृष्ठ कथा

केंद्रीय **अर्थसंकल्प** 2026-2027

गेल्या 11 वर्षांत केंद्र सरकारने विकसित भारत हा संकल्प प्रत्यक्षात साकारण्यासाठी भक्कम पाया रचला आहे. आता 2026-27 चा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या निर्णायक संकल्पाचा आणि संकल्पातून सिद्धीकडे जाणाऱ्या प्रवासाचे प्रतीक ठरत आहे. अमृतयात्रेकडे वाटचाल करत असताना हा सामान्य अर्थसंकल्प विकास, विश्वास आणि भविष्य या त्रिवेणीला प्रत्यक्ष रूप देणारा, आत्मनिर्भर भारताचा सशक्त अर्थसंकल्प ठरला आहे... | 16-36




परीक्षेच्या काळातील ताण कमी करणे आणि परीक्षा उत्सवा प्रमाणे साजऱ्या करण्याच्या उद्देशाने 2018 मध्ये सुरू झालेला 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रम, दरवर्षी काही नवीन करुन दाखवत आहे... 8-11

**पद्म सम्मान 2026**



'पीपल्स पद्म' ची खरा अर्थ जपत नवी परंपरा

**निष्काम कर्मयोग्यांना पद्म सन्मान**

देशात सकारात्मक ऊर्जेचा प्रसार करणारे आणि मानवतेची निस्वार्थ सेवा करणाऱ्या अनामवीरांचाही आता पद्म सन्मानाने गौरव होत आहे... 37-39

**वृत्त सारांश** | 4-5

**व्यक्तिमत्व : बुधु भगत**
लरका बंडाचे महानायक | 6

**केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय**
अटल पेन्शन योजनेला 2030–31 पर्यंत मुदतवाढ | 7

**राष्ट्रपतींचे अभिभाषण**
सुशासन अधिक मजबूत करण्याची सामूहिक बांधिलकी | 12-15

**केरळमधून 'विकास आणि रोजगारनिर्मिती'ची नवी सुरुवात**
पीएम स्वनिधी क्रेडिट कार्डच्या शुभारंभासह अनेक उपक्रम | 40-41

**...जेणेकरून संत परंपरा आणि वारसा यांच्याशी जुळावे भावी पिढ्यांचे नाते**
नामकरण... 'श्री गुरु रविदास महाराज जी विमानतळ, आदमपूर' | 42-43

**विंग्ज इंडिया 2026**
भारतात हवाई प्रवास आता केवळ मोजक्या लोकांसाठी नाही, तर सर्वसामान्यांसाठी | 44-45

**16 वा राष्ट्रीय मतदार दिन**
लोकशाहीचा जागतिक आवाज | 46-47

**राष्ट्रनिर्मितीचे निमंत्रण पत्र**
रोजगार मेळाव्यात सरकारी सेवांसाठीच्या 61 हजार नियुक्तीपत्रांचे वितरण | 48-49

**पराक्रम दिवस**
राष्ट्रीय चैतन्याचा उत्सव | 50-51

**आत्मविश्वासपूर्ण आणि शिस्तबद्ध युवा शक्ती**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वार्षिक एनसीसी पीएम रॅलीला केले संबोधित | 52-53

**भारत ऊर्जा आठवडा 2026**
केवळ ऊर्जा सुरक्षा नव्हे, तर आता स्वावलंबनाची मोहीम | 54-55

**संयुक्त अरब अमिरातीच्या अध्यक्षांची भारत भेट**
धोरणात्मक भागीदारीतून विकासाला गती | 56-57

**भारत–युरोपीय संघ (ईयू) मुक्त व्यापार करार**
भारत–युरोपीय संघ संबंधांमध्ये नव्या युगाचा शंखनाद | 58-60

**प्रकाशकः कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार विभाग)। **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ताः** कमरा खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल-** response-nis@pib.gov.in आर. एन. आय. क्रमांक DELHIN/2020/78812

# संपादकीय लेखणीतून...

# केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27

## विकसित भारताच्या पायावर आधारित जनसामान्यांचा अर्थसंकल्प

सप्रेम नमस्कार।

1 फेब्रुवारी 2026 रोजी सादर करण्यात आलेला केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 हा 'विकसित भारत 2047' च्या प्रवासाला गती देणारा एक दूरदृष्टीचा आणि सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. आज भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने हा अर्थसंकल्प एक महत्त्वाचे पाऊल आहे. या अर्थसंकल्पा मध्ये 'आत्मनिर्भर भारत' चे स्वप्न साकार करण्यासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

2026-27 च्या या अर्थसंकल्पात तीन कर्तव्यांचे वर्णन केले आहे, ज्यात आर्थिक विकासाचा वेग वाढवणे हे पहिले कर्तव्य मानले गेले आहे. याअंतर्गत भारताला जागतिक 'बायोफार्मा' (जैव औषधे निर्मिती) केंद्र म्हणून विकसित करणे असो किंवा 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन 2.0' या अर्धसंवाहक निर्मिती मोहिमेची सुरुवात करणे असो, भारत सरकार देशाची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी सतत कार्यरत आहे. या अर्थसंकल्पात इलेक्ट्रॉनिक घटक निर्मिती योजनेला (इलेक्ट्रॉनिक कंपोनेंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम) गती देण्यासाठी तरतूद वाढवून 40 हजार कोटी रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. खाणकाम, प्रक्रिया, संशोधन आणि उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित 'रेअर अर्थ कॉरिडॉर' (दुर्मिळ खनिजे पट्टा) स्थापन करण्याचाही प्रस्ताव आहे. रसायनांच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी तीन 'केमिकल पार्क्स' (रसायन केंद्रे) स्थापन करणे आणि पुढील 5 वर्षांच्या कालावधीसाठी दहा हजार कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'कंटेनर मॅन्युफॅक्चरिंग योजना' (कन्टेनर उत्पादन योजना) आणण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

जनसामान्यांच्या आकांक्षा पूर्ण करणे आणि क्षमता वाढवणे हे या अर्थसंकल्पातील दुसरे कर्तव्य आहे. यामध्ये युवाशक्तीला केंद्रस्थानी ठेवून रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि क्षमता बांधणीवर विशेष भर देण्यात आला आहे. 'भारत विस्तार एआय टूल' सारख्या तरतुदींद्वारे शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यावरही भर दिला आहे. नारीशक्तीचे सक्षमीकरण आणि महिला स्वयंसहायता (बचत) गटांच्या (एस एच जी) उत्पादनांना सुलभ बाजारपेठ मिळावी यासाठी 'एस एच ई मार्ट' ही बचत गटांसाठीची ऑनलाइन बाजारपेठ स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच, 'ऑरेंज इकॉनॉमी' (करमणूक अर्थव्यवस्था) आणि कंटेंट क्रिएशनला (आशय निर्मिती) प्रोत्साहन देण्यासाठी 15,000 शाळा आणि 500 महाविद्यालयांमध्ये 'ए व्ही जी सी कंटेंट क्रिएटर लॅब' ही ॲनिमेशन म्हणजे सजीव चित्रकला, व्हिज्युअल इफेक्ट्स म्हणजे दृश्य प्रभाव, गेमिंग म्हणजे डिजिटल खेळ आणि कॉमिक्स म्हणजे चित्रकथा यांबाबतच्या आशय निर्मितीची प्रयोगशाळा स्थापन करण्याबाबतही उल्लेख केला आहे.

'सबका साथ-सबका विकास' या दृष्टीकोनाला अनुसरून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, दिव्यांगांचे सक्षमीकरण, मानसिक आरोग्य आणि ट्रॉमा केअर यांच्यावर लक्ष केंद्रित करणे तसेच 'पूर्वोदय' आणि ईशान्य भारताला अधिक समृद्ध करणे हे तिसरे कर्तव्य सांगितले आहे. अर्थसंकल्प 2026-27 हीच यावेळची आमची मुखपृष्ठ कथा आहे.

'व्यक्तिमत्व' या सदरात लरका उठावाचे महानायक बुधू भगत, हा विषय घेतला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचे संसदेतील अभिभाषण आणि पद्म पुरस्कार 2026 यांचा या अंकात समावेश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंधरवड्यातील विविध कार्यक्रमांचाही यात आढावा घेतला आहे. यासोबतच, पाक्षिकाच्या मुखपृष्ठाच्या आतील भागावर 'मन की बात' आणि मलपृष्ठाच्या बाहेरील पानावर 'बीटिंग रिट्रीट' सोहळ्यावरील विशेष मजकूर समाविष्ट केला आहे.

धीरेन्द्र

(धीरेन्द्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचण्यासाठी आणि डाऊनलोड घेण्यासाठी येथे भेट द्या: https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# तुमचे मत...






## योजना व कामगिरी यांची मिळते वस्तुनिष्ठ माहिती

मी नियमितपणे 'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक वाचतो. यामध्ये आपल्याला सरकारी योजना आणि कामगिरी यांची वस्तुनिष्ठ माहिती मिळते. त्याचबरोबर चालू घडामोडी जाणून घेण्यासाठी हे पाक्षिक अतिशय उपयुक्त आहे. हे पाक्षिक समाजातील विविध घटकांशी संबंधित अनेक विषयांवर मोलाची माहिती देते.

**श्रीनिवास उरगोंडा**

**srinivasuragonda7@gmail.com**

## विकासकामांच्या उपक्रमांची मिळते माहिती

'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक, देशात सुरू असलेल्या केंद्र सरकारच्या योजना आणि कार्यक्रमांची माहिती मिळवण्यासाठीचे एक उत्तम माध्यम आहे. हे एक छान नियतकालीक आहे. माझ्यासाठी हे पाक्षिक, देशात सुरू असलेली विकासकामे आणि योजना जाणून घेण्याचे प्रभावी साधन आहे.

**mhqchoutuppal@gmail.com**

## सरकारी धोरण आणि विकास उपक्रमांविषयीचे आकलन वाढते

विशेष आणि महत्त्वपूर्ण माहिती देणारे पाक्षिक प्रकाशित करत असल्याबद्दल मी 'न्यू इंडिया समाचार'च्या संपूर्ण चमुचे आभार मानतो. नागरिकांना उत्तम माहिती देण्याच्या तुमच्या प्रयत्नांना सतत यश मिळत राहो, अशी माझी इच्छा आहे. हे पाक्षिक वाचल्यामुळे युवकांमध्ये सरकारी धोरणे आणि देशाच्या विकासासाठी सुरू असलेल्या उपक्रमांविषयी आकलन वाढते.

**thirubjp2020@gmail.com**

## विविध विषयांवर ज्ञानवर्धक लेख

मी एक पत्रकार आहे. 'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक वाचायला मला खूप आवडते. या पाक्षिकात विविध विषयांवर ज्ञानवर्धक लेख प्रकाशित होत असतात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'न्यू इंडिया समाचार' अत्यंत उपयुक्त आहे. या पाक्षिकाची मांडणी आणि रचना अतिशय चांगल्या प्रकारे केली आहे.

**urvaadhvaryu@gmail.com**

## प्रत्येक अंक हा संग्रहणीय असतो

मी 'न्यू इंडिया समाचार'ची तमिळ आवृत्ती पाहिली. वाचल्यानंतर, हे पाक्षिक सर्वसामान्य जनतेसाठी अतिशय उपयुक्त असल्याचे जाणवले. हे पाक्षिक उत्तम माहितीने युक्त असे परिपूर्ण आहे. याचा प्रत्येक अंक संग्रही ठेवण्यासारखा असतो.

**डी. थंगादुरई**

**thesiyareporter2023@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.
ईमेल- response-nis@pib.gov.in

आकाशवाणी समाचार
Akashvani

*'न्यू इंडिया समाचार' आकाशवाणीच्या एफएम गोल्ड वाहिनीवर दर शनिवारी आणि रविवारी दुपारी 3:10 ते 3:25 या वेळेत ऐकण्यासाठी दिलेला क्यू आर कोड स्कॅन करा.*

वृत्त सारांश

# नवीन आधार ॲपची सुरुवात; आता एकाच वेळी पाच प्रोफाइल जोडता येणार

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (यूआयडीएआय) एक नवीन मोबाईल ॲप्लिकेशन सुरु केले आहे. आधार धारकांना त्यांची डिजिटल ओळख सुरक्षित, सोयीस्कर आणि गोपनीय ठेवता यावी, दुसऱ्यांना अशाच सुरक्षितपणे देता यावी आणि त्याचे प्रमाणीकरण करता यावे, यादृष्टीने या ॲपची रचना करण्यात आली आहे. 'एक कुटुंब एक ॲप' ही संकल्पना प्रत्यक्षात आणत, आता एकाच मोबाईलमध्ये जास्तीत जास्त पाच आधार प्रोफाइल जोडता येतील. वीन ॲप कमी इंटरनेट डेटा वापरेल, वापरकर्त्यांची माहिती अधिक सुरक्षित ठेवेल आणि त्यासोबत इतर उपयुक्त सुविधा देईल.

- हे ॲप, आधार धारकांना त्यांची ठराविक माहितीच इतरांना पाठवण्याची सुविधा देईल.
- ॲपमध्ये ऑफलाइन पडताळणीची सुविधाही समाविष्ट करण्यात आली आहे. यामध्ये पडताळणी मागणाऱ्या संस्थेचा (सिकींग एन्टीटी) क्यू आर कोड स्कॅन करून हॉटेलमध्ये चेक-इन करता येणार आहे. तसेच या ॲपमध्ये पर्यायी स्वरूपात चेहऱ्याद्वारे ओळख पटवण्याची सुविधा देण्यात आली आहे. चित्रपटाच्या तिकीटाची नोंदणी करताना वयाची खात्री करण्यासाठी आयु-पडताळणी करता येईल. रुग्णालयात आगंतुक आणि परिचारकांच्या प्रवेशासाठीही या ॲपचा वापर करता येणार आहे. याशिवाय गिग वर्कर्स तसेच विविध सेवा पुरवठारांची ओळख आणि सत्यापन करण्यासाठीही या ॲपचा उपयोग करता येणार आहे.
- ॲपमध्ये उपस्थितीचे प्रमाण देण्यासाठी चेहऱ्याद्वारे पुष्टी करण्याची सुविधा देण्यात आली आहे. एका क्लिकमध्ये बायोमेट्रिक लॉक आणि अनलॉक करता येईल. तसेच प्रमाणीकरणाचा पूर्वइतिहास पाहण्याची सोय असून, संपर्क तपशील सामायिक करण्यासाठी क्यू आर कोडवर आधारित सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे.
- पत्ता बदलण्यासोबत किंवा त्यात ठराविक बदल करण्यासोबत, आता नागरिक या ॲपद्वारे आपला नोंदणीकृत मोबाईल नंबर देखील अद्ययावत करू शकतात.




# मखाणा बनला जागतिक ओळख
## पहिली खेप दुबईला रवाना

भारत हा मखाणाचा जगातील सर्वात मोठा उत्पादक असून जागतिक उत्पादनात भारताचा वाटा 80% आहे. यामध्ये एकट्या बिहारचे योगदान 85% आहे. या क्षेत्रावर 10 लाख शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बिहारच्या पूर्णिया येथून 'जीआय' टॅग प्राप्त 'मिथिला मखाणा' ची पहिली सागरी खेप दुबईला पाठवण्यात आली आहे. निर्यातीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतकरी उत्पादक संघांना सक्षम करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. मिथिला मखाण्याने जागतिक व्यासपीठावर भारताची शेती आणि संस्कृती यांची ओळख अधिक बळकट केली आहे. दरभंगा हे मखाण्याच्या प्रमुख केंद्रांपैकी एक असून, 'एक जिल्हा, एक उत्पादन' या उपक्रमांतर्गत, मखाण्यासाठी त्याला मान्यताही देण्यात आली आहे. मिथिला मखाण्याला जी आय टॅग देखील मिळाला आहे. मखाण्याचे उत्पादन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, विपणन आणि निर्यात यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने 2025 मध्ये मखाणा मंडळाची स्थापना केली आहे. तसेच 476 कोटी रुपये खर्चाची मखाणा विकासाची केंद्रीय योजनाही मंजूर केली आहे. निर्यातीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने मखाण्यासाठी एचएसएन कोड ही तयार केला आहे.



# लेह हवाईदल तळावर
## नागरी विमान वाहतूक पायाभूत सुविधा होणार विकसित

लडाख या केंद्रशासित प्रदेशातील लेह हवाईदल तळावर नागरी विमान वाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करणाऱ्या प्रकल्पाचे उद्घाटन नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांच्या हस्ते झाले. अत्यंत आव्हानात्मक उंच प्रदेश आणि प्रतिकूल हवामान असूनही या कामाचे आधुनिकीकरण विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे विमानांची ये-जा सुलभ होईल आणि नागरी विमानांचे उड्डाण जलद गतीने होईल. लेहमध्ये चांगली हवाई वाहतूक सुविधा मिळाल्याने पर्यटनाला मोठी चालना मिळेल. आपत्ती व्यवस्थापन आणि मानवतावादी मदतीसाठी ही व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरेल.

# सहकारातून समृद्धि: "भारत टॅक्सी" सेवेचा शुभारंभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "सहकारातून समृद्धी" या दृष्टीकोनानुसार केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी 5 फेब्रुवारी 2026 रोजी नवी दिल्ली येथे भारतातील पहिल्या सहकार आधारित "भारत टॅक्सी" या ऑनलाईन टॅक्सी फेरी सुविधेचा शुभारंभ केला. भारत टॅक्सी हा जगातील पहिला आणि सर्वात मोठा सहकार आधारित राईड-हेलिंग प्लॅटफॉर्म आहे. आतापर्यंत सुमारे 4 लाख चालक या मंचावर नोंदणीकृत झाले असून 10 लाखांहून अधिक वापरकर्त्यांनीही नोंदणी केली आहे. आजवर सुमारे 10 कोटी रुपये चालकांना थेट वितरित करण्यात आले आहेत. भारत टॅक्सीमुळे केवळ प्रवासाची गरज पूर्ण होणार नसून, प्रवाशांना सुविधा, संरक्षण आणि स्वयंपूर्णतेचा नवा अनुभव मिळणार आहे. या सेवेमध्ये वातानुकूलित नसलेल्या (नॉन-एसी) टॅक्सीचा पर्याय तसेच मेट्रो तिकीट बुकिंगची सुविधाही उपलब्ध असणार आहे. विशेष म्हणजे 100% भाडे थेट चालकांच्या खात्यात जमा होणार आहे. भारत टॅक्सीच्या शुभारंभप्रसंगी सहकाराच्या तत्त्वावर चालणाऱ्या प्रवास-वाहतूक व्यवस्थेमध्ये विशेष आणि उठावदार काम करणाऱ्या या सेवेचे सारथ्य करणाऱ्या अव्वल 6 चालकांचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय मंत्र्यांनी या चालकांना भागधारक प्रमाणपत्रांचे वितरण केले. यामुळे "सारथीच मालक" या मूलभूत संकल्पनेला अधिक बळ मिळते. प्रत्येक सारथी साठी 5 लाख रुपयांचे वैयक्तिक अपघात विमा संरक्षण आणि 5 लाख रुपयांचे कौटुंबिक आरोग्य विमा संरक्षण देण्यात आले आहे.









## पीएमजीएसवाई-IV अंतर्गत एकूण 10 हजार किलोमीटर लांबीच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पीएमजीएसवाय)–IV अंतर्गत जम्मू-काश्मीर, छत्तीसगड, उत्तराखंड, राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि सिक्किम या राज्यांसाठी एकूण 10 हजार किलोमीटरपेक्षा अधिक लांबीच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांची कामे पूर्ण झाल्यानंतर आजवर मुख्य प्रवाहापासून एकाकी पडलेल्या सुमारे 3,270 वस्त्यांना दळणवळण आणि अत्यावश्यक सेवा उपलब्ध होणार आहेत. उंच पर्वतीय भागांपासून ते ग्रामीण समुदायांपर्यंत पसरलेले हे रस्ते केवळ पायाभूत सुविधांतील सुधारणा नसून, प्रगती साधणारे महत्त्वाचे मार्ग ठरणार आहेत. या योजनेचा उद्देश आतापर्यंत एकमेकांशी न जोडलेल्या वसाहतींना 62,500 किलोमीटर लांबीचे, सर्व ऋतूंमध्ये वापरता येतील असे रस्ते उपलब्ध करून देण्याचा आहे. आर्थिक वर्ष 2028–29 पर्यंत या प्रकल्पांवर सुमारे 70,125 कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज आहे.

## आंतरराष्ट्रीय रामकथा संग्रहालयात पहायला मिळणार 233 वर्षे जुने वाल्मीकी रामायण

केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी यांनी तीन मूर्ती येथे स्थित प्रधानमंत्री संग्रहालय आणि ग्रंथालयाच्या कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्र यांना वाल्मीकी रामायणाची (तत्त्वदीपिका टीका) 233 वर्षे जुनी, संस्कृतमधील एक दुर्मिळ हस्तलिखित प्रत सुपूर्द केली. ही हस्तलिखित प्रत संस्कृत भाषेत (देवनागरी लिपीत) लिहिलेली असून, ती विक्रम संवत 1849 (1792 ईसवी सन) कालखंडातील आहे. ही रामायणाची हस्तलिखित प्रत फार दुर्मिळ असून, शतकानुशतके जतन केलेल्या, विश्वासार्ह आणि शुद्ध मजकूर जपण्याच्या परंपरेतून आलेली आहे. ही हस्तलिखित प्रत उत्तर प्रदेशातील अयोध्या येथील आंतरराष्ट्रीय रामकथा संग्रहालयाला कायमस्वरूपी भेट म्हणून देण्यात आली आहे. यामुळे या अमूल्य वारशाचे सर्वार्थाने निश्चितपणे संरक्षण होईल, तसेच व्यापकपणे सामान्य जनतेला तो उपलब्ध होईल. यावेळी नृपेंद्र मिश्र म्हणाले, "वाल्मीकि रामायणाच्या या दुर्मिळ हस्तलिखिताचे अयोध्येतील रामकथा संग्रहालयाला दान देणे, हा रामभक्तांसाठी तसेच अयोध्या येथील मंदिर परिसरासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे."





■ जन्म : 17 फेब्रुवारी 1792 ■ मृत्यू : 13 फेब्रुवारी 1832

# लरका उठावाचे महानायक

*लरका उठावाचे नेतृत्व करणारे तसेच स्वातंत्र्याचे स्वप्न पाहणारे शूर योद्धे बुधु भगत यांनी इंग्रज आणि सावकारांविरुद्ध लढा दिला. त्यांनी गनिमी काव्याने लढा देत स्वातंत्र्ययुद्ध केले. चौरेया, पिठोरिया, लोहरदगा आणि पलामू या भागांत त्यांनी लोकांना ब्रिटिश सत्तेपासून मुक्त होण्यासाठी जागृत केले. शोषण आणि अत्याचाराविरुद्ध त्यांनी सातत्याने संघर्ष केला. अनेक वर्षे त्यांनी इंग्रजांना जंगलांत पाय ठेवू दिला नाही आणि आदिवासी समाजाला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. धैर्य आणि प्रतिकाराचे प्रतीक असलेल्या बुधु भगत यांची शौर्यगाथा आणि त्याग देत राहील सदैव प्रेरणा....*

लरका उठावाची ठिणगी पेटवणारे प्रसिद्ध क्रांतिकारक बुधु भगत हे केवळ कु हाड हातात घेऊन ब्रिटिश सरकारच्या तोफा आणि बंदुकांचा सामना केलेले वीर होते. 17 फेब्रुवारी 1792 रोजी झारखंडच्या रांची जिल्ह्यातील सिलागाई गावात, एका उरांव आदिवासी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. बुधु भगत यांच्याबाबत असे म्हणतात की, त्यांना दैवी शक्तींचे वरदान लाभले होते, आणि त्याचे प्रतीक म्हणून ते नेहमी आपल्या सोबत एक कुऱ्हाड बाळगत असत. त्यांच्या उत्कृष्ट संघटन कौशल्यामुळे लोक त्यांना परमेश्वरी अवतार मानत असत. बुधु भगत यांनी सिल्ली, चोरेया, पिठोरिया, लोहरदगा आणि पलामू या भागांतही संघटनात्मक कार्य केले होते.

कुशल संघटक असण्यासोबतच त्यांनी आपल्या सशस्त्र दलाला गनिमी युद्धाचे प्रशिक्षण दिले. घनदाट निबिड अरण्य आणि दुर्गम डोंगराळ भागाचा लाभ घेत त्यांनी अनेक वेळा इंग्रज सैन्याला नामोहरम केले. लहानपणापासूनच ते तलवारबाजी आणि धनुर्विद्येचा सराव करत आले होते. इंग्रजांची लाळ घोटणारे जमीनदार आणि दलाल यांच्याविरुद्धही त्यांनी जमीन आणि वनसंपत्तीच्या संरक्षणासाठी संघर्ष उभा केला होता. एवढेच नव्हे, तर आपल्या धैर्य आणि नेतृत्वकौशल्याच्या बळावर त्यांनी आदिवासी भागांत इंग्रजी सत्तेच्या क्रौर्याविरोधात लरका बंडाची ठिणगी पेटवली आणि सशस्त्र उठावाचे नेतृत्व केले होते.

असे म्हणतात की छोटानागपूरमधील रांची आणि आसपासच्या परिसरावर बुधु भगत यांचा जबरदस्त प्रभाव होता. त्यांच्या एका इशाऱ्यावर लोक आपले प्राणही अर्पण करण्यास तयार असत. बुधु भगत यांचा लष्करी तळ चोगारी डोंगराच्या शिखरावर, दाट जंगलांच्या मध्यभागी होता आणि रणनीती आखण्याचे काम याच ठिकाणी होत असे. एक वेळ तर अशी आली की, त्यांच्या शौर्य आणि धैर्यामुळे हैराण झालेल्या इंग्रजांनी त्यांना पकडण्यासाठी 1,000 रुपयांचे बक्षीस जाहीर केले. त्या काळात ही रक्कम अत्यंत मोठी मानली जात होती.

13 फेब्रुवारी 1832 रोजी कॅप्टन इंपे यांनी सिलागाई गावात बुधु भगत आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वेढा घातला. इंग्रजांकडून अंधाधुंद गोळीबार झाला तर त्यात निरपराध ग्रामस्थ मारले जाऊ नयेत, म्हणून बुधु भगत आत्मसमर्पण करण्यास तयार होते. मात्र, त्यांच्या अनुयायांनी वर्तुळाकार सुरक्षा कवच तयार केले. याच दरम्यान इंग्रजी कॅप्टनने गोळीबाराचा आदेश दिला. अंधाधुंद गोळीबार सुरू झाला आणि वृद्ध, मुले, महिला तसेच तरुणांच्या आक्रोशाने संपूर्ण परिसर हादरून गेला. त्या रक्तरंजित तांडवात सुमारे 300 ग्रामस्थ मारले गेले. अन्यायाविरुद्ध उभे राहिलेले हे लोकबंड शस्त्रबळाच्या जोरावर जबरदस्तीने दडपण्यात आले.

बुधु भगत तसेच त्यांचे पुत्र हलधर आणि गिरधर यांनी इंग्रजांशी शौर्याने मुकाबला करत वीरमरण पत्करले. आजही लोक आपल्या लोककथा आणि लोकगीतांमधून वीर बुधु भगत आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे स्मरण करतात. हे स्मरण म्हणजे, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान आणि जनमानसातील लोकप्रियता यांचे निदर्शक आहे. ■



# अटल पेन्शन योजनेची मुदत 2030-31 पर्यंत वाढवली

# सिडबीला मिळणार 5,000 कोटी रुपयांची मदत

*असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाने एक महत्त्वाचा निर्णय घेत अटल पेन्शन योजना 2030-31 पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे कमी उत्पन्न गटातील तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना वृद्धावस्थेतील उत्पन्न सुरक्षा मिळणार आहे. त्याचबरोबर सिडबीला 5,000 कोटी रुपयांच्या इक्विटी सहाय्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे अनेक एमएसएमईना मोठा फायदा होणार आहे.*

**निर्णय : अटल पेन्शन योजना (एपीवाय) आर्थिक वर्ष 2030–31 पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे.**

**परिणाम :** अटल पेन्शन योजनेत 19 जानेवारी 2026 पर्यंत 8.66 कोटींहून अधिक अर्जदारांनी नोंदणी केली असून, त्यामुळे ही योजना भारताच्या समावेशक सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनली आहे. एपीवाय अंतर्गत 60 वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर, अंशदानाच्या आधारे, दरमहा 1,000 रुपये ते 5,000 रुपये इतके किमान हमी निवृत्तीवेतन दिले जाते. असंघटित क्षेत्रातील कामगारांना वृद्धावस्थेतील उत्पन्न सुरक्षा देण्याच्या उद्देशाने ही योजना 9 मे 2015 रोजी सुरू करण्यात आली होती.

**प्रमुख परिणाम :**

- ही योजना कमी उत्पन्न गटातील तसेच असंघटित क्षेत्रातील लाखो कामगारांना वृद्धावस्थेतील उत्पन्न सुरक्षा सुनिश्चित करते.
- ही योजना आर्थिक समावेशनाला चालना देते. भारतामध्ये नागरिकांनी निवृत्तीनंतर कमाई नाही अशा व्यवस्थेत केवळ कुटुंबावर अवलंबून न राहता, पेन्शनच्या माध्यमातून स्वतःची नियमित उत्पन्न व्यवस्था निर्माण करावी, या संस्कृतीला ही योजना प्रोत्साहन देते.
- निरंतर सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देत विकसित भारत @ 2047 या दृष्टीकोनाला अधिक बळकटी देते.

**योजने बाबत जागृती वाढवणे आणि योजनेचा लाभ घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी सरकार करणार मदत**

- असंगठित कामगारांपर्यंत योजनेची पोहोच वाढवण्यासाठी प्रचारात्मक आणि विकासात्मक उपक्रम राबवले जाणार असून, त्यामध्ये जागरूकता निर्माण आणि क्षमता विकास यांचा समावेश असेल.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक व्यवहार्यता निकष पूर्ण करण्यासाठी तसेच तिची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक निधीचे वाटप केले जाणार आहे.



**निर्णय : भारतीय लघु उद्योग विकास बँकेला (सिडबी) 5,000 कोटी रुपयांच्या इक्विटी सहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.**

**प्रभाव :** 5,000 कोटी रुपयांच्या इक्विटी भांडवली गुंतवणुकीनंतर, आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या एमएसएमई उद्योगांची संख्या वित्तीय वर्ष 2025 च्या अखेरीस 76.26 लाखांवरून वाढून आर्थिक वर्ष 2028 च्या अखेरीस 1.02 कोटी होण्याची अपेक्षा आहे. याचा अर्थ सुमारे 25.74 लाख नवीन एमएसएमई लाभार्थी या कालावधीत निर्माण होणार आहेत.

- एमएसएमई मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या (30.09.2025 पर्यंतच्या) ताज्या आकडेवारीनुसार, 6.90 कोटी एमएसएमई उद्योगांद्वारे एकूण 30.16 कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. याचा अर्थ प्रत्येक एमएसएमई मार्फत सरासरी 4.37 व्यक्तींसाठी रोजगारनिर्मिती होत आहे.
- हा सरासरी रोजगारनिर्मितीचा दर लक्षात घेता, आर्थिक वर्ष 2027–28 च्या अखेरीस अंदाजे 25.74 लाख नवीन एमएसएमई लाभार्थी निर्माण झाल्यास, सुमारे 1.12 कोटी नवीन रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ▪

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.



संवादातून यश

9 वा भाग

परीक्षा पे चर्चा 2026

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मंत्र

## तुमच्या अध्ययन पद्धतीवर पूर्ण विश्वास ठेवा

*तणावावर व्यक्त होण्यासाठी आणि परीक्षांकडे उत्सवाप्रमाणे पाहण्याच्या उद्देशाने वर्ष 2018 मध्ये प्रारंभ झालेला परीक्षा पे चर्चा कार्यक्रम दरवर्षी नवीन आयाम प्रस्थापित करत आहे. यावर्षीही विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती दूर करून त्यांना यशस्वितेचा मार्ग दाखवण्यासाठी पुनःश्च आगळ्यावेगळ्या आणि व्यापक स्वरूपात परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 6 फेब्रुवारी रोजी 'परीक्षा पे चर्चा' च्या 9 व्या भागात पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण कानमंत्र दिला आणि विविध विषयांवर संवाद साधला....*

### गुरु पंतप्रधान मोदींचा विद्यार्थ्यांना मंत्रः

**पॅटर्नवर विश्वास ठेवाः** तुमच्या स्वतःच्या अध्ययन पद्धतीवर पूर्ण विश्वास ठेवा. पण जर तुम्हाला तुमच्या पद्धतीविषयी कोणी सल्ला दिला तर तो काळजीपूर्वक ऐका आणि समजून घेण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला वाटेल, 'हा माझा पॅटर्न आहे, पण त्यात मी ही गोष्ट जोडली तर बरे होईल.' पण केवळ दुसऱ्याच्या सांगण्यावरून नव्हे तर स्वानुभवातून बदल स्वीकारा. आता, जेव्हा मी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाची सुरुवात केली तेव्हा एक पद्धत होती. आता मी हळूहळू त्यात सुधारणा करत आहे.

**दोन प्रकारची कौशल्येः** कौशल्यांमध्येही, दोन प्रकारची कौशल्ये असतात. एक म्हणजे जीवन कौशल्य. दुसरे व्यावसायिक कौशल्य. आता मला सांगा, 'सर, मी जीवन कौशल्यांवर लक्ष केंद्रित करावे की व्यावसायिक कौशल्यांवर?' मी म्हणेन, 'दोन्ही.' आता मला सांगा, अभ्यास न करता, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर न करता कोणतेही कौशल्य मिळवता येते का?

**शिक्षण हे एक माध्यमः** आपले जीवन परीक्षांसाठी नाही, तर शिक्षण हे आपल्या जीवनाला आकार देण्याचे एक माध्यम आहे. आपण वारंवार शिक्षणासाठी परीक्षा देतो. या परीक्षा आत्मपरीक्षणासाठी असतात. परीक्षेतील गुण हे अंतिम ध्येय असू शकत नाही. अंतिम ध्येय समग्र जीवनाचा विकास असावा. मी सर्व विद्यार्थ्यांना जीवनात सर्वोत्तम बनण्याचे, जीवन सर्वोत्तम बनवण्याचे, संपूर्ण जीवन शानदार करण्याचे आणि त्यासाठी जीवन घडवण्याचे आवाहन करतो.





## आसामी गमछा (शाल)

पंतप्रधान मोदींनी आसामी गमछा (शाल) देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. ते म्हणाले, 'याला आसामी गमछा म्हणतात. हा सर्वात मोठा ठेवा आहे, ती माझी सर्वात आवडती गोष्ट आहे. मला त्याची रचना आवडते. दुसरे म्हणजे, तो आसामच्या आणि विशेषतः ईशान्येकडील महिला सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. त्याचे विणकाम घरी करतात. खरोखरच तिथल्या मातृशक्तीचे, नारीशक्तीचे कर्तृत्व दिसते. एक प्रकारे, त्याद्वारे मनाला खूप आदरणीय, सन्मानजनक वाटते.' म्हणून मला आज या मुलांना आसाममधील गमछा द्यावासा वाटला.

## मी भूतकाळाची नव्हे तर वर्तमानाची गणना करतो

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, एका नेत्याने मला अलीकडेच माझ्या वाढदिवशी, 17 सप्टेंबर रोजी, फोन करून सांगितले कि तुम्ही 75 वर्षांचे झालात. मी म्हणालो की माझ्याकडे अजूनही 25 वर्ष शिल्लक आहेत. तात्पर्य, मी भूतकाळाची नव्हे तर वर्तमानाची गणना करतो आणि म्हणूनच मी तुम्हाला आयुष्याविषयी सांगतो: झाल्या गोष्टी आठवण्यात वेळ न घालवता भविष्य घडवण्याचा विचार करा.

*या वर्षीच्या पीपीसीमध्ये परीक्षांशी संबंधित काही अतिशय मनोरंजक विषयांचा समावेश आहे, विशेषतः तणावमुक्त राहण्याची गरज, अध्ययनावर लक्ष केंद्रित करणे आणि असे बरेच काही. हे एक व्यासपीठ आहे जे मला नेहमीच भावले, कारण ते मला देशभरातील हुशार विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी देते.* **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



**गेम क्रिएटर बना:** भारतात अनेक कथा, कहाण्या आहेत. तुम्ही कधी विचार केला आहे का, 'मी पंचतंत्रावर एक गेम बनवेन, मी गेम सर्जक बनेन?' सोशल मीडिया प्रोफाइल तयार करा आणि स्वतः एक किंवा दोन गेम तयार करा आणि ते सुरू करा. तुमच्या कुटुंबातील लोक म्हणतील, 'अरे, बघा, हा इतका लहान असून त्याचे 10,000-20,000 फॉलोअर्स आहेत.' तुम्हाला नवीन कल्पना सुचतील. म्हणून, जर तुम्हाला गेमिंगमध्ये रस असेल तर ती चांगली गोष्ट आहे. कधीही संकोच करू नका.

**तुमच्या डायरीत लिहा:** रात्री झोपण्यापूर्वी, उद्या तुम्हाला नक्की कोणती कामे करायची आहेत ते तुमच्या डायरीत लिहा. अशी कोणती कामे आहेत? दुसरे म्हणजे, आज तुम्ही जे लिहिले ते दुसऱ्या दिवशी पडताळून पहा, ते पूर्ण झाले की नाही, आणि त्यावर टिकमार्क करा. काल मी लिहिले होते की मी आज पाच गोष्टी करेन, पण मी फक्त तीन केल्या, म्हणून तेवढ्यावर टिकमार्क करा. दोन कामे बाकी आहेत. मग विचार करा की ही दोन का राहून गेली?

9 वा भाग

परीक्षा पे चर्चा 2026

# विक्रमी विद्यार्थी नोंदणी



परीक्षा पे चर्चा (पीपीपीसी) कार्यक्रमाच्या नवव्या भागात अभूतपूर्व वाढ दिसून आली आणि यात 4.5 कोटींहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी माय गव पोर्टलद्वारे नोंदणी केली. यामध्ये 4,19,14,056 विद्यार्थी, 24,84,259 शिक्षक आणि 6,15,064 पालकांचा समावेश होता.

**2018**

## पहिल्यांदा झाली चर्चा

परीक्षा पे चर्चा कार्यक्रम पहिल्यांदा 16 फेब्रुवारी 2018 रोजी नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमात 2500 हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. देशभरातील 8.5 कोटीहून अधिक विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम पाहिला.

**2019**

## वाढती व्याप्ती

'परीक्षा पे चर्चा' चा दुसरा भाग 29 जानेवारी 2019 रोजी नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये आणखी मोठ्या प्रमाणात लोक सहभागी झाले होते. नव्वद मिनिटांहून अधिक काळ चाललेल्या या चर्चेत विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा समावेश होता.

**2020**

## वाढता सहभाग

20 जानेवारी 2020 रोजी नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडिअममध्ये आयोजित या कार्यक्रमासाठी 2.63 लाख प्रवेशिका आल्या होत्या. देश-विदेशातील अशा 25 देशातील भारतीय विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

**2021**

## आभासी माध्यमातून संवाद

कोविड-19 महामारीमुळे पीपीसी चा चौथा भाग 7 एप्रिल 2021 रोजी ऑनलाईन आयोजित करण्यात आला होता.

**2022**

## 5 व्या भागाचे आयोजन

1 एप्रिल 2022 रोजी नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडिअममध्ये आयोजित परीक्षा पे चर्चा च्या पाचव्या भागात पंतप्रधान मोदींनी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी चर्चा केली. 9,69,836 विद्यार्थी, 47,200 शिक्षक आणि 1,86,517 पालकांनी परीक्षा पे चर्चा- 2022 चे थेट प्रक्षेपण अनुभवले.

**2023**

## सहभाग वृद्धी

27 जानेवारी 2023 रोजी परीक्षा पे चर्चा च्या सहाव्या भागाचे आयोजन तालकटोरा स्टेडिअममध्ये करण्यात आले होते. 7,18,110 विद्यार्थी, 42,337 शिक्षक आणि 88,544 पालकांनी थेट प्रसारण पाहिले.

**2024**

## देशभरातील सहभाग

29 जानेवारी 2024 रोजी भारत मंडपम मध्ये आयोजित सातव्या भागात **MyGov** पोर्टल वर 2.26 कोटी सहभागींची नोंदणी होती. यात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि कला उत्सवाच्या विजेत्यांसह सुमारे 3,000 सहभागींनी भाग घेतला.

**2025**

## संभाषणात अनेक विषयांवर चर्चा

10 फेब्रुवारी 2025 रोजी नवी दिल्लीतील सुंदर नर्सरीमध्ये 'परीक्षा पे चर्चा' चा 8 वा भाग नवीन स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर चर्चा केली. त्यांनी विद्यार्थ्यांना तीळगूळ वाटला.

जर तुम्ही आयुष्यात वेळेचे व्यवस्थापन आणि वेळेचा सदुपयोग कसा करायचा हे शिकलात, तर तुम्हाला कधीही ताण येणार नाही. तुम्हाला थकवा जाणवणार नाही. आता जसे, माझ्याकडे इतकी सगळी कामे असतात, पण मला ताण येत नाही कारण मला माझा वेळ सुज्ञपणे वापरण्याची सवय खूप पूर्वीपासून लागली आहे.

**आयुष्य जगण्याच्या पद्धतीतून आयुष्य घडते:** काही लोक असतात कि भाऊ झोपच येत नाही. का येत नाही?




## पहिल्यांदाच, देशभरातील अनेक ठिकाणी पीपीसी चे आयोजन

पहिल्यांदाच, पीपीसी 2026 चे आयोजन देशाच्या सर्व भागांना व्यापत विविध ठिकाणी करण्यात आले. दिल्ली व्यतिरिक्त, पीपीसी 2026 चार वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात आला, ज्यात तामिळनाडूतील कोइम्बतूर, छत्तीसगडमधील रायपूर, गुजरातमधील देवमोगरा आणि आसाममधील गुवाहाटी यांचा समावेश होता, ज्यामध्ये देशाच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि मध्य भागांचा समावेश होता.

## देशभरातील शाळांमध्ये विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांचे आयोजन

परीक्षा पे चर्चा 2026 च्या तयारीचा एक भाग म्हणून, देशभरातील शाळांमध्ये विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आत्मनिर्भरतेच्या भावनेला प्रोत्साहन देण्याकरिता विद्यार्थ्यांद्वारे आयोजित स्वदेशी संकल्प दौड आणि पराक्रम दिनानिमित्त केंद्रीय विद्यालयांमध्ये आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा आणि लेखन स्पर्धांचा समावेश होता. या उपक्रमांमध्ये सुमारे 2.26 कोटी विद्यार्थ्यांनी भाग घेतला.



## बघायलाच हवीत स्वप्ने

विद्यार्थ्यांसोबतच्या संवादात पंतप्रधान मोदी म्हणाले की स्वप्न न पाहणे हा गुन्हा आहे. स्वप्न बघायलाच हवीत, परंतु सतत स्वप्न गुणगुणत बसणं कधीही उपयुक्त ठरणार नाही. म्हणून, आपण जीवनात कृतीला प्राधान्य दिले पाहिजे. मी जिथे आहे तिथे मला यशस्वी व्हायचे आहे, तरच मी प्रगती करू शकेन. जर असे वाटले की मला अंतराळवीर व्हायचे आहे आणि चंद्रावर जायचे आहे, तर अंतराळवीर कोण झाले याचा मी अभ्यास केला पाहिजे. त्यांचे चरित्र काय होते? अंतराळ म्हणजे काय? हळूहळू, आपल्याला त्यात रस निर्माण झाला पाहिजे.

## एका विद्यार्थिनीने म्हटलेली कविता...

*हम सबके अरमान हैं आप। भारत के अभिमान हैं आप।*
*भारतवर्ष के केवट हैं आप। मानवता के सेवक हैं आप।*
*मैं बड़ी दूर से आई हूं। कुछ प्रश्नों को अपने साथ भी लाई हूं।*
*परीक्षा पे चर्चा की सौगात उठाए हैं। फिर हम यह मौका पाए हैं।*
*आप ममता की परछाई हैं। वंचितों के हमराही है।*
*देश को आगे रखते हैं। भारत मां की जय कहते हैं।*
*तो लो मैं भी यह कहती हूं, मन की बात रखती हूं।*
*आप साधना पुरुष और योगी हो।*
*भारत के सपनों के मोदी हो।*
*यह कहकर मैंने वाणी को विराम दिया।*
*फिर से आपको प्रणाम किया।*

## परीक्षा पे चर्चा द्वारे मिळणाऱ्या उपयुक्त सूचना

- तणावाचे व्यवस्थापन आणि वेळेचे व्यवस्थापन.
- परीक्षेदरम्यान होणारी घबराट दूर करण्याचे उपाय
- शेवटच्या दिवसांमध्ये उजळणी करण्याची योग्य पद्धत
- पालक, पाल्य यांची मदत कशी करावी

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

खोली अशी आहे म्हणून. जरी तुम्ही त्याला पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवलेत ना तरी त्याला झोप येणार नाही. सुविधा असेल तर सक्षम बनू ही मानसिकता चुकीची आहे. आपल्या देशात बोर्डाच्या परीक्षेत जे अव्वल येतात ती मुले कोण आहेत? छोट्या छोट्या गावातीलच आहेत. तिथे तर कोणत्याच सोयीसुविधा नाहीत. सुखसुविधाच जीवन घडवतात या भ्रमात राहू नये. आपल्या जगण्याची पद्धतच आपले जीवन घडवते. ▪

राष्ट्रपतींचे अभिभाषण

# सुशासनाला अधिक बळकटी देण्यासाठी सामूहिक वचनबद्धता

*संसदेच्या वर्ष 2026 च्या पहिल्या अधिवेशनाचा प्रारंभ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने झाला. हे अभिभाषण अलीकडील वर्षांमध्ये भारताच्या विकासयात्रेचे मूर्त दर्शन असण्यासोबतच भविष्यकाळासाठीचे उत्तम मार्गदर्शन आणि 140 कोटी देशवासीयांच्या आत्मविश्वासाची अभिव्यक्ती होते. या अभिभाषणात शेतकरी, युवा,गरीब आणि वंचित वर्गांच्या सक्षमीकरणासाठी निरंतर करण्यात येत असलेले प्रयत्न अधोरेखित करण्यात आले आहेत. त्याचसोबत सुधारणा एक्स्प्रेसला आणखी गती देणे,नवोन्मेषाला चालना देणे आणि सुशासनाला अधिक बळकटी देण्यासाठी नवभारताच्या सामूहिक वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला, जो एक सशक्त, आत्मनिर्भर आणि समृद्ध राष्ट्राचा सामूहिक संकल्प दर्शवतो. या अभिभाषणाचा हा संपादित अंश...*



**भूतकाळापासून प्रेरणा:** वंदे मातरमला 150 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभरात कार्यक्रम आयोजित होत आहेत. सर्व देशवासी या महान प्रेरणेसाठी ऋषी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांना वंदन करत आहेत. देशवासीयांनी श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या 350 व्या बलिदान दिवसानिमित्त श्रद्धापूर्वक कार्यक्रम केले. भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त देशाने त्यांना आदरांजली वाहिली. सरदार पटेल यांच्या 150 व्या जयंतीशी संबंधित आयोजनांमधून एक भारत श्रेष्ठ भारत, भावना दृढ झाली. भारतरत्न भूपेन हजारिका यांच्या जन्म शताब्दी समारंभात सूर आणि राष्ट्रीय एकात्मतेचे भाव यांची अनुभूती देशवासीयांनी घेतली. जेव्हा नागरिक भूतकाळातील अशा महान टप्पे आणि त्यांच्या पूर्वजांच्या महान योगदानाचे स्मरण करतात तेव्हा नवीन पिढी प्रेरणा घेते.

**गरिबी कमी झाली:** गेल्या दशकात, 25 कोटी नागरिकांनी गरिबीवर मात केली आहे. सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात गरिबांना सक्षम बनवण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे.

**एलपीजी:** उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत 10 कोटींहून अधिक कुटुंबांना एलपीजी जोडणी मिळाली आहे. एका वर्षात सरकारने पावणे सात लाख कोटी रुपयांहून अधिक लाभ डीबीटीच्या माध्यमातून थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवला आहे.



**पक्की घरे:** गेल्या दशकात गरिबांसाठी चार कोटी पक्की घरे बांधण्यात आली. गेल्या वर्षी 32 लाख नवीन घरे गरिबांना मिळाली.

**नळाने पाणी:** जल जीवन मिशनच्या पाच वर्षांत साडे12 कोटी नव्या कुटुंबांना पाईपद्वारे पाणी पुरवण्यात आले. गेल्या वर्षी अंदाजे एक कोटी नवीन कुटुंबांना नळाने पाण्याची सुविधा मिळाली आहे.

**सामाजिक सुरक्षा:** वर्ष 2014 च्या सुरुवातीला केवळ 25 कोटी नागरिकांपर्यंतच सामाजिक सुरक्षा योजना पोहोचू शकत होत्या. सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज सुमारे 95 कोटी भारतीयांना सामाजिक सुरक्षेचे कवच मिळाले आहे.

**आरोग्य :** गरीब रुग्णांसाठी सुरू करण्यात आलेल्या आयुष्मान भारत योजनेतून गेल्या वर्षीपर्यंत 11कोटींहून अधिक रुग्णांना मोफत उपचार दिले गेले आहेत. गेल्या जवळपास दीड वर्षात सुमारे एक कोटी वृद्धांना वय वंदना कार्ड वितरित करण्यात आले आहे. त्यांच्या मदतीने, रुग्णालयात दाखल असताना सुमारे 8 लाख वृद्धांना मोफत उपचार मिळाले आहेत. सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मोहिमेअंतर्गत साडेसहा कोटींहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारताला डोळ्यांच्या संसर्गापासून, ट्रॅकोमापासून मुक्त घोषित केले आहे ही अभिमानाची बाब आहे.

**विमा सुरक्षा:** प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि पीएम सुरक्षा विमा योजनेद्वारे करोडो गरजू नागरिकांना विमा संरक्षण मिळाले आहे. याअंतर्गत एकूण 24 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांचे वितरण करण्यात आले आहे.

**शेतकरी:** गेल्या वर्षी भारताने विक्रमी साडे तीनशे दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन केले. 150 दशलक्ष टन उत्पादनासह, भारत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला. भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मासे उत्पादक देशही बनला. दूध उत्पादनाच्या क्षेत्रातही, भारत जगातील सर्वात यशस्वी देशांपैकी एक म्हणून ओळखला जातो.

**मोबाइल-ईव्ही निर्मिती:** मोबाईल निर्मितीसारख्या क्षेत्रात भारत आता जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश बनला आहे. 2025-26 च्या पहिल्या 5 महिन्यांत, भारताची स्मार्टफोन निर्यात1 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली. या वर्षी, भारताने शंभरहून अधिक देशांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांची निर्यात सुरू केली आहे.

**पीएम ग्रामीण रस्ते योजना:** गेल्या वर्षभरात, देशात अंदाजे 18 किलोमीटर नवीन ग्रामीण रस्ते जोडले गेले आहेत. आता, भारतातील जवळजवळ संपूर्ण ग्रामीण लोकसंख्या रस्त्याने जोडली गेली आहे.

**ऐझॉलला पोहोचली रेल्वे:** मिझोराममधील ऐझॉल आणि नवी दिल्ली थेट रेल्वेमार्गाने जोडले गेले आहेत. गेल्या वर्षी जेव्हा ऐझॉल स्थानकावर प्रथमच राजधानी एक्स्प्रेसचे आगमन झाले, तेव्हा स्थानिक लोकांच्या उत्साहाने संपूर्ण देश आनंदाने भारून गेला.

**सर्वात उंच रेल्वे कमान पूल :** जम्मू-काश्मीरमध्ये जगातील सर्वात उंच रेल्वे कमान पूल चिनाब ब्रिज आणि तामिळनाडूमधील नवीन पंबन ब्रिज बांधून पायाभूत सुविधा क्षेत्रात एक मैलाचा दगड स्थापित केला आहे.



राष्ट्रपतींचे अभिभाषण पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

**जलमार्ग:** पूर्वी भारतात राष्ट्रीय जलमार्गांची संख्या 5 होती, ती आता 100 हून अधिक झाली आहे. यामुळे उत्तर प्रदेश, बंगाल आणि बिहारसह पूर्व भारतातील राज्ये लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून उदयास येत आहेत.

**प्रगती:** योजनांचे लाभ प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारने 'प्रगती' या नावाने एक नवी व्यवस्था सुरू केली आहे. डिसेंबर 2025 मध्ये 'प्रगती'ची 50 वी बैठक झाली. गेल्या वर्षभरात 'प्रगती'ने 85 लाख कोटींपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांना गती दिली आहे.

**एक लाख कोटी रुपयांची बचत:** जीएसटी सुधारणांमुळे नागरिकांनी एक लाख कोटी रुपयांची बचत केली आहे. जीएसटी कपातीनंतर 2025 मध्ये दुचाकी नोंदणी दोन कोटींपेक्षा जास्त झाली आहे.

**प्राप्तिकरात सवलत:** 12 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील कर शून्य करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. अशा सुधारणांमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचा अभूतपूर्व फायदा होत आहे.

**नवीन कामगार कायदा:** देशात एक नवीन कामगार कायदा लागू करण्यात आला आहे. यामुळे कामगारांना योग्य वेतन-भत्ते आणि इतर कल्याणकारी लाभ मिळणे सोपे झाले आहे. देशातील तरुणांना आणि महिलांना याचा विशेष फायदा होईल.



**मेट्रोचे जाळे**

2025 मध्ये भारतातील एकूण मेट्रो नेटवर्कचा 1,000 किलोमीटरचा ऐतिहासिक टप्पा पार झाला आहे. भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठे मेट्रो जाळे असलेला देश झाला आहे.

**सौर ऊर्जा:** अणुऊर्जेव्यतिरिक्त, भारत सौर ऊर्जा क्षेत्रातही वेगाने प्रगती करत आहे. पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेमुळे, देशातील सामान्य ग्राहक आता वीज उत्पादक बनत आहेत. आतापर्यंत जवळजवळ 20 लाख रूफ टॉप सोलर प्रणाली बसवण्यात आल्या आहेत.

**सीमावर्ती भागात सुलभ पोहोच:** गेल्या 11 वर्षांत, ईशान्येकडील भागात 7,200 किलोमीटरहून अधिक राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात आले आहेत. यामुळे दुर्गम, डोंगराळ, आदिवासी आणि सीमावर्ती भागात पोहोचणे सोपे झाले आहे.





## बचत गट

सरकारने 10 कोटी महिलांना बचत गटांशी जोडले आहे. आज देशात लखपती दीदींची संख्या 2 कोटींपेक्षा जास्त झाली आहे. गेल्या वर्षभरातच 60 लाखांहून अधिक महिला लखपती दीदी बनल्या आहेत. माझे सरकार लवकरच एकूण 3 कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याचे ध्येय साध्य करणार आहे.

**पीएम जनमन योजना:** योजनेअंतर्गत, सर्वात मागासलेल्या आदिवासी समुदायातील 20 हजारांहून अधिक गावांना विकासाशी जोडले जात आहे. या गावांमध्ये गरिबांसाठी सुमारे अडीच लाख घरे या योजनेतून बांधण्यात आली आहेत.

**आदिवासी शिक्षण:** गेल्या 11 वर्षांत अनुसूचित जातीच्या लाखो विद्यार्थ्यांना 42 हजार कोटी रुपयांहून अधिक मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यात आल्या आहेत. जवळपास 5 कोटी विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे. आदिवासी क्षेत्रात सरकारने 400 हून अधिक एकलव्य आदर्श निवासी शाळादेखील सुरू केल्या आहेत.

**पीएम किसान सन्मान निधी:** योजनेअंतर्गत, आतापर्यंत 4 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आली आहे.

**जी राम जी कायदा:** जी राम जी कायदा गावांमध्ये एकशे पंचवीस दिवसांच्या रोजगाराची हमी देतो. त्याचसोबत भ्रष्टाचार आणि पैशांची गळती रोखणेही शक्य होईल. आता या योजनेमुळे गावाच्या विकासाला नवी गती मिळेल.

**ऑपरेशन सिंदूर:** ऑपरेशन सिंदूरद्वारे जगाने भारतीय सैन्याचे शौर्य आणि पराक्रम पाहिले. देशाने आपल्या संसाधनांचा वापर करून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारतावरील कोणत्याही दहशतवादी हल्ल्याला कठोर आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल असा ठाम संदेश सरकारने दिला. सिंधू पाणी करार स्थगित करणेदेखील दहशतवादाविरुद्धच्या लढाईचा एक भाग आहे.

**नक्षलवादाचा अंत:** नक्षलवादाचे आव्हान 126 जिल्ह्यांवरून आठ जिल्ह्यांपुरते सीमित आहे. यापैकी फक्त 3 जिल्हे गंभीरपणे प्रभावित आहेत. देशातून लवकरच नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होईल.

**सेमीकंडक्टर:** वर्ष 2025 मध्ये चार सेमीकंडक्टर निर्मिती युनिट्सना मान्यता देण्यात आली आहे. भारतात असे 10 कारखाने लवकरच काम सुरू करणार आहेत. भारत आता नॅनोचिप निर्मितीच्या दिशेनेही मोठी पावले उचलत आहे.

**मुद्रा योजना:** तरुणांमध्ये उद्योजकता आणि स्वयंरोजगाराला चालना दिली जात आहे. या योजनेअंतर्गत, आतापर्यंत लघु उद्योजकांना 38 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे. जवळपास 12 कोटींहून अधिक कर्जे प्रथमच स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी देण्यात आली आहेत.

**स्टार्टअप इंडिया:** स्टार्टअप इंडिया कार्यक्रमाने आपली 10 वर्षे पूर्ण केली आहेत. या 10 वर्षांत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था बनला आहे. एक दशकापूर्वीपर्यंत, देशात 500 पेक्षा कमी स्टार्टअप होते. आज, देशात जवळजवळ 2 लाख स्टार्टअप नोंदणीकृत झाले आहेत.

**मोबाइल नेटवर्क:** गेल्या वर्षभरात देशात 1 लाखांहून अधिक मोबाइल टॉवरच्या माध्यमातून 4G आणि 5G नेटवर्क देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यात आले आहेत. डिजिटल इंडियाच्या विस्तारामुळे भारताला हजारो कोटींच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून स्थान मिळाले आहे. ▪




विकसित भारत संकल्पाची अमृत यात्रा

# विकास, विश्वास आणि भविष्य अशी त्रिवेणी साकारणारा अर्थसंकल्प

केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 साठी QR कोड स्कॅन करा.

# केंद्रीय अर्थसंकल्प
2026 - 2027

*गेल्या 11 वर्षात केंद्र सरकारने विकसित भारत संकल्प सिद्धीस नेण्यासाठी पाया तयार केला आहे. आता वर्ष 2026-27 चा अर्थसंकल्प देखील विकसित भारताचा विराट आणि निर्णायक संकल्प साकार करण्याच्या निरंतरतेचे प्रतीक बनला आहे. संकल्प ते सिद्धीचा मंत्र आणि अमृत यात्रेच्या दिशेने पडणारी निर्णायक पावले यासह हा केंद्रीय अर्थसंकल्पदेखील विकास, विश्वास आणि भविष्य ही त्रिवेणी साकारणारा आत्मनिर्भर भारताचा सक्षम अर्थसंकल्प बनला आहे.*



हा विकसित भारत संकल्पाच्या अमृत यात्रेसाठी एक मार्गदर्शक अर्थसंकल्प आहे. गेल्या 11 वर्षांच्या विकासाच्या यात्रेतून स्वर्णिम भारताचा पाया भक्कम करणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात गाव-गरीब-शेतकऱ्यांचे कल्याण, मातृशक्तीचे दर्शन आणि युवा भारताचा युवा विचारही आहे. यात युवांचा संकल्प, स्वप्ने आणि युवांची गतिमानताही आहे. खऱ्या अर्थाने हा अर्थसंकल्प भारतीय अर्थव्यवस्थेच्या गुणात्मक आणि संख्यात्मक परिवर्तनाचा एक उत्कृष्ट सारांश आहे. विकसित भारतासाठी सुरू झालेल्या अमृत यात्रेचे वास्तवात रूपांतर हा अर्थसंकल्प करेल. हे अर्थसंकल्प एका अचूक, सक्षम आणि सक्षम भारतासाठी अर्थसंकल्प आहे. गेल्या 11 वर्षांमध्ये सातत्य आणि दूरदृष्टीसह, सामान्य अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट, नेहमीच केंद्र सरकारने उचललेले प्रत्येक पाऊल देशातील नागरिकांना लाभदायक ठरेल आणि राष्ट्राला सक्षम करेल याची खात्री करणे, हे राहिले आहे.

या वर्षीचा केंद्रीय अर्थसंकल्प विशेष आहे. कारण कर्तव्य भवनात तयार झालेला हा देशाचा पहिला अर्थसंकल्प असून तो तीन कर्तव्यांनी प्रेरित आहे-

पहिलाः आर्थिक विकासाला गती देणे आणि ती कायम राखणे.

दुसराः नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करणे आणि क्षमता निर्माण करणे.

तिसराः सबका साथ-सबका विकास

एक काळ असा होता जेव्हा सर्वसाधारण अर्थसंकल्प, केवळ एक आर्थिक दस्तऐवज, केवळ वार्षिक लेखा मानला जात असे. परंतु 2014 पासून, या आर्थिक विवरणाचे सादरीकरण ही केवळ एक संवैधानिक आवश्यकता म्हणून मर्यादित राहिली नाही तर ती केंद्र सरकारच्या दीर्घकालीन विचारसरणीचे आणि सातत्यतेचे प्रतीक असलेला दस्तऐवज बनली आहे. संकल्प सिद्धीस नेण्याच्या विकसित भारताच्या दृष्टिकोनाचा हा परिणाम आहे.

केंद्रीय
# अर्थसंकल्प
2026 - 2027




## सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प

केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 सर्वसमावेशक असून देशातील प्रत्येक वर्गाच्या आणि प्रत्येक क्षेत्राच्या समग्र विकासावर केंद्रित आहे. निरंतर प्रगतीसह हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या संकल्पाला बळकटी देतो आणि सांगतो की ही केवळ एक घोषणा नाही तर 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या दिशेने एक ठोस प्रयत्न आहे. या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्राला, प्रत्येक वर्गाला आणि प्रत्येक नागरिकाला सक्षम करण्यासाठी एक स्पष्ट ब्लूप्रिंट आहे, त्याचसोबत प्रोत्साहन देण्यासाठी, प्रत्येक पावलावर मदत करण्यासाठी एक ठोस दृष्टिकोनदेखील आहे. विकसित भारताच्या संकल्पाचा हा अर्थसंकल्प अशा भारताच्या निर्माणाचा दृष्टिकोन आहे, जो जगात प्रत्येक क्षेत्रात अग्रणी असेल. निर्मिती क्षेत्रापासून पायाभूत सुविधा क्षेत्रापर्यंत, आरोग्यापासून पर्यटनापर्यंत, ग्रामीण क्षेत्रापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत, क्रीडा क्षेत्रापासून तीर्थक्षेत्र विकासापर्यंत, प्रत्येक गाव, प्रत्येक नगर आणि प्रत्येक शहरातील तरुण, महिला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नाला बळ देऊन समर्पितपणे ते पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे.

हा अर्थसंकल्प भारताला एक नवी ओळख मिळवणारा देश म्हणून सादर करतो, ज्याचा आपल्या शक्तीवर अतूट विश्वास आहे. एक मजबूत आर्थिक शक्ती केंद्र म्हणून तो उदयाला येत आहे. कोविडनंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी आर्थिक धोरणांनी भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन गती दिली आहे. हा अर्थसंकल्प ही गती आणखी वाढवणारा आहे. तो भारताला जागतिक मंचावर मग ते पारंपारिक क्षेत्र असो किंवा नवीन युगातील उद्योग असो, सर्वात आकर्षक गुंतवणूक केंद्र म्हणून स्थापित करण्यास साहाय्य करणारा आहे. या अर्थसंकल्पात पशुधनाद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा दूरदर्शी निर्णय घेण्यात आला आहे. पशुवैद्यकीय डॉक्टरांची संख्या वाढवणे, पशुवैद्यकीय केंद्रे आणि प्रशिक्षण केंद्रांचा विस्तार करणे पशुधन-आधारित अर्थव्यवस्था मजबूत करेल. दुग्ध आणि कुक्कुटपालन क्षेत्रांना कर्ज-संबंधित अनुदाने प्रदान करणे, 500 तलावांच्या विकासाद्वारे मत्स्यपालनाला प्रोत्साहन देणे आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश प्रदान करणे असे निर्णय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या संकल्पात मैलाचे दगड ठरतील. महात्मा गांधींचे ग्राम स्वराजचे स्वप्न साकार करण्यासाठी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना' सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल आणि विणकर, शेतकरी आणि हातमाग उद्योगाला नवे बळ प्राप्त होईल. तटीय क्षेत्रात नारळ प्रोत्साहन योजनेचा 3 कोटी शेतकऱ्यांना लाभ, काजू-कोको उत्पादन आणि निर्यातीला चालना आणि चंदन संरक्षणाच्या निर्णयातून हे दिसून येते की नवा भारत शेतकऱ्यांची समृद्धी आणि शेतीला फायदेशीर व्यवसाय बनवण्यासाठी वचनबद्ध आहे. हा अर्थसंकल्प भारतातील कनेक्टिव्हिटी नव्या उंचीवर नेईल. केंद्रीय अर्थसंकल्पात सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली आहे, जे प्रमुख आर्थिक आणि लोकसंख्या केंद्रांमधील प्रवासाचा वेळ कमी करून शहरांना जलद जोडतील.

## भविष्यातील भारताचे दर्शन

हा अर्थसंकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या धोरणात्मक सचोटीचे प्रतीक आहे, कारण सर्वसाधारणपणे निवडणुकांपूर्वी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पांमध्ये लोकप्रिय घोषणा करण्याची एक परंपराच बनली होती. परंतु या अर्थसंकल्पात कोणती लोकप्रिय घोषणा करण्याऐवजी, दीर्घकालीन दृष्टिकोनासह 'राष्ट्र प्रथम' हा विचार सर्वोच्च




ठेवण्यात आला आहे. नवीन भारताच्या नवीन धोरणांमुळे, केंद्र सरकारने गेल्या 11 वर्षांत जवळजवळ 25 कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे, आणि दुसरीकडे अर्थव्यवस्था सुद्धा वेगाने वाढते आहे. हा अर्थसंकल्प आर्थिक शिस्तीसह विकास आणि प्रगती साधण्याची केंद्र सरकारची वचनबद्धता देखील स्पष्टपणे दर्शवणारा आहे. वित्तीय तूट 4.5% पेक्षा कमी ठेवण्याचे लक्ष्य अर्थसंकल्पाने साध्य केले आहे. हा अर्थसंकल्प राष्ट्र-प्रथम हा दृष्टिकोन आणि 'भविष्यासाठी सज्ज भारता'चे स्वप्न प्रतिबिंबित करणारा आहे, जिथे विकास केवळ मुख्य शहरांपुरता मर्यादित राहणार नाही. पायाभूत सुविधांसाठी भांडवली खर्च म्हणून 12.2 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहेत. नवीन रेल्वे कॉरिडॉर, राष्ट्रीय जलमार्ग आणि सुधारित कनेक्टिव्हिटीद्वारे टियर- 2 आणि टियर-3 शहरांपर्यंत पोहोचल्यामुळे रोजगार वाढेल आणि भारताच्या महत्त्वाकांक्षा नवीन उंचीवर जातील. हा अर्थसंकल्प एमएसएमईंना भारताच्या विकास कथेचा कणा बनवण्याच्या पंतप्रधान मोदींच्या दृष्टिकोनाला साकार करणारा आहे. एमएसएमई क्षेत्राचे जागतिकीकरण करण्याचे सरकारचे निर्णय आत्मनिर्भर भारताचे ध्येय साध्य करण्यास मदत करतील. या अर्थसंकल्पात पर्यटनावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, जे शेतकऱ्यांपासून मध्यमवर्गीय आणि महिलांपर्यंत सर्व क्षेत्रांना उज्ज्वल भविष्याकडे नेईल. एमएसएमईसाठी 10,000 कोटी रूपयांच्या विकास निधीची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी टियर-2 आणि टियर-3 शहरांमध्ये एमएसएमईंना बळकटी देईल आणि त्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यास मदत करेल. 2026-27 चा सर्वसाधारण अर्थसंकल्प पंतप्रधान मोदींच्या 'शिक्षणापासून स्वयंरोजगारापर्यंत' या दृष्टिकोनाचे एक शक्तिशाली प्रतिबिंब आहे. मुख्य औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स कॉरिडॉरभोवती पाच विद्यापीठ संकुलांचा विकास शिक्षण-उद्योग समन्वयाला चालना देईल. त्याचबरोबर चार टेलिस्कोप पायाभूत सुविधांचे बांधकाम आणि अद्यतन, संशोधनाला नवीन चालना देणारे ठरेल. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनमध्ये एव्हीजीसी प्रयोगशाळा, 15000 माध्यमिक शाळा आणि 500 महाविद्यालये स्थापन करणे आणि 'शिक्षण ते रोजगार आणि उद्योग' उच्च-अधिकार समितीची स्थापना नवीन पिढीला कौशल्य देऊन प्रत्येक क्षेत्रात अग्रणी भारत निर्माण करण्याचा संकल्प प्रतिबिंबित करते.

## विकास आणि वारसा

विकास आणि वारसा या केंद्र सरकारसाठी सध्या महत्त्वाच्या बाबी आहेत. या अर्थसंकल्पात, धोलावीरासह 15 पुरातत्वीय स्थळे सांस्कृतिक स्थळे म्हणून विकसित करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय जागतिक स्तरावर भारताच्या प्राचीन संस्कृतीचे महत्व प्रस्थापित करणारा आहे. ईशान्येकडच्या पाच राज्यांमध्ये बौद्ध सर्किट्सची निर्मिती, हिमाचल, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि अराकू खोऱ्यामधील पर्वत-क्षेत्रातील पर्यटन तसेच ओदिशा, कर्नाटक आणि केरळमधील कासव पर्यटनामुळे या प्रदेशांमध्ये विकासाला नवीन चालना मिळेल. पर्यावरण-पुरक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाईल. त्याचबरोबर राष्ट्रीय आतिथ्य संस्थेच्या स्थापनेमुळे युवा वर्गाला कौशल्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, आणि पर्यटन क्षेत्रालाही बळकटी मिळेल.

वेगवान सुधारणांना चालना देणाऱ्या नव भारताच्या संकल्पाला या सर्वसाधारण अर्थसंकल्पातून निश्चितच नवीन ऊर्जा आणि नवीन गती मिळणार आहे. या दृष्टीने हा अर्थसंकल्प 2047 सालापर्यंत देशाला विकसित करण्याचा आधार बनला आहे.

**केंद्र सरकारने आपल्या कार्यकाळाच्या बाराव्या वर्षात आगेकूच करताना, सर्वसाधारण अर्थसंकल्पाद्वारे नवीन भारताची दिशा कशी निश्चित केली आहे हे अकरा क्षेत्रांमधून समजून घेऊया...**


“

*हा अर्थसंकल्प ऐतिहासिक आहे, यात देशातील नारीशक्तिचे सशक्त प्रतिबिंब दिसून येते आहे. महिला अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन यांनी सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे अफाट संधींचा राजमार्ग आहे. 2047 सालातील विकसित भारताच्या उत्तुंग महत्त्वाकांक्षेचा हा एक मजबूत पाया आहे.*


**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# केंद्रीय अर्थसंकल्प 2026-2027

## रूपया कुठून येतो




## कुठे खर्च होतो




## अर्थसंकल्प अंदाज 2026-2027

- **53.5** लाख कोटी रूपये अर्थसंकल्प अंदाज
- ₹36.5 लाख कोटी रूपये कर्जेतर पावत्या
- ₹28.7 लाख कोटी रूपये केंद्राच्या निव्वळ कर उत्पन्नाचा अंदाज
- ₹17.2 लाख कोटी रूपये एकूण बाजार कर्जाचा अंदाज
- 4.3% सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) अपेक्षित वित्तीय तूट

## मुख्य मंत्रालयांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद

- **1,06,530.42** आरोग्य आणि कुटुंब कल्याण
- **1,39,289.48** शिक्षण
- **8,84,678.28** संरक्षण
- **1,40,528.78** कृषी आणि कृषक कल्याण
- **2,81,377.32** रेल्वे मंत्रालय
- **85,522.39** शहर विकास
- **3,09,875.30** रस्ते परिवहन राजमार्ग मंत्रालय
- **1,97,023.14** ग्राम विकास
- **94,807.84** जलशक्ती
- **2,55,233.53** गृह मंत्रालय



*अंक कोटी रूपयांमध्ये

# एमएसएमई
# उद्योगापासून रोजगारापर्यंत



*या वर्षीच्या अर्थसंकल्पात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारी पाठबळामुळे रोजगार निर्मिती, नवोन्मेष आणि स्वावलंबी भारताच्या ध्येयाला पाठिंबा देणाऱ्या या क्षेत्राला स्थानिक पातळीवरून जागतिक स्तरापर्यंत झेप घेण्यासाठी लाभेल नवा जोम...*

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमईसाठी) 2026-27 चा अर्थसंकल्प — **24,566.27** कोटी रूपये

## वाढेल एमएसएमईची व्याप्ती

- अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात उद्योगांच्या विकासासाठी 10000 कोटी रुपयांचा समर्पित एमएसएमई निधी तयार करण्याची घोषणा केली आहे.
- उत्पादनात एमएसएमईचा वाटा 35.4 टक्के, निर्यातीत 48.58 टक्के आणि जीडीपीमध्ये 31.1 टक्के आहे.
- आयसीएआय, आयसीएसआय आणि आयसीएमएआय सारख्या व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना टियर 2 आणि टियर 3 शहरांमध्ये कॉर्पोरेट मित्र विकसित करण्यास मदत केली जाईल. हे प्रमाणित नीम-व्यावसायिक एमएसएमईंना परवडणाऱ्या किमतीत अनुपालन आवश्यकता पूर्ण करण्यास मदत करतील.

**तरलता सहाय्य : ट्रेड्ससह एमएसएमईंना सात लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी उपलब्ध झाला आहे. क्षमतांचा लाभ घेण्यासाठी चार प्रस्ताव...**

- केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांनी एमएसएमईकडून केल्या जाणाऱ्या सर्व खरेदीसाठी ट्रेड्सला अनिवार्य पेमेंट प्लॅटफॉर्म बनवावे.
- ट्रेड्स प्लॅटफॉर्मवर सीजीटीएमएसई द्वारे पत हमी सहाय्य यंत्रणा.
- एमएसएमईकडून सरकारी खरेदीबाबत वित्त पुरवठादारांना माहिती देण्यासाठी जेमला ट्रेड्ससोबत जोडणे.
- ट्रेड्समधील प्राप्तीला मालमत्ता-समर्थित प्रतिभूति म्हणून सुरू केले जाईल, ज्यामुळे दुय्यम बाजारपेठेचा विस्तार होईल, तसेच रोख आणि देयक व्यवस्थेमध्ये सुधारणा होईल.

### आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सहा प्रस्ताव

आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि ती गती टिकवून ठेवण्यासाठी सहा क्षेत्रांमध्ये उपक्रम प्रस्तावित...

- 7 धोरणात्मक आणि आघाडीच्या क्षेत्रांमध्ये उत्पादनाला वेग देणे.
- वारसा औद्योगिक क्षेत्रांचे पुनरुज्जीवन.
- 'चॅम्पियन एमएसएमई' ची निर्मिती.
- पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देणे.
- दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा आणि शाश्वततेची खातरजमा करणे.
- शहरी आर्थिक क्षेत्र विकसित करणे

### एमएसएमईना चॅम्पियन करण्यासाठी त्रिस्तरीय धोरण: इक्विटी सपोर्ट

- 10000 कोटी रुपयांचा एसएमई विकास निधी, आत्मनिर्भर भारत निधीमध्ये भर
- तरलता सहाय्य: ट्रेड्समधून सात लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त तरलता
- व्यावसायिक सहाय्य: “कॉर्पोरेट मित्र” आणि सुलभ अनुपालन

केंद्रीय **अर्थसंकल्प** 2026 - 2027

## आर्थिक सुधारणा

# सुधारणा एक्सप्रेसमुळे भारत होईल आणखी मोठी अर्थव्यवस्था



*जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने आगेकूच करणारा भारत आर्थिक, व्यापारी आणि जीवनमानातील सुधारणांवरही भर देतो आहे. गेल्या अकरा वर्षांत, सरकारने कृती, सुधारणा आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य दिले आहे. आता, 2026-27 या आर्थिक वर्षासाठीच्या अर्थसंकल्पाने या प्रवासाला आणखी गती दिली आहे...*

**गरीब, शोषित आणि उपेक्षितांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्रिस्तरीय दृष्टिकोन हा सरकारचा 'संकल्प'**

1. संरचनात्मक सुधारणांची गती शाश्वत, अनुकूल आणि प्रगतीशील राखावी लागले.
2. मजबूत आणि लवचिक वित्तीय क्षेत्र हे बचत करण्याचा, भांडवलाचा योग्य वापर करण्याचा, आणि जोखीम व्यवस्थापनाचा पाया आहे.
3. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे प्रगत तंत्रज्ञान सुशासनात सहायक ठरू शकते.

केंद्र सरकारने रोजगार निर्मिती, उत्पादकता वाढविण्यासाठी आणि विकासाला वेग देण्यासाठी अनेक आर्थिक सुधारणा हाती घेतल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 साली स्वातंत्र्यदिनी केलेल्या घोषणांनंतर 350 पेक्षा जास्त सुधारणा लागू करण्यात आल्या आहेत.

## विकसित भारतासाठी सज्ज होईल बँकिंग

भारतातील बँकिंग क्षेत्र आज पूर्वीपेक्षा जास्त मजबूत आहे. मजबूत आर्थिक स्थिती, ऐतिहासिक नफा, सुधारित कर्ज गुणवत्ता आणि 98% पेक्षा जास्त गावांमध्ये बँकिंग सेवांच्या उपलब्धतेसह या क्षेत्राची आणखी प्रगती करण्यासाठी आणि भारताच्या भविष्यातील विकासाच्या गरजांनुसार या क्षेत्राचा व्यापक आढावा घेण्यासाठी 'विकसित भारतासाठी बँकिंगवरील उच्च-स्तरीय समिती' स्थापन केली जाईल.



## समभागांची फेरखरेदी मानली जाईल भांडवली नफा

समभागांच्या फेरखरेदीमधून मिळणारी रक्कम आता लाभांश न मानता भांडवली नफा म्हणून गणली जाईल. शिवाय फेरखरेदीचे कर दर प्रवर्तकांसाठी वेगळे असतील. देशांतर्गत कंपन्यांच्या प्रवर्तकांवर 22% आणि इतर कंपन्यांच्या प्रवर्तकांवर 30% कर आकारला जाईल. जलद पैसे कमविण्यासाठी सट्टेबाजी बाजार म्हणून शेअर बाजारात फ्युचर्स आणि ऑप्शन्स ट्रेडिंग करणाऱ्यांना परावृत्त करण्यासाठी सरकारने फ्युचर्स ट्रेडिंगवरील सिक्युरिटी ट्रान्सफर ड्युटी (STT) सध्याच्या 0.02% वरून 0.05% पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. ऑप्शन प्रीमियम आणि ऑप्शन्स ट्रेडिंगवरील एसटीटी 0.1% आणि 0.125% वरून 0.15% पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे.

## जीवनमान सुलभता

### कायदेशीर अडचणी कमी करण्यात आल्या... 1 एप्रिलपासून नवा आयकर कायदा लागू होईल

आयकर वर्गात किंवा सवलतीमध्ये कोणतेही बदल नाहीत. 1 एप्रिल 2026 पासून आयकर कायदा, 2025 लागू होईल.

सरलीकृत आयकर नियम आणि अर्ज लवकरच अधिसूचित केले जातील. सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी नवीन अर्जांची पुन्हा रचना केली आहे.

मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने ठरवलेल्या व्याजदरावर सामान्य व्यक्तीला आयकर भरावा लागणार नाही. त्यावर कोणताही टीडीएस देखील कापला जाणार नाही.

परदेशी प्रवास पॅकेजेसच्या विक्रीवर आकारण्यात येणारा टीसीएसचा दर, कोणत्याही रकमेची मर्यादा न ठेवता, सध्याच्या 5% आणि 20% वरून 2% पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव आहे.

शिक्षण आणि वैद्यकीय खर्चासाठी उदारीकृत धनप्रेषण योजनेअंतर्गत (**LRS**) **TCS** दर 5% वरून 2% पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव.

टीडीएसबाबतचा गोंधळ दूर करण्यासाठी, कामगार सेवांचा पुरवठा कंत्राटदारांना देयके म्हणून वर्गीकृत करण्याचा प्रस्ताव आहे. या सेवांवरील टीडीएस दर फक्त 1% किंवा 2% असेल.

लहान करदात्यांना स्वयंचलित नियम-आधारित प्रक्रियेद्वारे करनिर्धारण अधिकाऱ्याकडे अर्ज न करता कमी किंवा शून्य वजावटीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी एक नवीन योजना.

नाममात्र शुल्क भरून विवरणपत्रांमध्ये सुधारणा दाखल करण्याची अंतिम मुदत 31 डिसेंबरवरून 31 मार्चपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव.

कर विवरणपत्रे दाखल करण्यासाठी वेगवेगळ्या अंतिम मुदती असतील. आयटीआर-1 आणि आयटीआर-2 दाखल करणाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच 31 जुलैपर्यंत मुदत असेल. ऑडिट न झालेल्या व्यावसायिक संस्था आणि ट्रस्टना 31 ऑगस्टपर्यंत मुदत असेल.

अनिवासी व्यक्तीला आता स्थावर मालमत्तेच्या विक्रीवर टीडीएस कापण्यासाठी टीएएन घेण्याची आवश्यकता नाही. निवासी खरेदीदार त्यांच्या पॅनवर आधारित इनव्हॉइसद्वारे टीडीएस जमा करू शकतील.

विद्यार्थी, युवा व्यावसायिक, तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगार, परदेशात राहणारे अनिवासी भारतीय आणि इतर लहान करदात्यांसाठी एक नवीन योजना प्रस्तावित आहे. त्यांना परदेशातील मालमत्ता उघड करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिली जाईल.

## शिक्षा आणि खटल्याचे सुलभीकरण

- कर निर्धारण आणि दंड कार्यवाही एकाच सामान्य आदेशात एकत्र करण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या अपील कालावधीत करदात्यांना दंडाच्या रकमेवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. आधी जमा करायची रक्कम 20% वरून 10% पर्यंत कमी केली जात आहे.




- पुनर्मूल्यांकन प्रक्रियेनंतरही करदात्याला संबंधित वर्षाच्या दरापेक्षा 10% अतिरिक्त कर भरून परतावे अद्ययावत करता येतील.
- उत्पन्न कमी दाखवल्याबद्दल दंड आणि खटल्यापासून मिळणारी सवलत आता चुकीची माहिती दिल्यासही लागू होईल. तथापि, अशा प्रकरणांमध्ये, करदात्याला अतिरिक्त आयकर म्हणून 100% कर रक्कम देखील भरावी लागेल.
- हिशेब किंवा कागदपत्रे न देणे आणि वस्तूंच्या देयकांवर टीडीएस न भरणे हा गुन्हा मानला जाणार नाही. किरकोळ प्रकरणांमध्ये केवळ दंड आकारला जाईल.



## आरोग्य

# अर्थसंकल्पातील आरोग्य तरतूदी म्हणजे सामाजिक सुरक्षेचा कणा

*अर्थसंकल्पातील आरोग्यासाठीच्या तरतूदी केवळ पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करत नाही तर तळागाळातील व्यक्तींना सुलभ, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करण्याचा संकल्प देखील करतात...*

| | |
|---|---|
| आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयासाठी अर्थसंकल्पीय तरतूद | **1,06,530.42** कोटी रूपये |
| **194%** | पेक्षा जास्त वाढ नोंदविण्यात आली गेल्या 12 वर्षांमध्ये आरोग्य क्षेत्रासाठीच्या तरतुदीमध्ये |

### कर्करोगाची औषधे स्वस्त
कर्करोगाच्या रुग्णांसाठी असलेल्या 17 जीवनरक्षक औषधांवर मूलभूत सीमाशुल्कातून पूर्ण सूट प्रस्तावित आहे. त्याशिवाय विशिष्ट वैद्यकीय कारणांसाठीची औषधे आणि अन्नपदार्थांच्या वैयक्तिक आयातीवला आयात शुल्कातून सूट देण्याबरोबरच, यात आणखी सात अतिरिक्त दुर्मिळ आजारांचा समावेश करण्यात आला आहे.

### मानसिक आरोग्य आणि ट्रॉमा केअर
मानसिक आरोग्यासाठी निमहांस-2 ची स्थापना केली जाईल. रांची आणि तेजपूर येथील राष्ट्रीय मानसिक आरोग्य संस्थांना देखील प्रादेशिक सर्वोच्च संस्थांमध्ये श्रेणीसुधारित केले जाईल.



### संशोधन
2026-27 च्या अर्थसंकल्पात वैद्यकीय संशोधनाला चालना देण्यासाठी 4821 कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे, या तरतुदीत ही 24% वाढ आहे.



### वृद्धांचे उपचार
वयोवृद्धांवर उपचार करण्यासाठी पुढील पाच वर्षांत 15 लाख आरोग्य सेवा प्रदात्यांना वैद्यकीय आणि संबंधित सेवांसाठी प्रशिक्षित केले जाईल.

### वैद्यकीय पर्यटन सेवा केंद्र
भारताला वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी, खाजगी क्षेत्राच्या भागीदारीत पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रे स्थापन करण्यासाठी राज्यांना सहाय्य केले जाईल, ज्यामध्ये वैद्यकीय, शैक्षणिक आणि संशोधन सुविधांचा समावेश असेल.

### जिल्हा रुग्णालय
आपत्कालीन आणि ट्रॉमा केअर सेंटर्स स्थापन करून 50% जिल्हा रुग्णालयांची क्षमता वाढवली जाईल.

## एएचपी संस्थेची स्थापना




आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी (**AHPs**) विद्यमान संस्था अद्ययावत केल्या जातील. त्याशिवाय खाजगी आणि सरकारी क्षेत्रात नवीन एएचपी संस्था स्थापन केल्या जातील. यामध्ये ऑप्टोमेट्री, रेडिओलॉजी, भूल, ओटी तंत्रज्ञान, उपयोजित मानसशास्त्र आणि वर्तणुकीय आरोग्यासह 10 निवडक विषय क्षेत्रांचा समावेश असेल. पुढील पाच वर्षांत एक लाख एएचपी संस्था स्थापन केल्या जातील.

## पशुवैद्य



पशुवैद्यकीय व्यावसायिकांची संख्या 20000 पेक्षा जास्त करण्यासाठी पत-संलग्न भांडवली अनुदाने प्रस्तावित आहेत. खाजगी क्षेत्रात खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि प्रजनन सुविधांच्या स्थापनेला पाठिंबा देणे हा यामागील उद्देश आहे.



## बायोफार्मा शक्ती (ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाद्वारे आरोग्यसेवेसाठी धोरण)

देशात मधुमेह, कर्करोग आणि स्वयंप्रतिकार विकार यांसारखे असंसर्गजन्य आजार झपाट्याने वाढत आहेत. भारताला जागतिक बायोफार्मा उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी पुढील पाच वर्षांत १०,००० कोटी खर्चासह बायोफार्मा शक्ती प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये तीन नवीन राष्ट्रीय औषध शिक्षण आणि संशोधन संस्थांची स्थापना आणि सात विद्यमान संस्थांचे अपग्रेडिंग, बायोफार्मा-केंद्रित नेटवर्क तयार करणे समाविष्ट असेल. यामुळे १,००० हून अधिक मान्यताप्राप्त भारतातील क्लिनिकल चाचणी स्थळांचे नेटवर्क देखील तयार होईल.

## आयुष

### तीन नवीन एम्सची स्थापना

- पारंपारिक औषध प्रणालीनुसार उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी तीन नवीन अखिल भारतीय आयुर्वेद संस्था स्थापन केल्या जातील.
- आयुष फार्मसी, औषध चाचणी प्रयोगशाळा, पुराव्यावर आधारित संशोधनाबरोबरच जामनगर येथे WHO ग्लोबल सेंटर फॉर ट्रॅडिशनल मेडिसिनचेही अद्यतन केले जाईल

आयुष मंत्रालयासाठी अर्थसंकल्पीय तरतूद
**4,408.93** कोटी रूपये



“

*वैद्यकीय केंद्रांच्या निर्मितीतून, सहयोगी आरोग्य व्यावसायिकांच्या माध्यमातून, ऑरेंज इकॉनॉमी अर्थात ऑडिओ व्हिज्युअल्स, गेमिंगला प्रोत्साहन देऊन, पर्यटनाला प्रोत्साहन देऊन, आणि खेलो इंडिया मोहिमेच्या माध्यमातून युवा वर्गासाठी नवीन संधींची कवाडे खुली होतील.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

केंद्रीय
# अर्थसंकल्प
2026 - 2027

## आत्मनिर्भर भारत
# वस्त्रोद्योगाचे नव्याने विणकाम



*केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राला रोजगार निर्मिती, निर्यात वृद्धी आणि आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या ध्येयाशी जोडून विशेष महत्व देण्यात आले आहे. परंपरागत हातमागापासून ते आधुनिक मानव-निर्मित फायबर आणि तंत्रज्ञानावर आधारित वस्त्र निर्माणापर्यंत, संपूर्ण मूल्य साखळी सशक्त करण्यावर सरकारने लक्ष केंद्रीत केले असल्याचे स्पष्ट दिसून येते....*

वस्त्रोद्योग मंत्रालयाचे आर्थिक वर्ष 2026-27 चे अर्थसंकल्प | **5729.01** कोटी रूपये

सरकारने प्रतिस्पर्धात्मकता, आत्मनिर्भरता आणि रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी एक एकीकृत कार्यक्रमाचा प्रस्ताव केला आहे. त्यामध्ये पाच उप-घटकांचाही समावेश आहे.

- **राष्ट्रीय फायबर योजना:** फायबर म्हणजे तंतू क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरता प्राप्त करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही योजना रेशीम, लोकर आणि ताग यांच्यासारख्या नैसर्गिक तंतू, मानव निर्मित तंतू आणि आधुनिक युगातील तंतू यांना समर्थन प्रदान करेल.
- **वस्त्र विस्तार आणि रोजगार योजना:** या योजनेचा उद्देश्य यंत्रसामुग्री, उन्नत तंत्रज्ञान, आणि संयुक्त चाचणी आणि प्रमाणन केंद्रांची स्थापना करण्यासाठी भांडवली मदतीच्या माध्यमातून पारंपरिक वस्त्र समूहांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.
- **राष्ट्रीय हातमाग आणि हस्तशिल्प कार्यक्रम:** हातमाग आणि हस्तशिल्प यांच्यासाठी सध्या असलेल्या योजनांचे एकीकरण करण्यात येईल आणि एकच एकीकृत राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून मजबुतीने राबविण्यात येईल. यामुळे विणकर आणि कारागिर यांना केंद्रस्थानी ठेवून आणि प्रभावी मदत देणे सुनिश्चित करता येईल.
- **वस्त्र- पर्यावरणीय उपक्रम :** या उपक्रमाचा उद्देश वैश्विक स्तरावर प्रतिस्पर्धा, पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून शाश्वत वस्त्रे आणि प्रावरणे यांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे आहे.

“

*या अर्थसंकल्पामध्ये मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला नवी गती देण्यासाठी महत्त्वाकांक्षी पथदर्शी कार्यक्रम सादर केला आहे. या अर्थसंकल्पामध्ये नवे उदयोन्मुख उद्योग, म्हणजेच 'सनराईज' क्षेत्राला ज्या मजबुतीने सहकार्य करून समर्थन दिले आहे, ते अभूतपूर्व आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### व्यापार करण्याची सुविधा

भारताबाहेर वास्तव्य करणाऱ्या गुंतवणुकदारांना (पीआरओआय) सूचीबद्ध भारतीय कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी दिली जाईल. एकूण गुंतवणुकीची मर्यादा 10 टक्क्यांवरून वाढवून 24% केली आहे. त्याचबरोबर कोणत्याही एका गुंतवणुकदारासाठी असलेली गुंतवणुकीची मर्यादा 5 टक्क्यांवरून वाढवून 10% करण्यात येईल.





## समर्थ 2.0

प्रगत कौशल्य कार्यक्रम उद्योग आणि शैक्षणिक संस्थांबरोबर सखोल सहकार्याद्वारे वस्त्रोद्योगातील कौशल्य तंत्राचे आधुनिकीकरण करेल.

## महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना

खादी, हातमाग आणि हस्तशिल्प यांना सुदृढ बनविण्यासाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज योजनेचा प्रारंभ करण्यात येईल. यामुळे वैश्विक बाजारपेठेमध्ये स्थान मिळू शकेल आणि खादी एक ब्रँड म्हणून स्थापन करण्यासाठी मदत मिळेल. यासंबंधीचे प्रशिक्षण कौशल्य, प्रक्रिया आणि उत्पादन गुणवत्ता यांच्याशी सुसंगत बनवू शकेल आणि त्यासाठी मदतही होईल.

## रेअर अर्थ

नोव्हेंबर, 2025 मध्ये रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेट योजना सुरु करण्यात आली होती. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये खाणकाम, खनिजे शुद्धीकरण, संशोधन आणि उत्पादन यांना प्रोत्साहन देण्यासाठी दुर्लभ, दुर्मिळ खनिज कॉरिडॉर स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या कॉरिडॉरमुळे खनिज संपन्न राज्यांना म्हणजेच ओडिशा, केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू यांना मदत मिळेल.

## कंटेनर उत्पादन

10,000 कोटी रूपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह आगामी पाच वर्षांच्या कालावधीकरिता कंटेनर उत्पादन योजना सुरु केली जाईल.

*आम्ही विकासाची गती कायम ठेवण्यासाठी मार्ग तयार करीत आहोत. आम्हाला विकासाची गती किंवा सतत आर्थिक विकासाची सुनिश्चिती करायची आहे. प्रामुख्याने, आपण संरचनात्मक सुधारणांबरोबरच इकोसिस्टम निर्माण करण्यावर भर देत आहोत. आम्ही उत्पादकता सुधारण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सक्षम वातावरण निर्मितीसाठी विविध उपक्रम हाती घेत आहोत..*

***-निर्मला सीतारमण, केंद्रीय अर्थ मंत्री***

## व्यापक आणि एकीकृत धोरणात्मक पाया तयार करण्यासंबंधी घोषणा

अर्थसंकल्प 2026-27 मध्ये श्रम निर्मिती प्रधान वस्त्रोद्योग क्षेत्रावर विशेष भर देण्यात आला आहे. कारण या क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण करण्याची क्षमता मोठी आहे. तसेच निर्यात, ग्रामीण भागात उत्पन्नाचे साधन आणि शाश्वत उत्पादन करणे, ही या क्षेत्राची महत्वपूर्ण भूमिका आहे. फायबर पासून ते फॅशनपर्यंत, ग्रामीण उद्योगांपासून ते वैश्विक बाजारपेठेपर्यंत, वस्त्रोद्योग मूल्य साखळी मजबूत करण्यासाठी एक व्यापक आणि एकीकृत धोरणात्मक पाया तयार करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

## मेगा टेक्सटाइल पार्क

सरकारने मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या पार्कमुळे वस्त्रोद्योगातील तंत्रज्ञानाच्या विकासालाही प्रोत्साहन मिळेल.

## व्यापार सवलत योजना

वस्त्रोद्योगातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना रोख सवलत मिळावी, यासाठी सरकारने 'टीआरईडीएस' म्हणजेच व्यापारी सवलत योजनेची प्रभावशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख उपायांची घोषणा केली आहे.

## वस्त्र, चामडे आणि सागरी उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण घोषणा

- शुल्क-मुक्त आयात केलेल्या कच्च्या मालाचा उपयोग करून तयार केलेले कापड, चामड्याचे कपडे, चामडे अथवा कृत्रिम चामड्याची पादत्राणे आणि इतर चामड्याच्या उत्पादनांच्या निर्यातदारांसाठी निर्यातीचा कालखंड वाढवून 12 महिने करण्यात आला आहे.
- या उपायांमुळे निर्यातदारांना व्यवसाय करण्यासाठी लवचिक धोरणाची मदत होईल, अनुपालन सुविधापूर्ण होईल आणि खेळत्या भांडवलाच्या उपलब्धतेमध्ये सुधारणा होईल.
- 'टीआरईडीएस'च्या माध्यमातून वस्त्रोद्योगातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना रोख मदत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

केंद्रीय
अर्थसंकल्प
2026 - 2027

महिला

# समृद्धीच्या दिशेने सातत्याने वाटचाल

*केंद्र सरकार महिलांना शिक्षित, समृद्ध बनूवन सशक्त करण्याच्या दिशेने सातत्याने काम करीत आहे. याच मालिकेमध्ये केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पामध्ये महिलांशी संबंधित अनेक घोषणा केल्या आहेत. त्यांचा थेट लाभ देशाच्या निम्म्या लोकसंख्येला होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये महिलांनी निर्माण केलेल्या आणि महिला संचलित स्वयं सहायता समूहांच्या आधुनिक यंत्रणेला प्राधान्य दिले आहे. त्यामागे उद्देश्य असा आहे की, प्रत्येक घरापर्यंत समृद्धी पोहोचेल, याची सुनिश्चिती करणे...*




## महिला वसतिगृह

केंद्र सरकारने देशातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिला वसतिगृहाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम शिक्षण क्षेत्रामध्ये लैंगिक समानता, सुरक्षा आणि सशक्तीकरण यांना मजबूत करण्यामध्ये एक मैलाचा दगड आहे.

## स्वयं सहायता उद्योजिका 'शी मार्ट' ची व्यवस्था

- लखपती दीदी योजनेला मिळत असलेले यश असेच पुढे इतर क्षेत्रातही मिळावे, यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये 'स्वयं सहायता उद्योजिका- 'शी मार्ट' सुरू करण्यासाठी व्यवस्था केली आहे.
- पशुपालन, शेती संबंधित कामे आणि इतर कार्यांमध्ये सक्रिय असलेल्या माता-भगिनी आता केवळ उत्पादन घेण्यापर्यंत सीमित न राहता, त्यांना उद्योजिका म्हणून पुढे जाता आले पाहिजे, या उद्देशाने नवीन उपक्रम राबविण्यात येणार आहेत.
- प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिलांव्दारे तयार करण्यात आलेल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून सामाजिक किरकोळ विक्री केंद्रांची स्थापना करण्यात येईल. या केंद्रांमुळे स्वयं मदत गट आणि ग्रामीण भगिनींनी तयार केलेल्या उत्पादनांना नवीन बाजारपेठ मिळेल.
- त्याचबरोबर 'शी-मार्क' बिल्ला प्रदर्शित केला जाईल, यामुळे महिलांना अगदी सहजतेने वितीय सुविधा सुनिश्चित होईल.

## लैंगिक समानतेसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद




**2026-27 मध्ये 'जेंडर बजेट अनुमान' (जीबीएस) मध्ये महिला आणि बालिका कल्याण यासाठी पाच लाख कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद 2025-26 मधील 4.49 लाख कोटी रूपयांच्या तुलनेमध्ये 11.36 टक्के जास्त आहे.**



# युवा
# उघडणार संधींची नवी दारे

*संसदेमध्ये अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करताना, असे म्हटले की, "हे अंदाजपत्रक युवा शक्तीचे आहे. यामध्ये युवावर्गाचा विचार केला गेला आहे. युवकांची स्वप्ने आहेत, युवकांचे संकल्पही आहेत आणि त्याचबरोबर युवावर्ग ज्या वेगाने पुढे जातो, तो वेगही आहे. अर्थसंकल्पामध्ये ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत, त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अग्रणी, नवोन्मेषी आणि नवीन आशय निर्माण करणारी मंडळी तयार होतील. त्याचबरोबर 'खेलो इंडिया मिशन' च्या माध्यमातून युवावर्गासाठी उघडणार संधींची नवी दारे...*

## शिक्षण

- सरकार मोठ्या औद्योगिक आणि लॉजिस्टिक कॉरिडॉरच्या परिसरामध्ये आव्हानात्मक मार्गांच्या माध्यमातून पाच विद्यापीठांच्या परिसरांची निर्मिती करण्यासाठी राज्यांना मदत करणार आहे.
- भारताच्या पूर्वेकडील क्षेत्रामध्ये एका नवीन राष्ट्रीय डिझाइन संस्थेची स्थापना करण्याचा प्रस्ताव आहे.
- खगोल भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र यांना प्रोत्साहन देण्यासाठी 4 टेलिस्कोप सुविधांची स्थापना करण्यात येईल.

अर्थसंकल्प

शिक्षण मंत्रालयासाठी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद **1,39,289.48** कोटी रूपयांपर्यंत पोहोचली आहे

जी अर्थसंकल्पीय अंदाज 2025-26 च्या तुलनेत 8.27% वाढ आहे.

## शिक्षणातून रोजगार आणि उद्योग

विकसित भारताचे प्रमुख संचालक म्हणून सेवा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करणारी उच्चाधिकार असलेली 'शिक्षण ते रोजगार आणि उद्योग' स्थायी समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव. हा निर्णय भारताला वर्ष 2047 पर्यंत 10 टक्के वैश्विक भागीदारीसह अग्रगण्य बनवेल.

## ऑरेंज इकोनॉमी

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी, मुंबईला 15,000 माध्यमिक विद्यालये आणि 500 महाविद्यालयांमध्ये 'एव्हीजीसी'कंटेंट क्रिएटर लॅब (सीसीएल) स्थापन करण्यासाठी मदत करण्याचा प्रस्ताव आहे.

## क्रीडा क्षेत्र

'खेलो इंडिया' कार्यक्रमाच्या माध्यमातून सुरू असलेल्या क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंताच्या विकासाचे प्रयत्न असेच पुढे सुरू रहावेत, यासाठी आगामी दशकामध्ये क्रीडा क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'खेलो इंडिया मिशन' सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

### अनेक सुविधा प्रदान करेल 'खेलो इंडिया मिशन'

- एकात्मिक प्रतिभा विकास मार्ग, जो मूलभूत, मध्यम आणि उच्चभ्रू पातळीवरील प्रशिक्षण केंद्रांद्वारे समर्थित असेल.
- प्रशिक्षक आणि सहायक कर्मचारी यांचा व्यवस्थित विकास करण्यात येईल.
- क्रीडा विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे एकीकरण.
- क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धा आणि लीग आयोजित करणे.
- प्रशिक्षण आणि स्पर्धा यांच्यासाठी क्रीडा संबंधित पायाभूत सुविधांचा विकास करणे.



केंद्रीय
# अर्थसंकल्प
2026 - 2027

## कृषी क्षेत्र
# शेतकऱ्यांचे स्वप्न होणार पूर्ण

*भारताच्या कृषी, दुग्ध, मासेमारी क्षेत्र यांना सरकारने नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्येही नारळ, काजू, कोको आणि चंदन यांच्या उत्पादनाशी निगडित शेतकरी बांधवांसाठी अनेक महत्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. मत्स्य व्यवसाय आणि पशुपालन यामध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन दिल्यास गावांमध्येच निर्माण होणार रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या भरपूर संधी...*



**1,70,944** कोटी रूपये

अनुदानाची तरतूद स्वस्त खते आणि खत पुरवण्यासाठी आहे, जेणेकरून उत्पादन खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

## उच्च मूल्य कृषी

सरकार देणार उच्च मूल्य असलेल्या पिकांच्या शेतीला समर्थन...

- किनारपट्टी क्षेत्रामध्ये नारळ, चंदन, कोको, काजू यासारख्या उच्च मूल्य असलेल्या पिकांना मदत दिली जाईल.
- नारळ संवर्धन योजनेचा प्रस्ताव
- ईशान्येकडील भागामधील अगर च्या झाडांना आणि डोंगराळ भागातील बदाम, अक्रोड आणि जर्दाळू यांच्यासारख्या गरयुक्त फळांना प्रोत्साहन दिले जाईल.
- वर्ष 2030 पर्यंत भारतीय काजू आणि कोको यांना प्रीमियम वैश्विक ब्रॅंड च्या स्वरूपामध्ये बदलण्यासाठी समर्पित कार्यक्रमाचा प्रस्ताव.

## शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे

- शेतकरी बांधवांचे उत्पन्न वाढविण्यासाठी मत्स्य पालन, पाचशे जलाशय आणि अमृत सरोवरांचा एकीकृत विकास, पशुपालन, उच्च मूल्य असलेल्या पिकांना प्रोत्साहन देण्यात येईल.



## भारत विस्तार

- केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये भारत-विस्तारचा प्रस्ताव. हे एक बहुभाषीय एआय साधन आहे. त्याला एआय प्रणालीसह कृषीविषयक कार्यांसाठी आयसीएआर पॅकेजसह 'ॲग्री स्टॅक पोर्टल'या स्वरूपात एकत्रित करण्यात आले आहे.

## ग्रामीण विकास विभागाच्या अर्थसंकल्पात वाढ

- ग्रामीण विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये 21% ची वाढ. ग्रामीण विकास आणि कृषी विभाग मिळून ग्रामीण विकास आणि कृषी मंत्रालयाचे अर्थसंकल्प आता 4 लाख 35 हजार 779 कोटी रूपयांपेक्षा जास्त झाले आहे.
- कृषी विभागाचे अर्थसंकल्प वाढवून या वर्षी 1,32,561 कोटी रूपये करण्यात आले आहे. कृषी शिक्षण आणि संशोधन यासाठी 9,967 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे संशोधन आणि नवोपक्रम यांना बळ मिळेल.
- राष्ट्रीय फायबर योजनेअंतर्गत रेशीम, लोकर आणि ताग यांच्या धाग्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या क्षेत्राशी संबंधित शेतकरी बांधवांना त्याचा थेट लाभ मिळेल.

## सहकार क्षेत्रासाठी अनेक प्रोत्साहनांचा प्रस्ताव

- प्राथमिक सहकारी समितीव्दारे उत्पादित पशुचारा आणि कापूस यांच्या बियाणांच्या पूर्तीसाठी दर कमी करण्याची परवानगी.
- नवीन कर व्यवस्थेअंतर्गत अंतर-सहकारी समिती लाभांशाच्या उत्पन्नावर दर कमी करण्याची परवानगी.



# दिव्यांगजन
## प्रतिष्ठा, संधी आणि आत्मनिर्भरता

*दिव्यांगजन सशक्तीकरणाला सामाजिक जबाबदारीने पुढे नेऊन समावेशक विकासाच्या मुख्य प्रवाहाला जोडण्याच्या दिशेने यावर्षीचा अर्थसंकल्प एक ठोस रोडमॅप सादर करतो. शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, सहायक उपकरणांची उपलब्धता आणि रोजगाराच्या संधींचा विस्तार यावर लक्ष केंद्रीत केलेल्या तरतुदींच्या माध्यमातून अर्थसंकल्पाचा उद्देश दिव्यांगांना आत्मनिर्भर बनवणे आणि प्रतिष्ठेच्या जीवनासह समान संधी संधी प्रदान करणे आहे...*

दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाचा आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये अर्थसंकल्प | **1669.72** कोटी रुपये

## राहणीमान सुलभता

### दिव्यांगजन कौशल्य योजना
प्रत्येक दिव्यांग समूहांसाठी उद्योगाशी संबंधित आणि विशेष प्रशिक्षणाद्वारे चांगल्या रोजगाराच्या संधी सुनिश्चित केल्या जातील. उद्योगाच्या माध्यमातून सन्मानजनक उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. दिव्यांग महिलांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात येईल. योजनेअंतर्गत आयटी, एव्हीजीसी आणि सेवा क्षेत्रांमध्ये दिव्यांगजनांना अनुकूल प्रशिक्षण दिले जाईल.

### सशस्त्र दलांसाठी दिव्यांगता निवृत्ती वेतन
अर्धसैनिक कर्मचारींसह सशस्त्र दलांतील कर्मचाऱ्यांसाठीही दिव्यांगता निवृत्ती वेतन, सेवा अटी आणि दिव्यांगता अटींचा समावेश केला गेला आहे. ज्याठिकाणी कार्मिक, सेना, नौसेना अथवा वायू सेना सेवा यांच्यामुळे अथवा त्याठिकाणी कार्य करताना काही आपत्तीमुळे शारीरिक दुर्बलता आली असेल आणि सेवेतून बाहेर पडावे लागले असेल, तर त्यांच्यासाठी विशेष सवलतीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### वृध्दांवरील उपचार
खाजगी क्षेत्राबरोबर भागीदारी करून वृद्ध व्यक्तींसाठी आरोग्य सेवा परिसंस्था आणि त्याच्याशी संलग्न देखभाल सेवा केंद्रांची निर्मिती करण्यात येईल. दीड लाख देखभाल सेवा प्रदात्यांना आगामी काही वर्षांमध्ये याचे प्रशिक्षण दिले जाईल.

### दिव्यांग आश्रय योजना
**सर्व पात्र दिव्यांगजनांपर्यंत उच्च-गुणवत्ता असलेल्या सहायक उपकरणांची वेळेवर पोहोच**

- संशोधन आणि विकास तसेच एआय एकीकरण यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी भारतीय कृत्रिम अंग निर्माण मंडळ (एएलआयएमसीओ) या संस्थेला मदत उपलब्ध करून दिली जाईल.
- पीएम दिव्याशा केंद्रांना मजबूत करणे आणि आधुनिक किरकोळ विक्री स्वरूपामध्ये केंद्रांच्या स्वरूपामध्ये सहायक तंत्रज्ञान मार्टची स्थापना करण्याचा प्रस्ताव आहे. येथे दिव्यांगजन आणि वरिष्ठ नागरिकांना मदत ठरणाऱ्या उत्पादनांची पाहणी करणे, तपासणी करणे आणि खरेदी करणे शक्य होईल.
- दिव्यांग आश्रय योजनेअंतर्गत सरकार भारतीय कृत्रिम अवयव निर्मिती महामंडळाला सहायक उपकरणांच्या उत्पादनामध्ये वाढ करणे, संशोधन आणि विकास यामध्ये गुंतवणूक करणे आणि उत्पादनांचे डिझाईन करण्यासाठी एआय च्या वापरासह उन्नत तंत्रज्ञानाला एकीकृत करण्यासाठी मदतनिधी दिला जाईल.

केंद्रीय **अर्थसंकल्प** 2026 - 2027

# भविष्यातील भारत
# पायाभूत सुविधांच्या बळावर विकासाला गती



*कोणत्याही देशाच्या अथवा राज्याच्या विकासामध्ये सर्वात मोठा आणि महत्वाचा घटक म्हणजे भांडवली गुंतवणूक, खर्चाचे अंदाजपत्रक किती आहे, हे पाहिले जाते. सरकारकडून भांडवली खर्चावर किती जास्त तरतूद केली जाते, त्यावर विकास आणि पायाभूत सुविधांचे काम किती जास्त होणार, हे अवलंबून असते. गेल्या 11 वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी फक्त भांडवली गुंतवणुकीतील खर्चामध्ये 2 लाख कोटी रूपयांवरून 12.2 लाख कोटी रूपयांपर्यंत वाढ केली गेली. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर केला पायाभूत सुविधांचा विकास....*

**पायाभूत भांडवली खर्चाच्या तरतुदीत 6 पट वाढ**

| वर्ष | तरतूद |
| --- | --- |
| 2026-27 | 12.2 लाख कोटी रूपये |
| 2025-26 | 11.2 लाख कोटी रूपये |
| 2014-15 | 2 लाख कोटी रूपये |

## अतिवेगवान सात रेल मार्गिका होणार विकसित, अधिक जवळ येणार शहरे

केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये

भारतीय रेल्वेला आतापर्यंतचा सर्वाधिक **2,93,030** कोटी रूपये इतका विक्रमी भांडवली खर्च करण्यासाठी तरतूद

- रेल्वे आपला खर्च अतिवेगवान संपर्क सुविधा, मालवाहतूक आणि सुरक्षितता यावर करण्याकडे लक्ष केंद्रीत करीत आहे.
- चेन्नई, बंगलुरू, हैदराबाद हा दक्षिणेकडील सर्वाधिक वेगवान 'डायमंड' मार्ग बनेल. दक्षिण भारतातील पाच राज्ये - कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी यांच्यासाठी एक मोठे वरदान सिद्ध होईल.



- दक्षिण अतिवेगवान मार्गिकेमुळे कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी यांना फायदा होईल.

जवळपास **4,000** किलोमीटर मध्ये पसरलेल्या हाय-स्पीड रेल्वे कॉरिडोर पासून सुमारे 16 लाख कोटी रूपयांच्या गुंतवणुकीची अपेक्षा

- या प्रस्तावित मार्गिकेमुळे शहरांच्या दरम्यान प्रवासासाठी लागणारा वेळ कमी होईल. प्रवाशांना कोणत्याही प्रकारच्या अडथळ्याविना विविध प्रकारची वाहन सुविधा सहजतेने उपलब्ध होईल.

- मुंबई - पुणे
- पुणे - हैदराबाद
- हैदराबाद - बंगळुरू
- हैदराबाद - चेन्नई
- चेन्नई - बंगळुरू
- दिल्ली - वाराणसी
- वाराणसी – सिलीगुडी

विकसित केल्या जातील.

## पर्यावरणस्नेही मालवाहतूक

पूर्वेकडील डानकुनीपासून ते पश्चिमेकडील सुरतपर्यंत एक नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर (2052 किमी लांब) बांधला जाईल.

ओडिशातील एनडब्ल्यू-5 पासून सुरुवात करून, पुढील पाच वर्षांत तालचेर आणि आंगुलसारख्या खनिज समृद्ध क्षेत्रांना आणि कलिंगनगरसारख्या औद्योगिक केंद्रांना पारादीप आणि धमरा बंदरांशी जोडण्यासाठी 20 नवीन राष्ट्रीय जलमार्ग (एनडब्ल्यू) सुरू केले जातील.

जलमार्गांसाठी मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीने प्रादेशिक उत्कृष्टता केंद्रांच्या स्वरूपात प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील ज्यांचा लाभ युवावर्गाला होईल. अंतर्देशीय जलमार्गांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाराणसी आणि पटना येथे जहाज दुरुस्ती सुविधा स्थापन केल्या जातील

2047 पर्यंत जलमार्ग आणि किनारी वाहतुकीचा वाटा 6% वरून 12% पर्यंत वाढवला जाईल, यासाठी कोस्टल कार्गो प्रोत्साहन योजना सुरू केली जाईल.

दुर्गम भागांना जोडण्यासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी समुद्री विमानांच्या स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन दिले जाईल. परिचालन सहाय्यासाठी समुद्री विमान व्हीजीएफ योजना सुरू केली जाईल.

### कार्बन कॅप्चर वापर आणि साठवण (सीसीयूएस)

डिसेंबर 2025 मध्ये सुरू झालेल्या पथदर्शकानुसार, सीसीयूएस तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रमाणावरील वापराने वीज, पोलाद, सिमेंट आणि रसायनांसह पाच औद्योगिक क्षेत्रांमध्ये पुढील पाच वर्षांत

**20,000** कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित



### इंफ्रास्ट्रक्चर गॅरंटी फंड होणार स्थापित

- सीपीएसईसच्या महत्त्वपूर्ण स्थावर मालमत्तांच्या पुनर्वापराला गती देण्यासाठी समर्पित आरईआयटीएस स्थापन केल्या जातील.
- सरकार 5 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये (टियर-II आणि टियर-III) पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रित करत आहे.
- पायाभूत सुविधा विकास आणि बांधकामात खाजगी विकासकांचा विश्वास बळकट करण्यासाठी आणि कर्जदारांना आंशिक पत हमी देण्यासाठी इंफ्रास्ट्रक्चर जोखीम गॅरंटी फंडाची स्थापना केली जाईल.
- डिजिटली सक्षम ऑटोमेटेड सर्व्हिस ब्युरो म्हणून सीपीएसईद्वारे दोन ठिकाणी हाय-टेक टूल रूम स्थापित केल्या जातील.
- उच्च-मूल्य असलेल्या आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत अशा बांधकाम आणि पायाभूत सुविधा उपकरणांचे (सीआयई) देशांतर्गत उत्पादन मजबूत करण्यासाठी एक योजना सुरू केली जाईल.
- 5 वर्षांच्या कालावधीसाठी


**10,000** कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह जागतिक प्रतिस्पर्धी कंटेनर उत्पादन परिसंस्था निर्माण करण्यासाठी कंटेनर उत्पादन प्रकल्प देखील प्रस्तावित.



### शहरी आर्थिक क्षेत्र

शहरे ही भारताचा विकास, नवोन्मेष आणि संधींची इंजिने आहेत. आम्ही आता टियर II आणि टियर III शहरे आणि तीर्थक्षेत्रांवरही लक्ष केंद्रित करू, ज्यांना आधुनिक पायाभूत सुविधा तसेच मूलभूत सुविधांची आवश्यकता आहे. आर्थिक क्षमतेचा वापर करण्यासाठी आणि शहरांची क्षमता आणखी वाढवण्यासाठी आव्हान पातळीवर 5 वर्षांत प्रत्येक शहरी आर्थिक क्षेत्रासाठी

**5,000** कोटी रुपये वितरण प्रस्तावित



केंद्रीय
# अर्थसंकल्प
2026 - 2027

## विकासाच्या इंजिनांचे
# उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि डिजिटलायझेशन



*21 वे शतक तंत्रज्ञानाने प्रेरित आहे. त्याचा स्वीकारणे प्रत्येकाच्या हिताचे आहे. सरकारने एआय मिशन, राष्ट्रीय क्वांटम मिशन, राष्ट्रीय संशोधन निधी आणि संशोधन, विकास आणि नवोन्मेष निधीद्वारे नवीन तंत्रज्ञानाला पाठिंबा देण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. या संदर्भात 2026-27 च्या अर्थसंकल्पात अनेक तरतुदींचा समावेश आहे.*

**40,000** कोटी रुपये | इलेक्ट्रॉनिक कंपोनेंट्स उत्पादन योजनेसाठी तरतूद.

**15.5%** | एक समान सेफ हार्बर मार्जिन लागू होईल, सर्व माहिती तंत्रज्ञान सेवांसाठी एकच श्रेणी असेल.

- सॉफ्टवेयरसॉफ्टवेअर डेव्हलपमेंट हे आयटी समर्पित सेवा, ज्ञान प्रक्रिया आउटसोर्सिंग सेवा आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटशी संबंधित संशोधन आणि विकास सेवांमध्ये आघाडीवर आहे. आता, या सर्व सेवा माहिती तंत्रज्ञान सेवांच्या एकाच श्रेणीमध्ये आणून 15.5% ची एकसमान सेफ हार्बर मार्जिन लागू होईल.
- आयटी सेवांसाठी सुरक्षित बंदर मिळविण्याची मर्यादा 300 कोटींवरून वाढवून 2,000 कोटी केली जात आहे.
- आयटी सेवांच्या सेफ हार्बरसाठीची मान्यता आता स्वयंचलित पद्धतीने होईल. अर्जांची तपासणी आणि मंजुरी देण्यासाठी कोणत्याही कर अधिकाऱ्याची आवश्यकता राहणार नाही.
- एकदा कोणत्याही आयटी सेवा कंपनीने यासाठी अर्ज केला की, कंपनीच्या इच्छेनुसार या सेफ हार्बरचा कालावधी ५ वर्षांसाठी जारी ठेवता येईल.
- ॲडव्हान्स प्रायसिंग करार (एपीए) करू इच्छिणाऱ्या आयटी सेवा कंपन्यांसाठी एकतर्फी एपीए प्रक्रिया जलद करण्याचा प्रस्ताव. तो 2 वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

> *सेमीकंडक्टर मिशनमध्ये दोन प्रमुख घोषणा केल्या गेल्या आहेत. त्यांच्यामुळे इंडिया स्टॅक आणि आयपीशी संबंधित प्रकरणांमध्ये सुधारणा होईल. ₹40,000 कोटींची इलेक्ट्रॉनिक काम्पोनंट उत्पादन योजना ही इलेक्ट्रॉनिक्समध्ये आत्मनिर्भरता मिळविण्यासाठी एक मोठे प्रोत्साहन आहे.*
>
> **-निर्मला सीतारमण, केंद्रीय अर्थमंत्री**




## जागतिक व्यापार आणि गुंतवणूक आकर्षित करणे

- डेटा सेंटर पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी, डेटा सेंटर सेवा वापरून जागतिक स्तरावर क्लाउड सेवा प्रदान करणाऱ्या परदेशी कंपन्यांना 2047 पर्यंत करसवलत ( टॅक्स हॉलिडे ) दिली जाईल.
- डेटा सेंटर सेवा प्रदान करणारी कंपनी संबंधित संस्था असेल, तर तिला खर्चावर 15% इतके सेफ हार्बर दिले जाईल.
- इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी वेळेवर उपलब्ध होणाऱ्या कार्यक्षमतेचा वापर करण्यासाठी, मूल्याच्या २ टक्के नफ्याच्या मार्जिनवर घटक गोदामांसाठी अनिवासी भारतीयांना सेफ हार्बर प्रदान केले जाईल.
- भारतात टोल संकलनाला चालना देण्यासाठी अनिवासी भारतीयांना 5 वर्षांसाठी प्राप्तिकरातून सूट दिली जाईल.
- जागतिक प्रतिभेच्या मोठ्या समूहाने भारतात दीर्घ कालावधीसाठी काम करावे यासाठी प्रोत्साहन देण्याचा भाग म्हणून, अधिसूचित योजनांअंतर्गत अनिवासी तज्ज्ञांना त्यांच्या जागतिक (भारताबाहेरील स्रोत) उत्पन्नात 5 वर्षांच्या प्रवासाच्या कालावधीसाठी सूट दिली जाईल.
- अनुमानित आधारावर कर भरणाऱ्या अनिवासी भारतीयांना किमान पर्यायी करातून (एमएटी) सूट दिली जाईल.

## भारत सेमीकंडक्टर मिशन

- उपकरणे आणि साहित्याचे उत्पादन, पूर्णपणे सुसज्ज भारतीय आयपी डिझाइन आणि पुरवठा साखळी मजबूत करण्याच्या दृष्टीने इंडिया सेमीकंडक्टर मिशन 2.0 सुरू केले जाईल. उद्योगावर आधारित संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांवर देखील लक्ष केंद्रित केले जाईल.
- एप्रिल 2025 मध्ये सुरू झालेल्या इलेक्ट्रॉनिक्स कंपोनेंट्स मॅन्युफॅक्चरिंग स्कीममध्ये 22,919 कोटी रुपयांच्या खर्चासह लक्ष्यापेक्षा दुप्पट गुंतवणुकीची वचनबद्धता आधीच प्राप्त झाली आहे. या गतीचा फायदा घेण्यासाठी, खर्च 40,00 कोटी रुपयांपर्यंत वाढवला जाईल.






### ई-कॉमर्समधून कुरिअर निर्यातीवरील मूल्य मर्यादा संपुष्टात

ई-कॉमर्सद्वारे जागतिक बाजारपेठेपर्यंत भारताची पोहोच वाढली आहे. भारतातील लघु व्यवसाय, कारागीर आणि स्टार्टअप्सच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, कुरिअर निर्यातीवरील प्रति खेप 10 लाख मूल्य मर्यादा काढून टाकण्यात आली आहे. अशा खेळांसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नाकारलेल्या आणि परत केलेल्या वस्तूंचे व्यवस्थापन सुधारले जाईल.


*हा अर्थसंकल्प महत्त्वाकांक्षी आहे. तो देशाच्या आकांक्षांशी निगडित आहे. गावातील गरीब शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असलेल्या या भविष्यवादी आणि संवेदनशील अर्थसंकल्पाबद्दल मी पुन्हा एकदा निर्मला सीतारमण आणि त्यांच्या चमूचे अभिनंदन करतो.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

केंद्रीय **अर्थसंकल्प** 2026-2027

## पर्यटनाला नवी गती

# भारताची संस्कृती आणि वारशाला नवी उंची



*भारताची सांस्कृतिक मुळे मजबूत करण्यासाठी पर्यटन-केंद्रित विकासाच्या नवीन संधी खुल्या केल्या जात आहेत. अर्थसंकल्पात आध्यात्मिक पर्यटन, स्थल विकास आणि भारताच्या विशाल सांस्कृतिक परिसंस्थेला बळकटी देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या वर्षीचा अर्थसंकल्प पर्यटनाला देणारा, नवीन गती देणारा आणि भारताची संस्कृती आणि वारशाला नवीन उंचीवर नेणारा आहे.*

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू- काश्मीर तसेच पूर्व घाट आणि पश्चिम घाटातील अराकू घाटामध्ये पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत पर्वतीय मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव.

### राष्ट्रीय आतिथ्य संस्था होणार स्थापन

- मौजूदा सध्याच्या राष्ट्रीय हॉटेल व्यवस्थापन आणि खानपान तंत्रज्ञान परिषदेचे उन्नतीकरण करून राष्ट्रीय आतिथ्य संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे युवावर्गाला कौशल्ये आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच पर्यटन क्षेत्राला अधिक बळकटी मिळेल.
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सहकार्याने, हायब्रिड पद्धतीने प्रमाणित, उच्च-गुणवत्तेच्या 12 आठवड्यांच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाद्वारे 20 पर्यटन स्थळांवरील 10 हजार मार्गदर्शकांचे कौशल्य वाढविण्यासाठी एक प्रायोगिक योजना सुरू केली जाईल.
- महत्त्वपूर्ण सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वारसा स्थळांचे डिजिटल दस्तऐवजीकरण करण्यासाठी एक नॅशनल डेस्टिनेशन डिजिटल नॉलेज ब्रिज स्थापित केला जाईल.
- या उपक्रमामुळे स्थानिक संशोधक, इतिहास अभ्यासक, कन्टेन्ट क्रिएटर तसेच तंत्रज्ञान व्यावसायिकांसाठी नवीन रोजगार संधी निर्माण होतील.

### 15 पुरातत्त्वीय स्थळे सांस्कृतिक स्थळे म्हणून विकसित केली जातील

- लोथल, धोलाविरा, राखीगढी, आदिवनाल्लूर, सारनाथ, हस्तिनापूर आणि लेह पॅलेससह 15 पुरातत्त्वीय स्थळे जिवंत आणि अनुभवात्मक सांस्कृतिक स्थळांमध्ये विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे भारतीय संस्कृतीची ओळख जागतिक स्तरावर जाईल.

### ईशान्येकडील 5 राज्यांमध्ये 5 पर्यटन स्थळांचा विकास

- दुर्गापुर दुर्गापूरमध्ये सुधारित संपर्क नोडसह एकात्मिक पूर्व किनारपट्टी औद्योगिक कॉरिडॉरचा विकास, ईशान्येकडील 5 राज्यांमध्ये 5 पर्यटन स्थळांचा विकास होणार
- ईशान्येमध्ये 4,000 ई बसेस धावणार.
- अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, आसाम, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा येथे बौद्ध सर्किटच्या विकासासाठी नवीन योजना.
- ही योजना मंदिरे आणि मठांचे संवर्धन, तीर्थस्थळांवर द्विभाषिक केंद्रांचा स्थापना संपर्क तसेच तीर्थक्षेत्रांशी संबंधित मूलभूत सुविधांची तरतूद करण्यास मदत करेल.

### पर्यटन-आधारित विकासासाठी नवीन संधी

- ओडिशा, कर्नाटक आणि केरळमध्ये प्रमुख कासव प्रजनन स्थळे आणि कासव मार्ग विकसित केले जातील.
- पर्यटन आणि जैवविविधतेला चालना देण्यासाठी आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूमध्ये पुलिकत सरोवराच्या काठावर पक्षी निरीक्षण मार्ग विकसित केले जाणार.

## पद्म पुरस्कार 2026






**पद्म भूषण**
उच्च दर्जाची विशिष्ट सेवा

**पद्म विभूषण**
असामान्य आणि विशिष्ट सेवा

**पद्म श्री**
विशिष्ट सेवा

### लोकांचे पद्म पुरस्कार या खऱ्या भावनेला अनुसरून एक नवीन परंपरा

# निष्काम कर्मयोगींना पद्म पुरस्कार

*देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांमध्ये ज्यांची गणना होते, ते पद्म पुरस्कार आता केवळ प्रसिद्ध व्यक्तींनाच नव्हे तर समाज आणि राष्ट्रात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणाऱ्या आणि मानवतेची सेवा करणाऱ्या अज्ञात नायकांनाही दिले जातात. कारण सध्याच्या सरकारने या पुरस्कारांची संपूर्ण निवड प्रक्रिया बदलली आहे... आता प्रसिद्धीपासून दूर राहून परंपरा, संस्कृती, शिक्षण, साहित्य आणि आरोग्याची निःस्वार्थपणे सेवा करणारे अनामित नायक "जनतेचे पद्म" ची ओळख उंचावत आहेत... 2026 मध्ये सार्वजनिक जीवन समृद्ध करणाऱ्या 131 प्रतिष्ठित व्यक्तींना राष्ट्रपती भवनात सन्मानित केले जाईल.*



## पद्म विभूषणने सन्मानित होतील हे 5 मान्यवर



धर्मेंद्र सिंह देओल
(मरणोत्तर)(कला)
महाराष्ट्र



के टी थॉमस
(सार्वजनिक व्यवहार)
केरळ



एन. राजम
(कला)
उत्तर प्रदेश



पी. नारायणन
(साहित्य आणि शिक्षण)
केरळ



व्ही. एस. अच्युतानंदन
(मरणोत्तर) (सार्वजनिक व्यवहार) केरळ

देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेल्या पद्म सन्मान 2026 या पुरस्कारांची घोषणा प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला करण्यात आली, ज्यामध्ये दोन दुहेरी पुरस्कारांसह 131 मान्यवरांची नावे आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संमती दिलेल्या पद्म पुरस्कारांमध्ये 5 पद्मविभूषण, 13 पद्मभूषण आणि 113 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यापैकी 19 महिला आहेत. परदेशी/एनआरआय/पीआयओ/ओसीआय श्रेणीतील 6 जण आहेत आणि 16 मरणोत्तर पुरस्कार आहेत. या वर्षीच्या यादीत असणाऱ्या 19 महिलांसह



## असे आहे पद्म पुरस्कारांचे महत्त्व

- भारत सरकारने 1954 मध्ये भारतरत्न आणि पद्म विभूषण हे दोन नागरी पुरस्कार सुरू केले. पद्म विभूषण पुरस्कारांचे तीन वर्ग होते: वर्ग 1, वर्ग 2आणि वर्ग 3. 8 जानेवारी 1955 रोजी राष्ट्रपतींनी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे त्यांचे नाव पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री असे ठेवण्यात आले.
- हे पुरस्कार राष्ट्रीय अभिमानाचे तसेच प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. यात कोणतेही रोख पारितोषिक दिले जात नाही.
- पुरस्कार विजेत्यांना राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीची सनद (प्रमाणपत्र) आणि एक पदक दिले जाते. पदकाची एक लघु प्रतिकृती देखील दिली जाते. ती ते कोणत्याही समारंभात घालू शकतात.
- हा पुरस्कार कोणत्याही उपाधी किंवा पदवीसमान नाही. पुरस्कार विजेत्यांच्या नावांपुढे तो प्रत्यय किंवा उपसर्ग म्हणून वापरता येत नाही.

गेल्या सहा वर्षांतील पद्म पुरस्कार विजेत्या महिलांची संख्या 154 झाली आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपतींकडून हे पुरस्कार प्रदान केले जातात, साधारणपणे दरवर्षी मार्च किंवा एप्रिलच्या सुमारास ते दिले जातात.

याअंतर्गत देशासाठी उत्कृष्ट योगदान आणि समर्पित सेवा देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान केला जाईल. अभिनेते धर्मेंद्र सिंह देओल आणि केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही.एस. अच्युतानंदन यांना मरणोत्तर पद्म विभूषण पुरस्काराने सन्मानित केले जाईल. तर पद्म भूषण पुरस्काराने सन्मानित होणाऱ्या व्यक्तींमध्ये उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगत सिंह कोश्यारी, कल्लीपट्टी रामासामी पलनीसामी, गायिका अलका याज्ञिक आणि मल्याळम अभिनेता मामूटी यांचा समावेश आहे. यांच्याबरोबरच जाहिरात गुरू पीयूष पांडे, राजकीय नेते शिबू सोरेन आणि विजय कुमार मल्होत्रा यांना मरणोत्तर पद्म भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाईल. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित होणाऱ्या 113 व्यक्तींमध्ये क्रीडा जगतातील क्रिकेटपटू रोहित शर्मा, प्रवीण कुमार, महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, बलदेव सिंह, के. पजनीवेल आणि सविता पुनिया यांचा समावेश आहे.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी गुजरात, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, केरळ, कर्नाटक, तमिळनाडू, महाराष्ट्र आणि आसाममधील पद्म पुरस्कार विजेत्यांच्या योगदानाचे कौतुक केले. एवढेच नाही, तर त्यांचे उत्कृष्ट योगदान इतरांसाठी प्रेरणादायी मार्गावर चालण्याचा मार्ग प्रशस्त करेल असेही ते म्हणाले.समाजसेवा, शिक्षा, साहित्य एवं

### 13 नायकांना पद्म भूषण पुरस्कार



अलका याज्ञिक (कला) - महाराष्ट्र



भगत सिंह कोश्यारी ( सार्वजनिक व्यवहार) उत्तराखंड



कल्लीपट्टी रामासामी पलानीस्वामी (वैद्यक) तमिळनाडू



मामूटी (कला) केरळ



डॉ. नोरी दत्तात्रेयुडू (वैद्यक) - संयुक्त राज्य अमेरिका



पीयूष पांडे (मरणोत्तर) (कला) महाराष्ट्र



## 13 नायकांना पद्म भूषण



एस. के. एम. मैइलानंदन (सामजिक कार्य) तमिळनाडू



शतावधानी आर. गणेश (कला) कर्नाटक



शिबू सोरेन (मरणोत्तर) (सार्वजनिक व्यवहार) झारखंड



उदय कोटक (व्यापार आणि उद्योग) महाराष्ट्र



व्ही. के. मल्होत्रा (मरणोत्तर) (सार्वजनिक व्यवहार) दिल्ली



वेल्लापल्ली नटेसन (सार्वजनिक व्यवहार) केरळ



विजय अमृतराज (क्रीडा) संयुक्त राज्य अमेरिका



**पद्मश्री 113**

# कोणत्या क्षेत्राला मिळाले किती पद्म पुरस्कार

| | |
|---|---|
| कला | 44 (2 पद्म विभूषण, 4 पद्म भूषण, 38 पद्म श्री) |
| साहित्य आणि शिक्षा | 18 (1 पद्म विभूषण, 17 पद्म श्री) |
| वैद्यक | 15 (2 पद्म भूषण, 13 पद्म श्री) |
| सार्वजनिक व्यवहार | 7 (2 पद्म विभूषण, 4 पद्म भूषण, 1 पद्म श्री) |
| समाज सेवा | 13 (1 पद्म विभूषण, 12 पद्म श्री) |
| क्रीडा | 9 (1 पद्म भूषण, 8 पद्म श्री) |
| व्यापार आणि उद्योग | 4 (1 पद्म भूषण, 3 पद्म श्री) |
| नागरी विज्ञान | 2 पद्म श्री |
| विज्ञान आणि अभियांत्रिकी | 11 पद्म श्री |
| इतर | 8 पद्म श्री |
| एकूण | 131 |

*देशासाठी उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल सर्व पद्म पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन. विविध क्षेत्रातील त्यांची उत्कृष्टता, समर्पण आणि सेवा आपल्या समाजाच्या जडणघडणीला समृद्ध करते. या सन्मानामधून वचनबद्धता आणि उत्कृष्टतेची भावना प्रतिबिंबित होते. ती येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

कला, समाजसेवा, शिक्षण, साहित्य आणि कला क्षेत्रातील पद्मश्री पुरस्कार विजेत्यांनी आपल्या अतुलनीय योगदानाने अनेकांचे जीवन बदलले आहे. हे सन्मान लोकांचे पद्म पुरस्कार या खऱ्या भावनेनुसार भारताच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक परिदृश्याला आकार देण्यात आपली सातत्यपूर्ण भूमिका प्रतिबिंबित करतात. पद्मश्रीसाठी निवड झालेल्यांनी हे सिद्ध केले आहे की सामाजिक जबाबदाऱ्या जाणीवपूर्वक पार पाडल्याने राष्ट्र उभारणीत प्रभावी योगदान देता येते. ही गोष्ट निःसंशयपणे अधिकाधिक लोकांना समाजाची निःस्वार्थपणे सेवा करण्यास प्रेरित करेल. ▪

# केरळमध्ये 'विकासाचे, रोजगार निर्मितीचे' नवे उपक्रम



*केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे केरळच्या विकासाला सातत्याने नवी गती मिळत आहे. गेल्या 23 जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक विकास कामांना गती दिली. इथूनच संपूर्ण देशासाठी गरीब कल्याणाशी निगडित एक मोठी सुरुवात करत पीएम स्वनिधि क्रेडिट कार्ड जारी करण्यात आले तसेच रेल्वे संपर्क सुविधा सशक्त बनवणे, तिरुवनंतपुरमला देशाचे मोठे स्टार्टअप केंद्र बनवणे, यांसारख्या उपक्रमांना गती देण्यात आली...*

पूर्वी क्रेडिट कार्ड फक्त श्रीमंतांपुरते मर्यादित होते, परंतु आता देशभरातील रस्त्यावरील लाखो विक्रेत्यांनाही ही सुविधा मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जानेवारीमध्ये केरळमधील तिरुवनंतपुरम येथून याची सुरुवात केली. गेल्या 11 वर्षांमध्ये, कोट्यवधी नागरिकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याचे खूप मोठे काम झाले आहे. रस्त्याच्या कडेला आणि गल्लीबोळात जे वस्तू विकतात, त्या फेरीवाल्यांची परिस्थिती पूर्वी खूप वाईट होती. सामान खरेदी करण्यासाठी काही शे रुपये देखील त्यांना चढ्या व्याजदरावर घ्यावे लागत होते. केंद्र सरकारने पहिल्यांदाच त्यांच्यासाठी पंतप्रधान स्वनिधी योजना तयार केली. या योजनेनंतर देशभरातील लाखो लोकांना बँकांकडून मोठी मदत मिळाली आहे. रस्त्यावरील लाखो विक्रेत्यांना आयुष्यात पहिल्यांदाच बँकांकडून एखादे कर्ज मिळाले आहे. आता भारत सरकार एक पाऊल पुढे टाकत या लोकांना क्रेडिट कार्ड प्रदान करत आहे. याचा फायदा देशभरातील रस्त्यावरील विक्रेते आणि पदपथावर काम करणाऱ्या कामगारांना होईल.

## समान शहरी विकास होत आहे सुनिश्चित

भारत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी आज संपूर्ण देश एकजूट होऊन प्रयत्न करत आहे. विकसित भारताच्या उभारणीत शहरांची खूप मोठी भूमिका आहे. मागील 11 वर्षांपासून केंद्र सरकार शहरी पायाभूत सुविधांमध्ये प्रामुख्याने गुंतवणूक करत आहे. केंद्र सरकार शहरांमधील गरीब कुटुंबांसाठी देखील काम करत आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत, देशभरात 4 कोटींहून अधिक घरे बांधून गरीबांना देण्यात आली आहेत. त्यापैकी एक कोटींहून अधिक घरे शहरी गरीबांसाठी बांधण्यात आली आहेत. केरळमध्येच सुमारे सव्वा लाख शहरी गरीबांना त्यांची कायमस्वरूपी घरे मिळाली आहेत. गरीब कुटुंबांचे वीजेचे बिल वाचवण्यासाठी, पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना सुरू करण्यात आली आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत गरिबांना 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळत आहेत. स्त्रीशक्तीच्या

# विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्‌घाटन

*रेल्वे कनेक्टिव्हिटी, शहरी उपजीविका, विज्ञान आणि नवोन्मेष, लोककेंद्रित सेवा आणि प्रगत आरोग्यसेवांसह प्रमुख क्षेत्रांचा यात समावेश आहे.*

- पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड सुरु करण्यात आले. ही यूपीआय-संलग्न , व्याजमुक्त रिव्हॉल्व्हिंग क्रेडिट सुविधा त्वरित तरलता प्रदान करेल, डिजिटल कर्ज देण्यास प्रोत्साहन देईल आणि लाभार्थ्यांना औपचारिक क्रेडिट इतिहास तयार करण्यास मदत करेल.
- एक लाख लाभार्थ्यांना पीएम स्वनिधी कर्ज वितरित करण्यात आले. पंतप्रधान स्वनिधी योजनेमुळे लाभार्थ्यांच्या मोठ्या वर्गाला पहिल्यांदाच औपचारिक कर्ज उपलब्ध झाले आहे.
- केरळमध्ये रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी, तीन अमृत भारत एक्सप्रेस आणि एका प्रवासी गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.
- यामध्ये नागरकोइल-मंगळुरु अमृत भारत एक्सप्रेस, तिरुवनंतपुरम-तंबरम अमृत भारत एक्सप्रेस, तिरुवनंतपुरम-चारलापल्ली अमृत भारत एक्सप्रेस आणि त्रिशूर आणि गुरुवायूर दरम्यान धावणारी एक नवीन प्रवासी ट्रेन यांचा समावेश आहे.
- या सेवा सुरू झाल्यावर केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश दरम्यान लांब पल्ल्याच्या आणि प्रादेशिक कनेक्टिव्हिटीमध्ये उल्लेखनीय सुधारणा होईल, यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक किफायतशीर, सुरक्षित आणि वेळेवर होईल.
- तिरुवनंतपुरम येथे सीएसआयआर -एनआयआयएसटी नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि उद्यमशीलता केंद्राची पायाभरणी करण्यात आली.
- तिरुवनंतपुरम येथील श्री चित्रा तिरुनल आयुर्वेदिक विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेत अत्याधुनिक रेडिओ सर्जरी केंद्राची पायाभरणी करण्यात आली.
- तिरुवनंतपुरम येथे पूजप्पुराच्या नवीन टपाल कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

> “*मागील 11 वर्षांमध्ये कोट्यवधी देशवासीयांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याचे खूप मोठे काम झाले आहे. आता गरीब, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ओबीसी, महिला, मच्छीमार, या सर्वांना सहजपणे बँक कर्ज मिळत आहे. ज्यांच्याकडे कोणतीही हमी नाही, त्यांच्यासाठी सरकार स्वतःच त्यांचे हमीदार बनत आहे.”* **— नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आरोग्य सुरक्षेसाठी मातृ वंदना योजनेसारख्या योजना सुरु आहेत. केंद्र सरकारने 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. याचा खूप मोठा फायदा केरळमधील लोकांना, विशेषतः मध्यमवर्गीयांना झाला आहे.

## केरळच्या विकासाला नवी गती

केंद्र सरकार कनेक्टिविटी, विज्ञान, नवोन्मेष आणि आरोग्यसेवेमध्येही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. सीएसआयआर इनोव्हेशन हबचे लोकार्पण, वैद्यकीय महाविद्यालयात रेडिओ सर्जरी सेंटरचे उद्घाटन यामुळे केरळला विज्ञान, नवोन्मेष आणि आरोग्यसेवेचे केंद्र बनवण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे केरळची रेल्वे कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत झाली आहे. तीन अमृत भारत एक्सप्रेस गाडयांना हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. त्यामुळे पर्यटन क्षेत्राला लाभ होईल. गुरुवायूर आणि त्रिशूर दरम्यान नवीन प्रवासी रेल्वेमुळे यात्रेकरूंचा प्रवास आणखी सोपा होईल. या सर्व प्रकल्पांमुळे केरळच्या विकासालाही गती मिळेल. निश्चितपणे विकसित केरळमुळेच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल.या प्रयत्नात केंद्र सरकार संपूर्ण शक्तीनिशी केरळच्या जनतेसोबत उभे आहे.

...जेणेकरून भावी पिढ्या संत परंपरा आणि वारसाशी जोडल्या जातील

# आता श्री गुरु रविदास महाराज जी विमानतळ, आदमपूर म्हणा



*भारत विकासासोबतच वारशाला भावी पिढीशी जोडण्यासाठी आणि त्याचे संवर्धन करण्यासाठी काम करत आहे. याच अनुषंगाने भारतासाठी न्याय आणि करुणा भावनेसह भविष्याची संकल्पना मांडणाऱ्या संत रविदास यांच्या 649व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाबला भेट दिली. येथे विमानतळ टर्मिनलच्या एका इमारतीचे उद्घाटन केले, त्याचबरोबर संत परंपरा आणि वारशाला भावी पिढीशी जोडण्यासाठी आदमपूर विमानतळाला 'श्री गुरु रविदास महाराज जी विमानतळ, आदमपूर' हे नवीन नाव दिले ...*

समाज सुधारक आणि संत रविदास महाराज यांनी देशाला सेवेचा मार्ग दाखवला. सामाजिक सलोखा आणि सद्भावनेचा दीप प्रज्वलित करून भारताच्या सामाजिक मूल्यांना प्रेरणा देणाऱ्या समानता, करुणा आणि मानवी सन्मानाची शिकवण दिली. गुरु रविदास महाराजांच्या जयंतीनिमित्त पंजाबमध्ये दाखल झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, असा निर्णय घेण्यात आला आहे की आदमपूर विमानतळ आता श्री गुरु रविदास महाराज जी विमानतळ या नावाने ओळखला जाईल. श्री गुरु रविदास महाराज जींच्या चिरस्थायी आदर्शांप्रति ही एक योग्य श्रद्धांजली आहे. समानता, करुणा आणि सेवेचा त्यांचा संदेश आपल्या सर्वांना अत्याधिक प्रेरणा देतो.

राज्याच्या विमान वाहतूक संबंधी पायाभूत सुविधांचा आणखी विस्तार करत, हलवारा विमानतळावरील नवीन टर्मिनल इमारतीचे पंतप्रधान मोदी यांनी उद्घाटन केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की हलवारा विमानतळावरील टर्मिनल इमारतीचे उद्घाटन हा पंजाबमधील विशेषतः लुधियाना आणि आसपासच्या



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## लुधियाना येथील हलवारा विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे उद्घाटन

- पंजाबमध्ये विमान वाहतूक संबंधी पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाबमधील लुधियाना येथे हलवारा विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे उद्घाटन केले.
- ही टर्मिनल इमारत राज्यासाठी एक नवीन प्रवेशद्वार स्थापित करेल जी लुधियाना आणि त्याच्या आसपासच्या औद्योगिक आणि कृषी क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करेल.
- लुधियाना जिल्ह्यातल्या हलवारा येथे भारतीय हवाई दलाचा एक धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा तळ देखील आहे.
- लुधियानात यापूर्वी विमानतळाची धावपट्टी तुलनेने छोटी होती आणि छोट्या आकाराच्या विमानांसाठी योग्य होती.
- हलवारा येथे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी आणि मोठ्या विमानांना सामावून घेण्यासाठी एक नवीन सिव्हिल एन्क्लेव्ह विकसित करण्यात आला आहे. त्याची धावपट्टी लांब आहे आणि A-320 सारखी विमाने हाताळण्यास सक्षम आहे.
- पंतप्रधानांच्या शाश्वत आणि पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार विकासाच्या दृष्टिकोनाला अनुरूप , टर्मिनलमध्ये अनेक हरित आणि ऊर्जा-कार्यक्षम सुविधांचा समावेश आहे.
- एलईडी प्रकाश व्यवस्था, इन्सुलेटेड छप्पर, पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था, सांडपाणी आणि जलशुद्धीकरण संयंत्रे आणि पुनर्वापरित पाण्याचा वापर यांचा समावेश आहे.
- टर्मिनलची रचना पंजाबचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दर्शवते. तसेच प्रवाशांना एक अनोखा आणि प्रादेशिकदृष्ट्या प्रेरित प्रवासाचा अनुभव देते.

*मानवतेचे अनन्य उपासक महान संत श्री गुरु रविदास महाराज जी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी-कोटी वंदन. त्यांच्या विचारांमध्ये, न्याय आणि करुणेची भावना सर्वोच्च होती, जी लोककल्याणाच्या आपल्या योजनांचा गाभा आहे. त्यांनी सामाजिक समरसता आणि सद्भावनेचा जो दीप प्रज्वलित केला, तो देशवासियांचा मार्ग नेहमीच प्रकाशमय करत राहील.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## रविदास महाराज यांना श्रद्धांजली

- आदमपूर विमानतळाचे नवीन नाव 'श्री गुरु रविदास महाराज जी विमानतळ, आदमपूर' ठेवण्यात आले.
- आदमपूर विमानतळाचे नामकरण हा संत आणि समाजसुधारक गुरु रविदास महाराज यांचा सन्मान आहे, ज्यांची समानता, करुणा आणि मानवी सन्मानाची शिकवण सामाजिक मूल्यांना प्रेरित करते.



परिसरातील लोकांसाठी खूप आनंदाचा क्षण आहे. लुधियाना तर भारताचे एक महत्त्वाचे औद्योगिक आणि व्यापार केंद्र आहे. हे शहर तेथील ऊर्जाशील लोकांसाठी ओळखले जाते. आमचे सरकार या शहराची हवाई कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे, जे आधुनिक विमानतळासाठी सुरू असलेल्या कामातून दिसून येते.

### पंतप्रधानांनी डेरा सचखंड बल्लां येथे भेट दिली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाबमधील डेरा सचखंड बल्लां येथे दर्शन घेतले. पंतप्रधान मोदी म्हणाले की 'श्री गुरु रविदास महाराज जी यांच्या जयंतीनिमित्त डेरा सचखंड बल्लां येथे उपस्थित असणे ही एक अतिशय खास अनुभूती होती.'

### पंतप्रधान मोदी यांनी संत निरंजन दास यांची भेट घेतली

पंतप्रधान नरेंद्र मोदी डेरा सचखंड बल्लां येथे संत निरंजन दास जी यांची भेट घेतल्यानंतर म्हणाले की संत निरंजन दास जी यांना भेटणे खूप खास होते. समाजाप्रति त्यांच्या प्रेरणादायी सेवेची दखल घेत त्यांना अलिकडेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.




# भारतात विमान प्रवास

## आता निवडक लोकांपुरता नाही, सर्वसामान्यांसाठी देखील

*भारताचे नागरी विमान वाहतूक क्षेत्र आज देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक बनले आहे. एक काळ होता जेव्हा विमान प्रवास हा काही मोजक्या लोकांपुरता मर्यादित मानला जात होता, मात्र आज भारत जगातील तिसरा सर्वात मोठा देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ बनला आहे. प्रवाशांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून, देशातील विमानांचा ताफाही वेगाने विस्तारत आहे. याच पार्श्वभूमीवर विमान वाहतूक संबंधी पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाला नवी गती देण्याच्या उद्देशाने हैदराबादमध्ये 28 जानेवारी रोजी आयोजित 'विंग्स इंडिया 2026' कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले संबोधित ....*

भारताने विमान प्रवास निवडक लोकांसाठीच्या गटातून बाहेर आणून सर्वसामान्यांपर्यंत नेला आहे. भारतीय विमान वाहतूक क्षेत्राने देशाच्या आर्थिक समृद्धीला चालना देणे, राष्ट्राचे एकीकरण मजबूत करणे आणि विकसित भारत @2047 या भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या लक्ष्याच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी सशक्त देखील केले आहे. याच अनुषंगाने आशियातील सर्वात मोठ्या नागरी विमान वाहतूक कार्यक्रम 'विंग्स इंडिया 2026' मध्ये भारताने देशाच्या विमान वाहतूक विकासाची गाथा केवळ प्रदर्शित केली नाही तर जागतिक स्तरावर नागरी विमान वाहतूक क्षेत्रात देशात उपलब्ध असलेल्या संधींबाबत गुंतवणूकदारांना अवगत देखील केले. हे आयोजन 28-31 जानेवारी दरम्यान तेलंगणामधील हैदराबाद इथे करण्यात आले होते.

'भारतीय विमान वाहतूक : भविष्याचा मार्ग प्रशस्त करणे - डिझाइनपासून तैनातीपर्यंत, उत्पादनापासून देखभाल-दुरुस्तीपर्यंत, समावेशकतेपासून नवोन्मेषापर्यंत आणि सुरक्षिततेपासून स्थिरतेपर्यंत' या विषयावर आधारित विंग्स इंडिया 2026 आंतरराष्ट्रीय संमेलनात 13 विषयांवरील सत्रांव्यतिरिक्त मंत्रीस्तरीय सत्र देखील पार पडले. पंतप्रधान मोदी म्हणाले की विमान वाहतूक उद्योगाचा आगामी काळ महत्त्वाकांक्षेने भरलेला असून भारत एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. विमानउत्पादन, वैमानिक प्रशिक्षण, प्रगत हवाई गतिशीलता आणि विमान भाडेतत्त्वावर देणे यांसारख्या क्षेत्रात भारतामध्ये जगातील विमान कंपन्यांसाठी गुंतवणुकीच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

### 2047 मध्ये असतील 400 हून अधिक विमानतळ

देशात हवाई कनेक्टिव्हिटीचा अनेक पटींनी विस्तार होत आहे. 2047 पर्यंत, भारतात 400 हून अधिक विमानतळ असतील असा अंदाज आहे. भारत सरकार उडान योजनेच्या पुढील टप्प्यावर देखील काम करत आहे. या धोरणामुळे, प्रादेशिक आणि किफायतशीर कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होईल. सी-प्लेन परिचालनाचा देखील विस्तार केला जात आहे. पंतप्रधान मोदी या कार्यक्रमात म्हणाले, "भारताच्या कानाकोपऱ्यात हवाई संपर्क व्यवस्था अधिक चांगली व्हावी हाच

## भारताच्या उड्डाणाचे सह-वैमानिक बना

जगात असे काही निवडक देश आहेत ज्यांच्याकडे विमान वाहतूक उद्योगासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात, धोरणात्मक स्थिरता आणि तांत्रिक महत्त्वाकांक्षा आहे. भारत विमान वाहतूकक्षेत्रात अनेक सुधारणा करत आहे. या प्रयत्नांमुळे भारत ग्लोबल साऊथ देश आणि जगासाठी, विमान वाहतुकीचे एक प्रमुख प्रवेशद्वार बनत आहे. विमान वाहतूक उद्योगाशी संबंधित गुंतवणूकदार आणि उत्पादकांसाठी खूप मोठी संधी आहे. पंतप्रधान मोदी यांनी जगभरातील गुंतवणूकदारांना सांगितले की त्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा. आमच्या या विकासाच्या प्रवासात एक दीर्घकालीन भागीदार बनून जागतिक विमान वाहतूक क्षेत्राच्या वाढीसाठी काम करा.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## विमान वाहतूक क्षेत्रात भारताच्या दीर्घकालीन दृष्टिकोनामुळे सुविधांमध्ये झाली वाढ

- टीयर-2 टियर-2 आणि टियर-3 शहरांना विमानतळांशी जोडण्यात आले आहे.
- 2014 मध्ये भारतात 70 विमानतळे होती, जी एका दशकात दुपटीने वाढून 160 पेक्षा जास्त झाली आहे.
- भारतातील विमान प्रवाशांची संख्या 2014 मधील 10.3 कोटींवरून वाढून 2025 मध्ये 35 कोटींच्या पुढे गेली आहे.
- देशभरात 100 हून अधिक एअर डोम्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.
- नागरिकांसाठी परवडणारे दर असलेली 'उडान' योजना सुरू केली आहे.
- 'उडान' योजनेमुळे 1.5 कोटी प्रवाशांनी त्या मार्गांवर प्रवास केला आहे, ज्यापैकी अनेक पूर्वी अस्तित्वातही नव्हते.



*तो दिवस दूर नाही जेव्हा भारतात तयार झालेली आणि इथल्याच बनावटीची इलेक्ट्रिक व्हर्टिकल टेक ऑफ आणि लँडिंग विमाने संपूर्ण विमान वाहतूक क्षेत्राला नवीन दिशा देतील. हे तंत्रज्ञान आपला प्रवासाचा वेळही लक्षणीयरित्या कमी करू शकते. आम्ही शाश्वत विमान इंधनासाठी व्यापक प्रयत्न करत आहोत. आगामी काळात भारत हरित विमान इंधनाचा एक प्रमुख उत्पादक आणि निर्यातदार देश बनण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आमचा प्रयत्न आहे. देशभरात पर्यटन स्थळे विकसित होत आहेत, जिथे पोहचण्यासाठी लोकांची पहिली पसंती विमान प्रवास हाच आहे. आगामी काळात विमान प्रवासाच्या मागणीत देखील वाढ होणार आहे. यामुळे गुंतवणुकीच्या अधिक संधी निर्माण होतील.

### विमान वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका

पंतप्रधान मोदी यांनी विंग्स इंडिया 2026 मध्ये आवाहन केले की आज जेव्हा भारत एक प्रमुख जागतिक विमान वाहतूक केंद्र म्हणून उदयाला येत आहे तेव्हा विमान वाहतुकीच्या गरजांसाठी अवलंबून राहू नका. आपल्याला आत्मनिर्भरतेचा मार्ग मजबूत करावाच लागेल. भारतात गुंतवणूक करण्यासाठी येणाऱ्या कंपन्यांनाही याची मदत होईल. याच दृष्टिकोनातून भारत विमानाचे डिझाइन, उत्पादन आणि विमानाच्या एमआरओ परिसंस्थेवर अधिक भर देत आहे. आजही भारत विमानाच्या सुट्या भागांचा मोठा उत्पादक आणि पुरवठादार आहे. भारताने लष्करी आणि वाहतूक विमाने देशात बनवणे सुरू केले आहे. नागरी विमान निर्मितीमध्येही प्रगती करत आहे. ■









भारत निवडणूक आयोग

# लोकशाहीचा जागतिक आवाज

*भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. सुमारे 97 कोटी मतदार नोंदणीकृत आहेत तर 700 हून अधिक राजकीय पक्ष देखील आहेत. भारताने आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक सहाय्य संस्थेच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपदही स्वीकारले आहे. लोकशाहीची ही समृद्ध परंपरा आणि निष्पक्ष, पारदर्शक आणि समावेशक निवडणूक प्रक्रिया जागतिक व्यासपीठावर सामायिक करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोग ने 21 ते 23 जानेवारी दरम्यान तीन दिवसीय भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन परिषद 2026 चे आयोजन केले. या आयोजनाने निवडणूक व्यवस्थापनातील भारताची भूमिका अधिक मजबूत केली ...*

आंतरराष्ट्रीय परिषदेने निवडणूक व्यवस्थापन संस्था, धोरणकर्ते आणि तज्ज्ञांना एक सामायिक व्यासपीठ प्रदान केले, जिथे निवडणूक प्रक्रियेत नवोन्मेष, तांत्रिक हस्तक्षेप आणि मतदार सहभाग यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. ही अशा प्रकारची पहिलीच परिषद होती ज्यामध्ये 42 परदेशी दूतावासातील आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी आणि 27 देशांच्या मिशन प्रमुखांसह एक हजाराहून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी या दरम्यान 32 देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या प्रमुखांसोबत द्विपक्षीय बैठका घेतल्या. बैठकीत जागतिक निवडणूक अनुभव आणि नवोन्मेषावर व्यापक चर्चा झाली. निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाही सहकार्यात भारताची दीर्घकालीन भागीदारी अधिक मजबूत करणे हा यामागचा उद्देश होता. भारताने आमंत्रित देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांना (ईएमबी) त्यांच्या संबंधित देशांच्या कायद्यांनुसार ईसीआयनेट सारखे तांत्रिक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात सहकार्य करण्याचा प्रस्ताव मांडला. यात अनेक निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी त्यांच्या देशांमध्ये अशा प्रकारच्या तंत्रज्ञान उपायांचा अवलंब करण्यासाठी भारतासोबत सहकार्य करण्याबाबत उत्सुकता दर्शवली.

समारोप सत्रादरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी 'दिल्ली घोषणापत्र 2026'' सादर केले, जे सर्व निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी एकमताने स्वीकारले. निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी घोषणापत्राचे पाच प्रमुख स्तंभ - मतदार याद्यांमध्ये दुरुस्ती, निवडणूक प्रक्रियेचे संचालन, संशोधन आणि प्रकाशन, तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षण निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी मतदार याद्यांची शुद्धता,

# मतदार हीच लोकशाहीची खरी ताकद

लोकशाहीत मतदार सर्वोच्च स्थानावर आहे. त्याचा सहभाग वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोग सातत्याने प्रयत्न करतो. याच मालिकेअंतर्गत 25 जानेवारी रोजी 16 वा राष्ट्रीय मतदार दिन 2026 साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु मुख्य अतिथी म्हणून सहभागी झाल्या होत्या. त्यांनी पाच नवनोंदणीकृत युवा मतदारांना मतदार छायाचित्र ओळखपत्र सुपूर्द केले. यावेळी त्या म्हणाल्या, हे ओळखपत्र तुम्हाला जगातील सर्वात मोठ्या आणि सशक्त लोकशाहीत सक्रिय सहभागाचा अमूल्य अधिकार प्रदान करते. सर्व युवा मतदारांनी अत्यंत जबाबदारीने मताधिकाराचा वापर करून देश उभारणीत आपली सहभाग नोंदवावा. त्याच वेळी त्यांनी निवडणुकीत मोठ्या संख्येने मतदान करणाऱ्या माता-भगिनींचे अभिनंदन केले आणि त्या म्हणाल्या की त्या प्रजासत्ताकाला अधिक शक्तिशाली बनवत आहेत.

आधुनिक लोकशाहीच्या संदर्भात दोन तारखा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. 26 नोव्हेंबर 1949 ज्या दिवशी संविधान स्वीकारले गेले आणि 26 जानेवारी 1950 ज्या दिवशी संविधान पूर्णतः लागू केले गेल, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यावेळी म्हणाल्या. संविधानाचे केवळ 16 कलम असे होते जे 26 नोव्हेंबर 1949 रोजीच तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आले होते. त्यापैकी 324 हे एक कलम होते, ज्या अंतर्गत 26 जानेवारी 1950 म्हणजेच प्रजासत्ताकाच्या स्थापनेच्या एक दिवस आधीच, 25 जानेवारी 1950 रोजी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याच निमित्ताने लोकशाहीचा विशेष उत्सव साजरा केला जातो. देशात मतदारांची संख्या 95 कोटींपेक्षा जास्त आहे पण लोकशाहीची शक्ती केवळ संख्या मोठी असण्यात नाही तर लोकशाही भावनेच्या गहिरेपणात देखील आहे असे त्यांनी सांगितले.

## 16 वा राष्ट्रीय मतदार दिन

भारत निवडणूक आयोगाने 25 जानेवारी रोजी 16वा राष्ट्रीय मतदार दिन (एनव्हीडी-2026) 'माझा भारत, माझे मत' या संकल्पनेवर आणि 'भारतीय नागरिक, लोकशाहीच्या केंद्रस्थानी' या घोषवाक्याने साजरा केला.

## विविध श्रेणींमध्ये पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी विविध श्रेणींमध्ये सर्वश्रेष्ठ निवडणूक प्रक्रियांचे पुरस्कार देखील प्रदान केले. यामध्ये तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी बिहार, केरळ आणि तामिळनाडूला; निवडणूक व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक्सच्या श्रेणीत ओदिशा, मेघालय आणि बिहारला; सर्जनशील मतदार जागरूकतेसाठी बिहार, गुजरात आणि केरळला; आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी मिझोराम आणि बिहारला; तर, बिहार, उत्तर प्रदेश आणि झारखंडला प्रशिक्षण तसेच क्षमता विकासासाठी पुरस्कार मिळाले.

## दोन पुस्तकांचे प्रकाशन

या कार्यक्रमात '2025: पुढाकार आणि नवोन्मेषाचे वर्ष' आणि 'चुनाव का पर्व, बिहार का गर्व', बिहारमधील सार्वत्रिक निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्याबद्दलचे पुस्तक, अशा दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये 2025 दरम्यान निवडणूक व्यवस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी केलेल्या 30 पेक्षा जास्त प्रयत्नांचे दस्तऐवजीकरण देखील करण्यात आले आहे.






*आजचे मतदार, भारताच्या भविष्याचे निर्माते देखील आहेत. मतदानाचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे तितकाच महत्त्वाचे हे देखील आहे की, सर्व प्रौढ नागरिकांनी आपल्या घटनात्मक कर्तव्यांचे भान ठेवून आपल्या मताधिकाराचा वापर करावा. मी आशा करते की आपले सर्व मतदार प्रलोभन, माहितीचा अभाव, भ्रम पसरवणारी माहिती, दुष्प्रचार आणि पूर्वग्रहापासून मुक्त राहून, आपल्या विवेकाच्या आधारावर आपली निवडणूक व्यवस्था सक्षम राहील हे पाहीतील.*

**- द्रौपदी मुर्मु, राष्ट्रपती**

निवडणूक प्रक्रिया संचालन, संशोधन आणि प्रकाशन, तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षण तसेच क्षमता बांधणी या घोषणेच्या पाच प्रमुख स्तंभांसाठी सामूहिकपणे कार्य करण्याची वचनबद्धता व्यक्त केली. सर्व सहभागींनी आपल्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेण्याचा संकल्प देखील केला. या परिषदेत 3, 4 आणि 5 डिसेंबर 2026 रोजी नवी दिल्ली इथल्या भारतीय आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन संस्था (आयआयआयडीईएम) मध्ये बैठक आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला गेला.

राष्ट्रपतींचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.






नियुक्ति पत्र

# राष्ट्र निर्माणाचे आमंत्रण पत्र

*भारत आज जगातील सर्वात युवा देशांपैकी एक आहे. अशा परिस्थितीत भारताच्या युवाशक्तीसाठी देशात जगात नवनवीन संधी निर्माण व्हाव्यात हाच केंद्र सरकारचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. याच मालिकेअंतर्गत 24 जानेवारी रोजी 61 हजारापेक्षा जास्त तरुणांना रोजगार मेळ्यामध्ये सरकारी सेवेसाठीची नियुक्ती पत्रे प्रदान केली गेली. नियुक्ती पत्र वितरणादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज तुम्हा सर्वांना सरकारी सेवांची नियुक्ती पत्रे मिळत आहेत, हे एका अर्थाने राष्ट्र निर्माणाचे आमंत्रण पत्र आहे. हे विकसित भारताच्या उभारणीला गती देण्याचेही संकल्प पत्र आहे...*

युवकांना कौशल्यांशी जोडणे आणि त्यांना रोजगार-स्वरोजगाराच्या संधी देणे, हे केंद्र सरकारचे प्राधान्य राहिले आहे. याच मालिकेअंतर्गत सरकारी भरतीला मिशन मोडवर आणण्यासाठी रोजगार मेळ्याची सुरुवात करण्यात आली. यामुळेच तर अलिकडच्या वर्षांमध्ये रोजगार मेळा एक इन्स्टिट्यूशन बनला आहे. या माध्यमातून लाखो तरुणांना सरकारच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये नियुक्ती पत्रे मिळाली आहेत. रोजगार मेळ्यांअंतर्गत नियुक्ती पत्र वितरणादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, तुमच्यापैकी बरेच सहकारी देशाची सुरक्षा बळकट करतील. शिक्षण आणि आरोग्यविषयक परिसंस्थेला अजून सक्षम बनवतील. अनेक सहकारी वित्तीय सेवा आणि उर्जा सुरक्षेला बळकटी देतील तर अनेक तरुण सरकारी कंपन्यांच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावतील. मी तुम्हा सर्व तरुणांचे खूप खूप अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो.

रोजगार मेळ्यात 8 हजारपेक्षा जास्त मुलींनाही नियुक्ति पत्रे दिली गेली. गेल्या 11 वर्षांत, देशाच्या मनुष्यबळात महिलांचा सहभाग सुमारे दुप्पटीने वाढला आहे. सरकारच्या मुद्रा आणि स्टार्टअप इंडिया सारख्या योजनांचा महिलांनाही खूप मोठा फायदा झाला आहे. महिला स्वयंरोजगाराचा दरातही सुमारे 15% ने वाढ झाली आहे.

## युवा वर्गाला मिळत आहे नवनवीन संधी

अलिकडच्या काळात भारताने आधुनिक पायाभूत सुविधांसाठी अभूतपूर्व गुंतवणूक केली आहे. यामुळे बांधकामांशी संबंधित

# रोजगार मेळ्याच्या माध्यमातून
## 11 लाखपेक्षा जास्त नियुक्ति पत्रे वितरीत

- रोजगार मेळ्याला प्रारंभ झाल्यापासून, देशभर आयोजित रोजगार मेळ्याच्या माध्यमातून 11 लाखपेक्षा जास्त नियुक्ति पत्रे वितरीत करण्यात आली आहेत.
- देशभरात 45 ठिकाणी 18व्या रोजगार मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते.
- भारताच्या सर्व भागांतून निवड झालेले नवनियुक्त उमेदवार गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, उच्च शिक्षण विभागासह केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये पदभार स्वीकारतील.

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

*आज भारतावर ज्या प्रकारे जगाचा विश्वास वाढतो आहे, त्यामुळेही युवा वर्गासाठी अनेक नवीन शक्यता निर्माण होत आहेत. भारताने एका दशकभरात जीडीपी दुप्पट केला आहे. 2014 या वर्षापूर्वीच्या दहा वर्षांच्या तुलनेत भारतात अडीच पटीपेक्षा जास्त एफडीआय आला आहे. जास्त परकीय गुंतवणुकीचा अर्थ आहे, भारताच्या युवा वर्गासाठी रोजगाराच्या अगणित संधी.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## युवा वर्गाला सरकारी नोकरी देण्यासाठी रोजगार मेळा

| कधी झाले | नियुक्ति पत्रे दिली गेली |
|---|---|
| 22 ऑक्टोबर 2022 | 75 हजारपेक्षा जास्त |
| 22 नोव्हेंबर 2022 | 71 हजारपेक्षा जास्त |
| 20 जानेवारी 2023 | 71 हजारपेक्षा जास्त |
| 13 एप्रिल 2023 | 71 हजारपेक्षा जास्त |
| 16 मे 2023 | 70 हजारपेक्षा जास्त |
| 13 जून 2023 | 70 हजारपेक्षा जास्त |
| 22 जुलै 2023 | 70 हजारपेक्षा जास्त |
| 28 ऑगस्ट 2023 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 26 सप्टेंबर 2023 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 28 ऑक्टोबर 2023 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 30 नोव्हेंबर 2023 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 12 फेब्रुवारी 2024 | 1 लाखपेक्षा जास्त |
| 29 ऑक्टोबर 2024 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 23 डिसेंबर 2024 | 71 हजारपेक्षा जास्त |
| 26 एप्रिल 2025 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 12 जुलै 2025 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 24 ऑक्टोबर 2025 | 51 हजारपेक्षा जास्त |
| 24 जानेवारी2026 | 61 हजारपेक्षा जास्त |

प्रत्येक क्षेत्रांमध्ये रोजगार मोठ्या प्रमाणात वाढले. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेची व्याप्ती देखील वेगाने वाढते आहे.

आज देशात सुमारे दोन लाख स्टार्टअप आहेत. त्याअंतर्गत एकवीस लाखपेक्षा जास्त युवा काम करत आहेत. याचप्रमाणे, डिजिटल इंडियाने एका नवीन अर्थव्यवस्थेचा विस्तार केला आहे. ॲनिमेशन, डिजिटल मीडिया यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये भारत एक जागतिक केंद्र बनत चालला आहे. भारताची सर्जनशील अर्थव्यवस्था अत्यंत वेगाने वाढते आहे. यातही युवा वर्गाला नवनवीन संधी मिळत आहेत.

### भारत बनू लागला आहे मोठी उत्पादक शक्ती

आज भारत एक मोठी उत्पादक शक्ती बनत चालला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, औषधे-लस, संरक्षण, मोटारवाहन, अशा अनेक क्षेत्रांमध्ये भारताचे उत्पादन आणि निर्यात अशा दोन्हीमध्ये अभूतपूर्व वाढ होत आहे. 2014 पासून भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांमध्ये सहा पट वाढ झाली आहे. आज हे 11 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याचा औद्योगिक समूह बनला आहे. इलेक्ट्रॉनिक्स निर्यातने देखील चार लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. भारताचे मोटार वाहन उद्योग क्षेत्र देखील सर्वात वेगाने वाढत असलेल्या क्षेत्रांपैकी एक क्षेत्र बनले आहे. 2025 या वर्षात दूचाकींच्या विक्रीने दोन कोटींचा टप्पा ओलांडला आहे. ■



पराक्रम दिवस

# राष्ट्रीय जाणीवेचा उत्सव

*नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव असे की, ज्यांच्या केवळ स्मरणाने मनात देशप्रेमाची लाट उसळते. त्यांनी युवा वर्गाला संघटित करून आझाद हिंद फौज उभी केली आणि पहिली लष्करी मोहीम राबवली. अंदमान-निकोबारमध्ये तिरंगा फडकावून 1943 सालीच स्वतंत्र भारताची घोषणा केली. 2021 या वर्षापासून 23 जानेवारी हा त्यांचा जयंती दिन पराक्रम दिवस म्हणून साजरा केला जातो. अंदमान आणि निकोबार बेटसमूहातील पराक्रम दिवसाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की पराक्रम दिवस, देशाच्या राष्ट्रीय भावनेचा आणि राष्ट्रीय जाणीवेचे एक अविभाज्य पर्व बनला आहे....*

नेताजी सुभाष चंद्र बोस स्वातंत्र्य लढ्यातील महानायक होते, त्यासोबतच ते भारताचे महान स्वप्नद्रष्टे होते. त्यांनी अशा भारताची संकल्पना केली होती, ज्याचे स्वरूप आधुनिक असावे आणि त्याचा आत्मा भारताच्या पुरातन जाणीवांशी जोडलेला असावा. नेताजींच्या या दृष्टीकोनाची आजच्या पिढीला ओळख करून देणे, ही सर्वांची जबाबदारी आहे. केंद्र सरकार ही जबाबदारी चोखपणे पार पाडत आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्यांच्याविषयीची विविध कामे म्हणजे केवळ नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा सन्मानच नाहीत तर ती, युवा पिढीसाठी आणि भविष्यासाठी देखील अमर प्रेरणेचे स्रोत आहेत. आपल्या आदर्शांचा हा सन्मान, त्यांच्याकडून मिळणारी प्रेरणा, हेच विकसित भारताच्या आपल्या संकल्पाला ऊर्जा आणि आत्मविश्वासाने भारून टाकत आहे. एका कमकुवत राष्ट्राला आपल्या ध्येयांपर्यंत पोहोचणे कठीण असते. म्हणूनच नेताजी सुभाष यांनी नेहमी सशक्त राष्ट्राचे स्वप्न पाहिले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज 21 व्या शतकातील भारत देखील एक सशक्त आणि दृढनिश्चयी राष्ट्र म्हणून आपली ओळख निर्माण करत आहे. भारत आज ताकदीचा विस्तार करणे, ताकद सांभाळून ठेवणे तसेच तिचा वापर करणे हे देखील जाणतो. नेताजी सुभाष यांच्या समर्थ भारताच्या दृष्टीकोनानुसार वाटचाल



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

# नेताजींचे जीवन आणि आदर्श लोकप्रिय करण्याचे प्रयत्न

- पीएम पंतप्रधान मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना 23 जानेवारी 2009 रोजी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा कायापालट करणारी नेताजींशी संबंधित ई-ग्राम विश्वग्राम या एका आघाडीच्या योजनेचा प्रारंभ केला.
- पंतप्रधान मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना 2012 मध्ये आझाद हिंद फौज दिनानिमित्त अहमदाबादमध्ये एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.
- नेताजींशी संबंधित फाईल्स आणि दस्तऐवज सार्वजनिक करण्यात आले.
- 2018 मध्ये आझाद हिंद सरकारच्या स्थापनेचा 75 वा वर्धापन दिन लाल किल्ल्यावर साजरा करण्यात आला. तिथे पंतप्रधान मोदी यांनी तिरंगा फडकवला.
- अंदमान आणि निकोबार बेटसमूहातील श्रीविजयपुरम (तत्कालीन पोर्ट ब्लेअर) मध्ये नेताजींनी तिथे राष्ट्रीय ध्वज फडकवण्याच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त तिरंगा फडकवला गेला.
- अंदमान आणि निकोबार बेटसमूहातील तीन प्रमुख बेटांची नावे बदलण्यात आली. यांपैकी रॉस बेटाला आता नेताजी सुभाष चंद्र बोस बेट या नावाने ओळखले जाते.
- लाल किल्ल्यात स्थित क्रांती मंदिर संग्रहालयात नेताजी आणि इंडियन नॅशनल आर्मीशी संबंधित महत्त्वाची ऐतिहासिक साधने ठेवण्यात आली आहे. यामध्ये नेताजींनी वापरलेल्या टोपीचा देखील समावेष आहे.
- 2021 मध्ये केंद्र सरकारने नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा जयंती दिन पराक्रम दिवस म्हणून घोषित केला.
- 13 सप्टेंबर, 2024 मध्ये अंदमान आणि निकोबार बेटसमूहाची राजधानी पोर्ट ब्लेअरचे नाव बदलून श्री विजयपुरम करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- वसाहतवादी मानसिकता संपुष्टात आणण्यासाठी आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्याप्रती श्रद्धांजली म्हणून इंडिया गेट जवळ त्यांचा पुतळा स्थापित करण्यात आला.

“

*नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांचे अढळ धैर्य, संकल्प आणि राष्ट्राप्रती असलेल्या त्यांच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण करतो. त्यांनी निर्भीड नेतृत्व आणि अढळ देशभक्तीचे उदाहरण आखून दिले आहे. त्यांचे आदर्श पिढ्यानपिढ्या एका मजबूत भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणा देत आहेत.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## पराक्रम दिवस

- त्या वारशाला नमन, ज्याने अशक्य वाटणाऱ्या गोष्टींना आव्हान दिले.
- त्या धैर्याचे स्मरण, ज्याने इतिहासाचा प्रवाह बदलला.
- त्या मूल्यांची पुनर्स्थापना, ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला आयाम दिला.

करत, आज आपण संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनवण्याचे काम करतो आहोत. पूर्वी भारत केवळ परदेशातून मागवलेल्या शस्त्रांवर अवलंबून राहत असे. इतकेच नाही तर आज संरक्षण निर्यातीने 23 हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. भारतात बनलेली ब्रह्मोस आणि इतर क्षेपणास्त्रे, कितीतरी देशांचे लक्ष वेधून घेत आहेत.

### सुभाष चंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार - 2026

सिक्किम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची संस्थांतर्गत श्रेणीमध्ये आणि लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची वैयक्तिक श्रेणीमध्ये सुभाष चंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार - 2026 साठी निवड झाली. केंद्र सरकारने आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रात भारतातील व्यक्ती आणि संस्थांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची आणि निःस्वार्थ सेवेची दखल घेण्यासाठी तसेच त्यांना सन्मानित करण्यासाठी सुभाष चंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्काराची स्थापना केली आहे. त्याचबरोबर, देशातील आपत्ती व्यवस्थापनाच्या पद्धती, पूर्वतयारी, आपत्ती निवारण आणि आपत्तीशी लढण्याच्या कार्यपद्धतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. यामुळेच तर नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगांतील मृत्युदरात मोठी घट झाली आहे.

### 13 ठिकाणी पराक्रम दिवसाचे आयोजन

अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहात आयोजित मुख्य समारंभासोबतच, कटक, कोडालिया, रामगड, हरिपुरा, जबलपूर, कोलकाता, मुर्शिदाबाद, डलहौजी, दिल्ली, मोइरांग, कोहिमा, गोमो आणि मेरठ या देशभरातील 13 प्रमुख ठिकाणी देखील पराक्रम दिवस साजरा करण्यात आला. ही ठिकाणे नेताजींचे जीवन आणि वारशाशी अगदी घनिष्ठतेने जोडलेली आहेत. ▪




राष्ट्रीय कॅडेट कोर

# आत्मविश्वासपूर्ण-शिस्तबद्ध युवा शक्ती

*नॅशनल कॅडेट कोर (एनसीसी) ही अशी एक संघटना, अशी एक चळवळ आहे जी भारताच्या युवाशक्तीला आत्मविश्वासपूर्ण, शिस्तबद्ध - संवेदनशील आणि राष्ट्रासाठी समर्पित नागरिक म्हणून घडवते. एनसीसीमध्ये सहभागी होणाऱ्या कॅडेट्सची संख्या गेल्या वर्षांत 14 लाख वरून वाढून 20 लाखांवर पोहोचली आहे. एनसीसी प्रजासत्ताक दिन शिबिर 2026 च्या समारोपानिमित्त दिल्लीच्या करियाप्पा संचलन मैदानावर आयोजित वार्षिक एनसीसी पंतप्रधान रॅलीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले - एनसीसी दरवर्षी आपली भूमिका अधिक सक्षम बनवत आहे...*

एनसीसी, युवा वर्गाचे व्यासपीठ आहे. या व्यासपीठावर आपल्या वारशाचा अभिमानान बाळगला जातो. जसे या वर्षी वंदे मातरम् च्या 150 वर्षपूर्तीचा उत्सव एनसीसीने मोठ्या उत्साहात साजरा केला. परमवीर सागर यात्रा हे देखील याचेच एक उत्तम उदाहरण आहे. एनसीसी रॅलीमध्ये परमवीर सागर यात्रेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, तुम्हा सर्वांना माहिती आहे की, काही वर्षांपूर्वी सरकारने अंदमान-निकोबारच्या 21 बेटांना परमवीर चक्र विजेत्यांची नावे दिली होती. यामागे देशाच्या नायकांचा सन्मान करण्याची जी भावना होती, ती नौकायन मोहिमेच्या माध्यमातून पुढे नेण्यात आली आहे. याचप्रमाणे, लक्षद्वीपमध्ये बेट-उत्सवाच्या माध्यमातून तुम्ही समूद्र, संस्कृती, निसर्ग या सर्वांचा एकत्र उत्सव साजरा केला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी एनसीसी कॅडेट्सचे कौतुक करताना सांगितले की एनसीसीने इतिहासाला स्मारकांमधून बाहेर काढून जनसामान्यांच्या हृदयात जिवंत केले आहे. एनसीसीने बाजीराव पेशवे यांचे शौर्य, महायोद्धा लसित बोरफुकन यांचे कौशल्य आणि भगवान बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाबद्दल आपल्या सायकल रॅलीच्या माध्यमातून लोकभावना जागवण्याचे काम केले. आज संपूर्ण जग युवा भारताच्या युवा वर्गाकडे मोठ्या विश्वासाने पाहते आहे. या विश्वासाचे कारण म्हणजे, कौशल्य आणि संस्कार. भारताच्या युवा वर्गाकडे लोकशाहीचे संस्कार आहेत, प्रत्येक प्रकारच्या विविधतेचा सन्मान करण्याचे संस्कार आहेत, सोबतच संपूर्ण जगाला एक कुटुंब मानण्याचे संस्कार आहेत. पंतप्रधान मोदी यांनी रॅलीमध्ये सांगितले की, यामुळेच भारताचा युवा वर्ग कुठेही जातो तेव्हा त्या देशातील लोकांमध्ये सहजपणे मिसळून जातो, त्यांची मने जिंकतो. आपण आपल्या सामर्थ्याने त्या देशाच्या विकासात मदत करतो. हेच

# एनसीसी कॅडेट्सची संख्या 20 लाख

मागील वर्षांमध्ये एनसीसी कॅडेट्सची संख्या 14 लाख वरून वाढून 20 लाख झाली आहे. विशेषतः सीमावर्ती भाग आणि किनारपट्टीच्या क्षेत्रात एनसीसी कॅडेट्सच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. एनसीसीने एक पेड मां के नाम या मोहिमेअंतर्गत सुमारे 8 लाख रोपे देखील लावली आहेत.



## रॅलीची संकल्पना

## 'राष्ट्र प्रथम - कर्तव्य निष्ठ युवा'

- वार्षिक एनसीसी पंतप्रधान रॅली 2026 ची संकल्पना राष्ट्र प्रथम-कर्तव्यनिष्ठ युवा अशी होती. या संकल्पनेतून भारताच्या युवा वर्गामधील कर्तव्य, शिस्त आणि राष्ट्रीय वचनबद्धतेची भावना दिसून येते.
- एनसीसी पंतप्रधान रॅली, महिनाभर चालणाऱ्या एनसीसी प्रजासत्ताक दिन शिबिर 2026 च्या समारोपाचे प्रतीक.
- या वर्षी देशभरातून 2,406 एनसीसी कॅडेट्सनी शिबिरात सहभाग घेतला. यात 898 विद्यार्थिनी कॅडेट्सचाही समावेश होता. रॅलीमध्ये इतर 21 देशांमधील 207 युवक आणि अधिकारी देखील सहभागी झाले.
- या रॅलीमध्ये एनसीसी कॅडेट, राष्ट्रीय रंगशाळा आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सदस्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासह राष्ट्र उभारणी, समाजसेवा आणि चरित्र्याच्या जडणघडणीतील युवा वर्गाची भूमिका मांडली.

*आपल्या देशातील युवावर्गाचे जे यशदायी टप्पे आहेत, त्यांचे संपूर्ण जग कौतुक करत आहे. या युवा वर्गामुळेच भारत जगात माहिती तंत्रज्ञानाचा कणा बनला आहे. आता याच युवा वर्गाच्या शक्तीच्या आधारे स्टार्टअप, अंतराळ, डिजिटल तंत्रज्ञान, अशा प्रत्येक क्षेत्रात एक नवीन क्रांती सुरु झाली आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

आपले संस्कार आहेत, हाच आपला स्थायीभाव आहे. मातृभूमीप्रती अपार श्रद्धा आणि कर्मभूमीप्रती अप्रतिम समर्पण, हा आपला वारसा आहे.

### युवा वर्गाला फिटनेसचा मंत्र

युवाशक्तीची मोठी कसोटी ही आहे की, आपण येत्या काळात किती अधिक फिट असू. फिटनेस केवळ काही मिनिटांच्या व्यायामापुरता मर्यादित नाही. तो आपल्या स्वभावातही यायला हवा. खाण्यापिण्यापासून ते दिनचर्येपर्यंत एक शिस्तबद्ध जीवनशैली देखील गरजेची आहे. एनसीसी फिट इंडिया मोहिमेली पुढची दिशा देत आहे. एनसीसीच्या कॅडेट्सनी खेळांमध्येही चांगली कामगिरी केली आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा वर्गाला आवाहन केले... आपल्या खाण्यामधील तेलाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करा. मी काही काळापूर्वी जेवणातील तेलाचे प्रमाण 10 टक्के कमी करण्याचे आवाहन केले होते. आज तुम्हा सर्व युवांना मी पुन्हा त्याच आवाहनाची आठवण करून देत आहे.

### एनसीसीमुळे बळकट झाली पंतप्रधान मोदी यांची राष्ट्र प्रथम (नेशन फर्स्ट) ची भावना

राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित ऑपरेशन सिंदूर सारख्या महत्त्वाच्या घटनेवेळी एनसीसी कॅडेट्सनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. कोणी सेनादलांच्या तयारीमध्ये सहकार्य केले, कोणी रक्तदान शिबिरे लावली. कोणी प्राथमिक उपचार शिबिरांच्या माध्यमातून सेवा केली. एनसीसीमध्ये संचलन मैदानातील प्रशिक्षणासोबतच राष्ट्र प्रथम (नेशन फर्स्ट) च्या विचारधारेचे प्रशिक्षणही दिले जाते. एनसीसीमधून मिळालेली हीच देशभक्ती आणि नेतृत्व कठीण काळात देशाप्रती पूर्ण ताकदीने काम करण्याची प्रेरणा देते. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की जेव्हा मी एनसीसीमध्ये होतो, तेव्हा माझी देखील राष्ट्र प्रथम (नेशन फर्स्ट) ही भानवा अशीच बळकट झाली होती. आज मी तुम्हाला देखील एनसीसीमध्ये हेच शिकताना पाहतो आहे, मला अभिमान वाटतो आहे.




भारताचा नवीन ऊर्जा दृष्टिकोन

# केवळ ऊर्जा सुरक्षा नव्हे... तर आत्मनिर्भरतेचा संकल्प

*भविष्यातल्या गरजा आणि आव्हाने पाहता भारत आता केवळ ऊर्जा सुरक्षा नव्हे तर ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दिशेने कार्य करत आहे. भारतात ऊर्जा क्षेत्रात अपरिमित संधी आहेत. आणि म्हणूनच गोवा येथे 27-30 जानेवारी दरम्यान आयोजित भारत ऊर्जा सप्ताह 2026 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक प्रतिनिधींना मेक इन इंडिया, इनोव्हेट इन इंडिया, स्केल विथ इंडिया, इन्व्हेस्ट इन इंडिया साठी आवाहन केले.*


भारतात आता ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता हा एक पर्याय नाही तर आर्थिक, धोरणात्मक आणि भू राजकीय गरज बनली आहे. याच कारणाने भारत हरित आणि स्वच्छ उर्जेला अत्यंत वेगाने आत्मसात करत असून उत्पादन क्षमतेची मोठी उद्दिष्टे निर्धारित करुन त्यांना कालमर्यादेच्या आधीच साध्य करत आहे. भारत ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण बनण्याच्या मोहिमेवर भर देत आहे आणि परदेशी इंधनावरील अवलंबित्व कमी करत आहे. ऊर्जा क्षेत्रात भागीदारी आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी देखील प्रयत्न सुरु आहेत. भारत ऊर्जा क्षेत्राची एक अशी परिसंस्था विकसित करत आहे. जी देशातील स्थानिक गरजांना पूर्ण करु शकेल आणि कमी खर्चाच्या शुद्धीकरण आणि वाहतूक विषयक समस्यांना दूर करुन जगासाठी उत्पादन अधिक स्पर्धात्मक बनवू शकते.

भारत आज प्रत्येक क्षेत्रात जागतिक भागीदारी वाढवण्याच्या दृष्टीने निरंतर कार्य करत आहे. याच भागीदारीला वृद्धिंगत करण्याचं दिशेने आयोजित भारत ऊर्जा सप्ताह 2026 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की भारताने ऊर्जा मूल्य साखळीशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीची अनेक कवाडे खुली केली आहेत. भारताने आपले उत्खनन क्षेत्र लक्षणीयरित्या खुले केले आहे. । खोल



*आजचा भारत रिफॉर्म एक्सप्रेसवर स्वार झाला असून प्रत्येक क्षेत्रात वेगाने सुधारणा होत आहे. देशांतर्गत हायड्रोकार्बन्स क्षेत्राला बळकटी देण्यासाठीही सुधारणा केल्या जात आहेत. जागतिक सहकार्याच्या दृष्टीने पारदर्शक आणि गुंतवणूकदार स्नेही वातावरण निर्माण केले जात आहे. उत्खनन क्षेत्रात नो गो क्षेत्रांमध्ये कपात करण्यात आली आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

## भारताच्या ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करणे फायदेशीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत ऊर्जा सप्ताह 2026 मध्ये सहभागी झालेल्या 125 देशांच्या प्रतिनिधींना सांगितले की भारत ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीला प्राधान्य देतो. भारतात मोठ्या प्रमाणावर तेल शुद्धीकरण अर्थात रिफायनिंग क्षमता आहे. या बाबतीत भारत जगातील मोठ्या देशांना मागे टाकणार आहे. भारताची सध्याची तेल शुद्धीकरण क्षमता दरवर्षी 260 दशलक्ष मेट्रिक टन असून ती 300 दशलक्ष मेट्रिक टन पेक्षा जास्त करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. आपल्या एकूण ऊर्जेच्या मागणीपैकी 15 टक्के मागणी एलएनजीच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे त्यांनी नमूद केले. एलएनजीचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यासाठी पायाभूत सुविधा आणि वाहतुकीत गुंतवणूक आवश्यक आहे, जी भारतात विकसित केली जात आहे. भारताने अलीकडेच 70 हजार कोटी रुपयांचा जहाजबांधणी कार्यक्रम सुरू केला आहे. एलएनजी वाहतुकीसाठी आज मजबूत पायाभूत सुविधांची देखील आवश्यकता आहे.

## भारतीय वस्तूंची निर्यात जगभरातील 150 हून अधिक देशांमध्ये केली जाते

भारत ऊर्जा क्षेत्रासाठी अगणित विशाल संधींची भूमी आहे. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, जिथे ऊर्जा उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. या व्यतिरिक्त जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी भारत उत्कृष्ट संधीदेखील पुरवत आहे. भारत आज जगातील पेट्रोलियम उत्पादनांच्या अव्वल पाच निर्यातदारांपैकी एक असून त्याची निर्यात व्याप्ती 150 हून अधिक देशांपर्यंत विस्तारली आहे. भारताची ही क्षमता सर्वांसाठी खूप फायदेशीर ठरेल, असे त्यांनी सांगितले. ऊर्जा सप्ताहाचा हा मंच भागीदारी शोधण्यासाठी एक उत्कृष्ट ठिकाण आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

समुद्रातील उत्खननाशी संबंधित अभियान देखील वेगाने सुरु आहे. भारताने या दशकाच्या अखेरीस तेल आणि वायू क्षेत्रातील गुंतवणूक 100 अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्याची व्याप्ती 10 लाख चौरस किलोमीटरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. या दृष्टिकोनातून, आम्ही आधीच 170 हून अधिक ब्लॉक्सचे वाटप केले आहे. अंदमान आणि निकोबार खोरे देखील देशासाठी एक महत्त्वाचे हायड्रोकार्बन केंद्र बनत आहे. ▪




# धोरणात्मक भागीदारी विकासाला गती देते

*गेल्या काही वर्षांत संयुक्त अरब अमिराती आणि भारत यांच्यातील संबंध नवीन उंचीवर पोहोचले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांनी 19 जानेवारी रोजी भारताला भेट दिली. या काही तासांच्या भेटीदरम्यान, दोन्ही देशांमध्ये अनेक महत्त्वाचे करार करण्यात आले.*

भारत आणि संयुक्त अरब अमिराती व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संरक्षण आणि नवोन्मेष या क्षेत्रात धोरणात्मक भागीदारी आणि सहकार्य सतत मजबूत करत आहेत. संयुक्त अरब अमिरातीच्या राष्ट्राध्यक्षांची ही भेट केवळ औपचारिक सौजन्याने नाही तर सामायिक समृद्धी, तांत्रिक सहकार्य आणि लोकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यासाठी एक निर्णायक पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यूएईच्या अध्यक्षांचे स्वागत करण्यासाठी दिल्ली विमानतळावर स्वतः गेले होते यावरुन दोन्ही देशांमधील संबंधांचे महत्त्व आणखी अधोरेखित होते. ही भेट दोन्ही देशांमधील घनिष्ठ मैत्रीला असलेले महत्त्व प्रतिबिंबित करते. शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांची गेल्या दहा वर्षांतील ही पाचवी भेट असून संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर ही त्यांची तिसरी भेट आहे यावरुन देखील दोन्ही देशांमधील संबंधांची उंची लक्षात येते.

बैठकीनंतर दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन केले आणि त्यामध्ये सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावर (सीईपीए) 2022 मध्ये स्वाक्षरी केल्यापासून झालेल्या व्यापार आणि आर्थिक सहकार्यातील लक्षणीय वाढीचे स्वागत केले. आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये द्विपक्षीय व्यापारातील वाढ 100 अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचला आहे तर 2032 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचे आणि त्यानुसार 200 अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. भारत-संयुक्त अरब अमिरात मैत्रीचे चिरस्थायी प्रतीक म्हणून अबू धाबीमध्ये 'हाऊस ऑफ इंडिया ' स्थापन करण्याचा निर्णय दोन्ही नेत्यांनी घेतला.



## प्रमुख घोषणा

- भारतात सुपरकॉम्प्युटिंग क्लस्टरची स्थापना केली जाणार.
- 2032 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 200 अब्ज डॉलर्सपर्यंत दुप्पट करण्याचे उद्दिष्ट
- द्विपक्षीय नागरी अणुऊर्जा सहकार्याला चालना देणे.
- गुजरातमधील गिफ्ट सिटीमध्ये यूएई कंपन्यांची कार्यालये आणि कामकाज - फर्स्ट अबू धाबी बँक (एफएबी) आणि डीपी वर्ल्डची स्थापना.
- डिजिटल/डेटा दूतावास स्थापन करण्याच्या शक्यतेचा शोध घेणे. अबू धाबीमध्ये 'हाऊस ऑफ इंडिया' ची स्थापना.
- युवा देवाणघेवाणीला प्रोत्साहन देणे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.





**2026 मध्ये भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाच्या यशासाठी संयुक्त अरब अमिरातीने पूर्ण पाठिंबा दर्शविला. तर 2026 च्या अखेरीस संयुक्त अरब अमिरातीच्या सह-आयोजनाने होणाऱ्या संयुक्त राष्ट्र जल परिषद 2026 ला भारताने पाठिंबा दर्शविला.**

सांस्कृतिक समज अधिक खोलवर वाढवण्याच्या उद्देशाने लोककेंद्रित संबंध जोपासणे सुरू ठेवण्यावरही त्यांनी सहमती दर्शविली. शिक्षण हा भारत-संयुक्त अरब अमिरात भागीदारीचा कणा असल्याचे उभय नेत्यांनी नमूद केले. संयुक्त अरब अमिरातीमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट-अहमदाबादचे ऑफशोअर कॅम्पस सुरु झाल्याची दखल घेत त्यांनी दोन्ही देशांमधील विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमधील संबंधांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. यामध्ये शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नवोन्मेष आणि टिंकरिंग लॅब्सचा विस्तार करण्यात सहकार्य समाविष्ट असेल.

दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय ऊर्जा भागीदारीच्या ताकदीबद्दल समाधान व्यक्त केले. भारताच्या ऊर्जा सुरक्षेत संयुक्त अरब अमिरातीचे योगदान अधोरेखित केले गेले . हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) आणि एडीएनओसी गॅस यांच्यात 2028 पासून सुरु होणाऱ्या वार्षिक 0.5 दशलक्ष टन द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या वितरणासाठी 10 वर्षांच्या एलएनजी पुरवठा करारावर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही नेत्यांनी परस्परांच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेप्रति तसेच धोरणात्मक स्वायत्ततेच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी स्थिर आणि मजबूत द्विपक्षीय संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य व्यापक धोरणात्मक भागीदारीचा मुख्य आधारस्तंभ असल्याचे मान्य केले. दोन्ही नेत्यांनी सीमेपलीकडील दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाचा स्पष्ट निषेध केला आणि दहशतवादी कारवायांना वित्तपुरवठा, योजना, समर्थन किंवा ती कृत्ये करणाऱ्यांना कोणत्याही देशाने सुरक्षित आश्रय देऊ नये यावर भर दिला. ▪



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

"सर्व करारांची जननी"

# भारत-ईयू संबंधांमध्ये एका नवीन युगाची सुरुवात झाली आहे

*जागतिक अर्थव्यवस्थेत आज मोठ्या प्रमाणावर उलथापालथ होत आहे. अशा वेळी भारत आणि युरोपीय संघ यांच्यात इतिहासातील सर्वात मोठा मुक्त व्यापार करार झाला असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थैर्य आणण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असेल. युरोपीय संघ सध्या भारताच्या सर्वात मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक आहे. भारत आणि युरोपीय संघामधील द्विपक्षीय व्यापार 2024-25 मध्ये 11.5 लाख कोटी रुपयांपर्यंत स्थिरपणे वाढण्याचा अंदाज आहे. या करारामुळे केवळ द्विपक्षीय व्यापार सुलभ आणि स्पर्धात्मक होणार नाही तर गुंतवणूक, नवोन्मेष, पुरवठा साखळी आणि रोजगारासाठी नवीन संधीही खुल्या होतील.*

जगातील दुसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थांमधील ऐतिहासिक मुक्त व्यापार करार अनेक प्रकारे महत्त्वपूर्ण आहे. या कराराचा फायदा केवळ भारत आणि युरोपीय संघाच्या दोन अब्ज लोकांना होणार नाही तर जगभरातील इतर देशांवरही मोठा परिणाम होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, युरोपीय कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपीय आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी झालेला हा ऐतिहासिक करार जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही देशांमधील संबंधांमध्ये एक निर्णायक अध्याय आहे.

भारत-ईयू मुक्त व्यापार करारामुळे आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत होतील. यामुळे भारतातील शेतकरी आणि लघु उद्योगांना युरोपीय बाजारपेठेत प्रवेश मिळेल आणि उत्पादन क्षेत्रात

नवीन संधी निर्माण होतील. सेवा क्षेत्रातील सहकार्य आणखी मजबूत होईल, रोजगार निर्मिती होईल, व्यावसायिक प्रतिभावंत, विद्यार्थी आणि संशोधकांसाठी गतिशीलता वाढेल. या करारामुळे व्यापार, गुंतवणूक आणि नवोपक्रमांना चालना मिळेल आणि युरोपीय संघामधील भारतीय विद्यार्थी, कामगार आणि व्यावसायिकांसाठी नवीन संधी उपलब्ध होतील.

गेल्या काही वर्षांत भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील संबंधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे, असे पंतप्रधान म्हणाले. आठ लाखांहून अधिक भारतीय, युरोपीय संघाच्या देशांमध्ये सक्रीय योगदान देत आहेत. आज दोघांमध्ये 180 अब्ज युरोचा व्यापार आहे. दोघांमध्ये धोरणात्मक तंत्रज्ञानापासून ते स्वच्छ ऊर्जेपर्यंत, डिजिटल प्रशासनापासून ते विकास भागीदारीपर्यंत प्रत्येक क्षेत्रात सहकार्याचे नवे आयाम स्थापित केले आहेत. भारताने आपल्या इतिहासातील सर्वात मोठा मुक्त व्यापार करार केला आहे. 27 तारीख हा एक सुखद योगायोग आहे कारण या दिवशी भारताने युरोपीय संघाच्या 27 देशांबरोबर मुक्त व्यापार करार केले. या ऐतिहासिक करारामुळे आपले शेतकरी आणि छोट्या उद्योगांना युरोपीय बाजारपेठेत प्रवेश करणे सोपे होईल, एवढेच नाही, तर या मुक्त व्यापार करारामुळे भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील गुंतवणुकीला चालना मिळेल आणि नवीन नवोन्मेषी भागीदारी निर्माण होईल. शिवाय, एफटीएमुळे गुंतवणूक वाढेल आणि भारत आणि युरोपीय संघमध्ये नाविन्यपूर्ण भागीदारी निर्माण होईल. हा करार जागतिक पुरवठा साखळी मजबूत करेल आणि सामायिक समृद्धीसाठी एक नवीन ब्लूप्रिंट प्रदान करेल.

संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य हा कोणत्याही धोरणात्मक भागीदारीचा पाया असतो आणि भारत आणि युरोपीय संघाने सुरक्षा आणि संरक्षण भागीदारीद्वारे त्याला औपचारिक स्वरूप दिले आहे, असे पंतप्रधान म्हणाले. यामुळे दहशतवादविरोधी, सागरी आणि सायबर सुरक्षेतील भागीदारी आणखी दृढ होईल. हिंद-प्रशांत क्षेत्रात सहकार्याची व्याप्ती वाढेल. राष्ट्रांमधील संबंधांमध्ये कधी-कधी असा क्षण येतो, जेव्हा इतिहास स्वतःच सांगतो, येथून दिशा बदलली, येथून एका नवीन युगाची सुरुवात झाली, असे पंतप्रधान म्हणाले.

### 10 वर्षांत व्यापार दुप्पट होईल

युरोपीय संघ हा भारताच्या सर्वात मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक आहे. गेल्या 10 वर्षांत भारत-ईयू व्यापार दुप्पट होऊन 180 अब्ज युरो झाला आहे. भारतात 6,000 हून अधिक युरोपीय कंपन्या कार्यरत



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तीन प्राधान्यांवर लक्ष केंद्रित

पहिले : आज जगात व्यापार, तंत्रज्ञान आणि अतिमहत्त्वाची खनिजे यांचाच शस्त्राप्रमाणे उपयोग करून घेतला जात आहे. अशा परिस्थितीत जगात परस्पर-अवलंबित्व पूर्णपणे निर्धोक करण्याची गरज आहे.

दुसरे : भारत आणि ईयू दोहोंचा संरक्षण उद्योगांवर आणि अद्ययावत तंत्रज्ञानावर भर आहे, पंतप्रधानांनी संरक्षण, अवकाश, दूरसंवाद आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांत अधिक सहयोगाचे आवाहन केले

तिसरे : स्वच्छ आणि संतुलित भविष्य ही दोन्ही पक्षांसाठी प्राधान्याची बाब आहे. त्यांनी, हरित हायड्रोजन, सौर ऊर्जा, आणि स्मार्ट ग्रिड या क्षेत्रांत संयुक्त संशोधन आणि गुंतवणुकीचे आवाहन केले.

## 22वा एफटीए भागीदार

युरोपीय संघ भारताचा 22 वा एफटीए भागीदार बनला आहे. 2014 पासून सरकारने मॉरिशस, संयुक्त अरब अमिराती, ब्रिटन , ईएफटीए, ओमान आणि ऑस्ट्रेलियासोबत व्यापार करारावर स्वाक्षरी केली आहे आणि न्यूझीलंडसोबत व्यापार करार जाहीर केला आहे. 2025 मध्ये, भारताने ओमान आणि ब्रिटन सोबत व्यापार करारावर स्वाक्षरी केली आणि न्यूझीलंडसोबत व्यापार करार झाल्याची घोषणा केली.



## चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल

भारत आणि युरोपीय संघाची एकत्रित बाजारपेठ अंदाजे 2091.6 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. या मुक्त व्यापार करारामुळे भारताच्या 99 टक्क्यांहून अधिक निर्यातीला व्यापार मूल्याच्या दृष्टीने चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल.

## युरोपीय बाजारपेठांमध्ये भारताचा प्रवेश

- भारताने युरोपीय बाजारांमध्ये 97% टॅरिफ लाईन्सवर, विशेषतः 99.5% व्यापार मूल्य व्यापणारी, प्राधान्यपूर्ण प्रवेश व्यवस्था निर्माण केली आहे.
- भारताच्या 90.7% निर्यातींना व्यापणाऱ्या 70.4% टॅरिफ लाईन्सवरील शुल्क तात्काळ काढून टाकले जाईल, ज्यामध्ये कापड, चामडे आणि पादत्राणे, चहा, कॉफी, मसाले, क्रीडा साहित्य, खेळणी आणि रत्ने यासारख्या प्रमुख कामगार-केंद्रित क्षेत्रांचा समावेश आहे.
- 3 आणि 5 वर्षात भारताच्या निर्यातीपैकी 2.9% निर्यात व्यापणाऱ्या 20.3% टॅरिफ लाइनसाठी शून्य शुल्क सुविधा, ज्यामध्ये काही सागरी उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्न, शस्त्रे आणि दारूगोळा इत्यादींचा समावेश आहे.
- भारताच्या निर्यातीपैकी 6% वाटा असलेल्या 6.1% टॅरिफ लाईन्सना काही पोल्ट्री उत्पादने, संरक्षित भाज्या, बेकरी उत्पादने इत्यादींसाठी टॅरिफ कपात करून किंवा कार, स्टील इत्यादींसाठी TRQ द्वारे प्राधान्याने प्रवेश मिळेल.

*भारत आणि युरोपीय संघ यांचे सहकार्य 'जागतिक कल्याणासाठी एक भागीदारी' आहे. आम्ही हिंद-प्रशांत क्षेत्रापासून ते कॅरेबियन पर्यंत, त्रिपक्षीय प्रकल्पांचा विस्तार करू. यामुळे शाश्वत शेती, स्वच्छ ऊर्जा आणि महिला सक्षमीकरणाला भक्कम समर्थन मिळेल. आम्ही एकत्रितपणे IMEC कॉरिडोरला, जागतिक व्यापार आणि शाश्वत विकासाचा एक प्रमुख दुवा म्हणून स्थापित करू.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आहेत. भारतात युरोपीय संघाची गुंतवणूक 120 अब्ज युरोपेक्षा जास्त आहे. युरोपीय संघात 1,500 भारतीय कंपन्या आहेत. तेथील भारतीय गुंतवणूक अंदाजे 40 अब्ज युरोपर्यंत पोहोचली आहे.

गेल्या काही वर्षांपासून वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापार सातत्याने वाढत आहे. वर्ष 2024-25 मध्ये, भारत आणि ईयू यांच्यातील वस्तूंचा द्विपक्षीय व्यापार 11.5 लाख कोटी रुपये होता, ज्यामध्ये 6.4 लाख कोटी रुपयांची निर्यात आणि 5.1 लाख कोटी रुपयांची आयात समाविष्ट होती. युरोपीय संघकडून भारतात होणाऱ्या निर्यातीमध्ये यंत्रसामग्री, वाहतूक उपकरणे आणि रसायने यांचा समावेश होतो, तर भारतातून होणाऱ्या आयातीमध्ये यंत्रसामग्री, रसायने, बेस मेटल, खनिज उत्पादने आणि कापड यांचा समावेश होतो. वर्ष 2024 मध्ये भारत- ईयू यांच्यातील सेवांचा व्यापार 7.2 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला.

### गुणवत्तेने मने जिंका, त्याचा प्रभाव दीर्घकाळ टिकतो

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व प्रकारच्या उत्पादकांना सांगितले आहे की भारत आणि युरोपीय संघामधील ऐतिहासिक करारामुळे देशातील उद्योगपती आणि उत्पादकांसाठी एक मोठी बाजारपेठ खुली झाली आहे. वस्तू आता परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होतील. या प्रसंगाचा मूलमंत्र म्हणजे गुणवत्तेवर भर देणे. बाजारात सर्वोत्तम शक्य गुणवत्ता आणणे, सर्वोत्तम शक्य गुणवत्ता आणून, तुम्ही 27 युरोपीय संघाच्या देशांमधील खरेदीदारांकडून पैसे तर कमवालच पण त्यांची मनेही जिंकता. या गुणवत्तेचा कायमस्वरूपी प्रभाव पडतो.

### संपूर्ण समाजासाठी भागीदारी

भारत आणि युरोपीय संघामधील भागीदारी ही 'संपूर्ण समाजासाठी भागीदारी' असल्याचे म्हटले जाते. या दृष्टिकोनातून मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करण्यात आली. यामुळे भारतातील कामगार-केंद्रित उत्पादने, विशेषतः कापड, रत्ने आणि दागिने, ऑटो पार्ट्स आणि अभियांत्रिकी वस्तूंसाठी ईयू बाजारपेठेत सहज प्रवेश मिळेल. फळे, भाज्या, प्रक्रिया केलेले अन्न आणि सागरी उत्पादने या क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील. याचा थेट फायदा देशातील शेतकरी, मच्छिमार आणि सेवा क्षेत्रांना होईल. माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, पारंपारिक औषध आणि व्यवसाय सेवांनाही याचा फायदा होईल.

X



**Narendra Modi**
@narendramodi

केंद्रीय अर्थसंकल्प 140 कोटी भारतीयांच्या आकांक्षा प्रतिबिंबित करतो. तो सुधारणांच्या प्रवासाला बळकटी देतो आणि विकसित भारतासाठी एक स्पष्ट पथदर्शी रूपरेषा सादर करतो.
#विकसितभारतबजेट



**Rajnath Singh**
@rajnathsingh

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, देशाचा विकसित भारताकडे वेगाने प्रवास सुरु आहे. याच भावनेतून, 'आकांक्षेचे यशात रूपांतर' आणि 'क्षमतेचे कामगिरीत रूपांतर'करण्याचा प्रयत्न करणारा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांचे अभिनंदन करतो. हा 'युवा शक्ती-चालित अर्थसंकल्प' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या दृष्टिकोनाला आणखी बळकटी देईल.



**Amit Shah**
@AmitShah

2026-27 च्या अर्थसंकल्पाद्वारे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले आहे की स्वावलंबी आणि विकसित भारत हा केवळ एक नारा नाही तर आपल्या सरकारचा संकल्प आहे. हा अर्थसंकल्प प्रत्येक क्षेत्राला, प्रत्येक वर्गाला आणि प्रत्येक नागरिकाला सक्षम करण्यासाठी एक स्पष्ट आराखडा प्रदान करत नाही तर त्यांना प्रत्येक पावलावर मदत करणारे प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यावहारिक दृष्टिकोन देखील प्रदान करतो. #ViksitBharatBudget हे प्रत्येक क्षेत्रात जागतिक आघाडीवर असलेला भारत निर्माण करण्याचे एक दृष्टिकोन आहे.



**Nitin Gadkari**
@nitin_gadkari

#केंद्रीय अर्थसंकल्प 2026 मध्ये शेतकरी, तरुण आणि एमएसएमईवर केंद्रित एक निर्णायक रोडमॅप मांडण्यात आला आहे, जो भारत #ViksitBharat2047 च्या दिशेने प्रगती करत असताना समावेशक वाढ, नवोन्मेष आणि भांडवली गुंतवणुकीचा पाया मजबूत करेल.



**Shivraj Singh Cho...**
@ChouhanShivraj

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे अमृत काळाचा असा अमृत कलश आहे, ज्यातून समृद्धीची नदी वाहते आणि विकसित भारताच्या भव्य संकल्पाची पूर्तता होते. हे अर्थसंकल्प म्हणजे संपत्तीपासून सत्तेपर्यंत, अंत्योदयापासून अभ्युदयापर्यंत आणि साधनांपासून उपायांपर्यंतचा सुवर्ण प्रवास आहे. हे शेतात हिरवळ, कोठारांमध्ये समृद्धी आणि प्रत्येक चेहऱ्यावर हास्य आणेल.



**Manohar Lal**
@mlkhattar

विकसित भारतासाठी वचनबद्ध असलेला हा दूरदर्शी अर्थसंकल्प आहे...
देशाची संसाधने, क्षमता आणि समृद्धी लक्षात घेऊन आणि व्यवसाय सुलभता आणि राहणीमान सुलभतेकडे वाटचाल करून लोकांचे जीवन सोपे, सहज आणि समृद्ध करण्याचे उद्दिष्ट या अर्थसंकल्पात आहे.



बीटिंग रिट्रीट समारोह

# विजय चौक इथे

## परंपरा, शौर्य आणि तंत्रज्ञानाचा संगम




*नवी दिल्लीतील विजय चौकात 29 जानेवारी 2026 रोजी संध्याकाळी झालेल्या 'बीटिंग रिट्रीट' समारंभात सुरेल भारतीय सूर आणि सैनिकांच्या लयबद्ध संचालनाने अभिमानाची भावना निर्माण केली. ऑपरेशन सिंदूर, 'वंदे मातरम'ची 150 वर्षे, भारताच्या महिला शक्तीचे क्रिकेटमधील यश, अश्नी ड्रोन, भैरव बटालियन आणि प्राचीन 'गरूड व्यूह' युद्ध रचना या सर्वांचे या प्रसंगी प्रभावीपणे प्रदर्शन करण्यात आले. बीटिंग रिट्रीटची ही परेड, 77व्या प्रजासत्ताकदिन सोहळ्याच्या समारोपाचे प्रतीक आहे आणि ती भारताच्या समृद्ध लष्करी वारशाच्या सामर्थ्याचे दर्शन घडवते, उत्सवावर उमटलेली समारोपाची सुवर्णरेषा ठरली आणि राष्ट्राच्या समृद्ध लष्करी परंपरेचे भव्य, गौरवशाली दर्शन घडवून गेली.*

'बीटिंग रिट्रीट' समारंभ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



*आपण वंदे मातरमचा 150 वा वर्धापन दिन साजरा करत असताना, बीटिंग रिट्रीट 2026 मध्ये आपल्या सशस्त्र दलांनी सादर केलेले त्याचे सादरीकरण खरोखरच खास आहे.*

**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 16-28 फेब्रुवारी, 2026

आर.एन.आय DELHIN/2020/78812 (प्रकाशन तिथि- 5 फेब्रुवारी 2026, कुल पृष्ठ-64)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक आणि मुद्रक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्यूरो

कक्ष क्रमांक 278, केंद्रीय संचार ब्यूरो, सूचना भवन,
दुसरा मजला, नवी दिल्ली - 110003
येथून प्रकाशित